ग्रं. सं. ठाणे
ग्रंथ इतिहास
नं. नं. ३३९

[illegible]तिहास [illegible] मंडळीची

ग्रंथमाला.

इ-१८२ २

# श्रीशिवाजीप्रताप.

[ श्री छत्रपति शिवाजी महाराजांची बखर. ]

बडोदें येथें 'फत्तेसिंह' छा०छा०

शके १८१७ पौष शुद्ध १

१८ इति

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

पुरातनेतिहास प्रकाशक मंडळाची

ग्रंथमाला.

२

# श्री शिवाजीप्रताप.

[ श्री छत्रपति शिवाजी महाराजांची बखर. ]

बडोदें येथें फत्तेसिंह छा॰छा॰

शके १८१७ पौष शुद्ध १

किंमत रुपाया एक.

# PURATANA ITIHAS-PRAKASHAKA MANDALI.

( *Established on the* 1st *of Chaitra* 1951. )

*President.*

Harold Littledale Esquire M. A.

*Secretary.*

Mr. Sakharam Ganesh Mujumdar.

*Treasurer.*

Mr. Pandurang Ramchandra Nandurbarkar

*Prakashaka.*

Mr. Pandurang Ramchandra Nandurbarkar.

Mr. Lakshman Kashinath Dandekar.

*Members and well-wishers.*

Mr. Ramrao Narayan Pradhan.

Mr. Dwarkanath Jagannath Korde.

Mr. Krishnarao Raghunath Ambegavkar.

Mr. Govindrao Amrit Vaidya.

Mr. Keshavalal Chhotalal Patel.

Mr. Madhavrao Waman Bendre.

## बखरी विषयीं दोन शब्द.

इतिहास राष्ट्रोन्नतीचा पाया होय; धर्माभिमान, देशाभिमान, वगैरे गुण अंगीं येण्यास इतिहासासारखें दुसरें साधन नाहीं. आजमित्तीस आमच्या लोकांचें लक्ष इतिहासाकडे लागून, जो तो इतिहाससाधनांचा शोध करूं लागला आहे, हें एक सुचिन्हच आहे. असा चोंहीकडून यत्न झाल्या खेरीज, आमच्या देशाचा इतिहास हातीं लागावयाचा नाहीं, हें निर्विवाद आहे; परंतु काळ असा कांहीं अनुकूळ आहे कीं, आपापल्या संग्रहांतील कागदपत्रें देण्यास कोणी ही मागें पुढें पाहत नाहीं, ही मोठ्या आनंदाची व उमेदीची गोष्ट आहे.

ह्या बखरीची एक प्रत प्रथमतः रा. रा. द्वारकानाथ जगन्नाथ कोरडे, यांजकडे सांपडली व ती त्यांनीं आम्हांस खुषीनें दिलीही. श्रीशिवदिग्विजय लोकांचे हातीं पडतांच आणखी दोन प्रती आमचे हातीं आल्या. एक रा. रा. रामराव नारायण प्रधान यांजकडे सांपडली व दुसरी रा. रा. कृष्णराव रघुनाथ अंबेगांवकर यांजकडे. ह्या तिघांचीं घराणीं पूर्वीं मोठीं नामांकित होतीं, तेव्हां बखरीच्या खरेपणाविषयीं संशय घेण्याचें कारणच नाहीं. निरपेक्ष बुद्धीनें केवळ इतिहासाचा जीर्णोद्धार व्हावा म्हणून, या गृहस्थत्रयानें आपापल्या बखरी आम्हांस दिल्या, या बद्दल फक्त आमच्या मंडळीवरच त्यांचे उपकार झाले आहेत असें नाहीं, तर संपूर्ण महाराष्ट्र देशावरही त्यांचे उपकार आहेत.

ही बखर संवत १८८६ चे सालीं बडोदें येथें लिहिली गेली आहे. कोणी लिहिली, हें समजण्याचें मात्र कांहींच साधन नाहीं.

एवढें मात्र खरें कीं, थोरले **सयाजीराव** महाराज गायकवाड यांनीं ही बखर लिहविली आहे. **गायकवाड** सरकारानीं तत्कालीन चिटणीसाकडून ही तयार करून घेतली होती; हें गायकवाड सरकारास व त्यांतून थोरले **सयाजीराव** महाराज यांस मोठेंच भूषण आहे. हे महाराज इतिहासाचे मोठे भक्त असत, असें त्या वेळचीं कांहीं माणसें हयात आहेत, तीं ही सांगत असतात.

या बखरींत विशेष काय आहे, याचें थोडेसें दिग्दर्शन करितों. **शिवाजी** महाराजांची बाल्यदशा हींत विस्तारानें वर्णिली आहे. तसेंच **मलिकांबर, जाधवराव,** व **मुरार जगदेराव** यां विषयीं बरीच माहिती असून, दौलताबादकरांचा व विजापुरकरांचा संबंध कसा होता, वगैरे गोष्टी यांत स्पष्टतर आहेत. इतर बारिक सारीक माहिती ही हींत अशी आहे कीं, त्या मुळें **श्रीछत्रपतींच्या** इतिहासांतील बऱ्याच खांचाखोंचा भरून जाऊन, कोणी ह्या महापुरुषाचें चरित्र लिहावयास बसेल, तर सुकर व सुगम होणार आहे.

लेखकानें एक दोन चुकाही केल्या आहेत. **शास्ताखान** हा सरदार दिल्लीपतीकडील असतां व इतर बखरींतून व इतिहासांतून या विषयीं एकवाक्यता असतां, प्रस्तुत बखरीकारानें त्यास विजापुरकरांकडिल सरदार बनविलें आहे! व **शिवाजी**च्या पारिपत्याचे कामीं आम्ही मदत करण्यास तयार आहों, अशा आशयाचीं पत्रें ही **औरंगजेबा**कडून **शास्ताखाना**कडे गेलीं होतीं, असें लेखकानें वर्णिलें आहे; परंतु कैदीस 'संशयाचा फायदा' देण्याची जशी न्यायकर्त्याचीं रीत आहे, त्याचप्रमाणें आप-

णांस ही केलें पाहिजे, म्हणजे लेखकाच्या इतक्या दूर राहण्याचा त्यास ‘ फायदा ’ देणें जरूर आहे.

सरते शेवटीं आमची संस्था उदयास आणून, आमच्या अल्प श्रमाचें दुसरें फळ, आज जगापुढें सादर करण्याचें, ज्या ईश्वरानें आम्हांस सामर्थ्य दिलें, त्याचे आभार मानून, वाचकांची तूर्त रजा घेतों.

बडोदें
पौष शुद्ध १ संवत् १९९२ } प्रकाशक.

श्री.

# श्री शिवाजी-प्रताप.

( श्री छत्रपति शिवाजी महाराजांची बखर. )

## खण्ड पहिलें.

श्रीमदुमारमणचरणपरागसेवित गोभूद्विजप्रतिपालित अखिलजनानंदकर शौर्यौदार्यविराजित गुणगांभीर्यनिरत समस्तसामंतमुकुटालंकृत राजमान्य शिसोदे भोंसले राजे यांची परंपरा विश्रुत करावी ह्मगाने, स्वकीय पोषकाची इच्छा जाहल्यावरून श्रुत करितों ऐसी जे, पूर्वी पृथुपाल राजा हस्तनापुर, दिल्ली येथें सार्वभौमत्व करून असतां, त्यांचे ज्येष्ठ सहोदर उदेसिंग राजे, नेपाळचे संस्थानांतून स्त्रिचे भाषणें करून विरागी होऊन, मारवाडाचे नजीक महा अरण्य—वृक्ष, पाषाण, पर्वत, रीस, व्याघ्रादि श्वापदें वेष्टित मनुष्यसंचाररहित स्थलावलोकनें जीवाशा सोडून, महा पर्वताची गुहा, अनेक प्रकारचे वृक्ष शोभायमान, तृणांकुर नूतन हरितवर्ण जलेंकरून सुशोभित पाहून, तेथें राहून बसावयास जागा स्वच्छ करितां, साक्षात् भगवान् सांब परब्रह्ममूर्ति गोचर जाली, ती अवलोकून अंतःकरणीं समाधानता होऊन, एकासनीं निराहार निरोदकीं बसले. श्रीस संकट प्राप्त जालें. नंतर प्रसादचिन्हें उदेसिंगजीस जालीं. परंतु राजाचें मानस आपणास

सार्वभौम पदवी प्राप्त व्हावी, असा निग्रह, त्यावरून ईश्वरें आज्ञापिलें कीं, 'पृथुपाल तुझा भाऊ, साक्षात् विष्णु–अंश आहे. हस्तनापुरीं राज्य करील आणि तूं जितकें राज्य आक्रमण करशील तितकें राज्य तुजला प्राप्त होईल. चक्रवर्ती भूमंडलव्याप्ति तुझी कृतीनीं तुजला नाहीं. तूं स्वसत्तेंकरून राज्य घेशील, तितकें पृथुपालाचे योगें तुजला परंपरेनीं ऐश्वर्य चालेल, आणि सैन्य समुदाय संग्रह करणें, ह्मणजे वृद्धिंतें पावेल.' त्याजवरून जनाची इच्छा करणें प्राप्त जाली. त्यास द्रव्यें करून सर्ववश्यता; त्याचा उपाय काय ह्मणून श्रीस विनंती केली. त्याचें उत्तर जालें कीं, 'संपूर्ण हे भूमि हेमरौप्यात्मक आहे; जेथें इच्छा करशील तेथें प्राप्त होईल.' असा वर होतांच मनुष्य संग्रह करून, जेथें खणावें, तेथें द्रव्यघट सांपडावे. तेणेंकरून आपले नामाभिधानें उदेपूर शहर निर्माण केलें. मोठमोठ्या इमारती, पक्की मजबूत कामें करून, संपूर्ण वस्तुमात्राचे कारागीर ठेवून, आसमंतात् राजांशीं भांडून, शिक्षा करून, स्वसत्तात्मक राज्य संपादून, उदेपूरकर राजे ह्मणवूं लागले. धाकटे भावानीं सार्वभौम पदवी, स्वसामर्थ्यें दिल्लीपतीचा पराभव करून, आपण सिंहासनस्थ जाले. संपूर्ण सत्ता वागूं लागली; तीं राजचिन्हें उभयतांचे भेटींत परस्परें वागवून, महदानंदें अतिथी, अभ्यागत, दानमान, सर्वांचा सत्कार करीत असतां, उभयतांची परंपरा सहा पुरुषपर्यंत एकचित्तें चालले. पुढें दिल्लीस पृथूचे वंशीं महानंद नामें पिठोर राजा जाला. त्याणीं राज्यव्यवस्था सर्व सोडून, प्रधानाचें ठायीं व्यंगता आणोन, अल्प मनुष्य हातीं धरोन, क्षुल्लक कार्याकरितां संभावितांची अमर्यादा करावी; क्षीणबुद्धि, अहर्निश मदांध, विषयासक्त, दर्शन

होणें दुर्लभ, प्रजा पीडा पावून, बहुत अनर्थ जाला. दाद कोठेंच नाहीं. सर्व उन्मत्त वागूं लागले; कोणी कोणाची गरज ठेवीनासें जालें, नीति सांगेल तो शत्रु. महा अनर्थ जाणोन, ईश्वरी क्षोभ. दिवसां भालुका नगरीं येऊन, शब्द करावे, दिवाभीतें येऊन बोलत, नक्षत्रपात, अति वृष्टी, अनावृष्टि, रक्त पर्जन्य, भूमि उलली, तारे तुटले, वृक्ष मळाले, नद्यांस खांडवें[1] पडले, असे अनेक प्रकारचे उल्कापात जाले, श्वानें दिवसां रडूं लागलीं. होणारानुरूपें कोणी फकीर अवलिया होता. तो केवळ ईश्वरस्वरूप, तो कोणे दिवशीं पिठोर राजाजवळ जाऊन दुवा[3] केला. प्रसंगानुरूप त्याची गांठ पडली असतां, राजानीं पाहून कांहीं बोलावें. आतिथ्य करावें. तें न करितां स्वकार्यभागीं निमग्न जाला. परंतु फकीर अवतारी, दुःश्चिन्हें[2] जाणून, राजाशीं बोलावें, सांगावें, अरिष्ट टाळावें, असा हेतु असोन, राजा मदांधेंकरून बोलला नाहीं; जाणून उठोन जाते समयीं एक मुद्रा अनामिकेंतील काढून दिली. त्याजवरी " ये बी दिन जायेंगे " अशीं अक्षरें लिहिलीं. ती प्रसन्न चित्तें देऊन राजास सांगितलें कीं, 'राजा रे, ही अंगठी हातांत असों दे; ही आंगठी तुझे उपयोगीं फार पडेल. इचें स्मरण वारंवार करित जा.' त्याजवरून राजानें हातांत घातली. कितीएक दिवस राहिली. त्या काळीं कोणी एक पुरुष, यवन दरिद्री काष्टभार घेऊन, विकावयास येत आहे; तों दिवस फार आला; ऊष्णेंकरून पीडा पावला. ते समयीं दिल्लीचे उत्तर भागीं वटवृक्षातळीं बाव उत्तम प्रकारची शीतलोदक छायायुक्त पाहून, विश्राम पावता जाला. तेथें फकीर कोणी अवलिया

१ नदीचा प्रवाह खंडित होऊन ठिक ठिकाणीं डबकीं होता तो खांडव. २ इष्ट अनिष्ट व्हावयाचें त्यासारखें. ३ आशिर्वचन.

पैगंबर सिद्धस्वरूपी येऊन, दरिद्री यवनास पाहून, मनांत विचार करिता जाला कीं, 'हे भगवान्, सामुद्रिकें करून उत्तम पुरुष होत्साता, काष्ठ आणोन पोट भरितो; तस्मात् ईश्वर अकारुणी आहे, असो. आपण यास ऐश्वर्य देऊन, याची इच्छा किती राज्य भोगावी अशी परीक्षा करूं, ह्मणोन हातांतील सोटा होता, तो तत्काळ यवनाचे पाठीवर मारिता जाला. असें असतां त्याजला क्रोध यावा, विरुद्ध भाषण करावें; तें राहून भगवान् जगदीश परम कारुणिक[2]; त्या सिद्ध पैगंबरास यश देणार, ह्मणोन, ' हे साई[1] , इतका राग नका करूं,' ह्मणोन चरणावरी मस्तक ठेवून बोलतां, सात सोटे बसले. पुढें सो-सवेनात जाणोन, सोटा हातीं धरून विनंती करूं लागला कीं, 'इतका मारावयाजोगा मी अपराध काय केला सांगा' ह्मणतां, साईनीं उत्तर केलें कीं, 'या दिल्लीची पादशाहात तुजला शंभर पुरुष संतत परंपरेस द्यावी, असा आमचा मनोदय होऊन, तुझी परीक्षा पाहिली; परंतु इतकें वैभव भोगणें तुझे कपाळीं नाहीं. सात पुरुष राज्य तुझे परंपरेस प्राप्त होईल.' हें ऐकून, आश्चर्य वाटून, तो यवन विचारिता जाला कीं, ' मी दरिद्री, मजुरी करून पोट भरितों; आणि आपण मेहरबान होऊन सात डोयीं[3] राज्य दिलेंत, हें माझे स्वांगानीं वैभव येऊन मिळणार, किंवा स्वप्नांत भोगणार, कसें तें सांगावें.' त्यावरून त्यांणीं सांगितलें कीं, ' आजपासून एक संवत्सरानीं तूं या सिंहासनीं बसोन, दिल्लीपति ह्मणविशील. ' हें ऐकून, आश्चर्य मानून, विचारनिमग्न जाला. तों तत्काळ फकीर अदृश्य जाला. यवनास पुढें विचारणें ही इच्छा, तों पुढें फकीर नाहीं. जवळ बसले, त्यांणीं 'जवळ बसला तो पाहिला; परंतु गेला तो पाहिला नाहीं'. ह्मटल्यावरून ग्लानी पावून, पैगंबराचे ध्यानीं लागला. नंतर दोन

१ उर्दू भाषेत फकिरास 'साई' असें म्हणतात. २ कृपाळु. ३ डोयीं ह्म० पुरुष.

प्रहरपर्यंत अनेक वेषें भिक्षा मागोन आणोन, गांवाबाहेर गोरगरीब रंजलेगांजले मनुष्यास अर्धशेर, पावशेर, पाण्यापुरता, आधार देऊन, सेवा करूं लागला. शहरांत गल्लोगल्लीं रस्त्यानीं सायंकाळा-पासून दोन प्रहर रात्रपर्यंत, फकीर व मुसलमान अनेक प्रकारचे वेष-धारी यांणीं बांगे[१] देऊन, मांस देवालयांत टाकून, देवता भ्रष्ट केल्या, देवत्व देवाचें हरण केलें; ब्राम्हणांचे मंत्र तेजहीन जाले; राजा विष-यांध केला. नगरीं अमर्याद वागूं लागले, त्यांचें शासन नाहीं. सर्व आपआपले ठार्यी अहंभाव मानून, अधिकाराहून अधीक बोलूं लागले. ईश्वरी-क्षोभ जाला; त्या योगें पैगंबराचें वचन सिद्धीस नेणारानुरूप ज्या दिवशीं वर्ष भरावयाचें, ते दिवशीं सायंकाळच्या चार घटका दिवस राहतां, यवन अनेक शस्त्रधारी उत्पन्न होऊन, 'दीन, दीन[२]' करीत हजारों लोक राजमंदिरीं शिरले. राजा मंत्रीसह कैद करून, आपला अम्मल बसवून, सिंहासनीं त्या सुलतान शहास बस-विलें. राजे ह्मणत होते, ते पादशहा ह्मणवूं लागले. राजास कैद करून, आपली सत्ता संपूर्ण पृथ्वींत वागविली. राजा कुटुंबासुद्धां वाड्यांतच ठेविला होता. तो विषयेंकरून व्याप्त; त्यास राज्यहरणाचें दुःख नाहीं. स्वेच्छाचारें वर्तत असे. सुलतान शहानीं राजाची मिजाज कायम ठेवून आपली सत्ता सर्वत्र जाली. फितूर तुफान देशांत राहिलें नाहीं; जाणोन हजरतही[३] कृतकृतार्थ मानों लागले. राजाजवळ ब्राह्मण हिंदुस्थानी लिहिणार

---

१ वळणा भ्रमण करून. २ हा लढाईच्या वेळेस वीरश्री आणणारा मुसलमानी शब्द आहे. ३ बादशहाही.

असावे, त्यांणीं बातमी वरचेवर पादशहास कळवावी. असा सांप्रदाय असतां, कोणे एके समयीं राजाची कन्या उपवर, लावण्यें करून बहुतच सुंदर होती. तिचा मुखचंद्र ईषन्मात्र पाहरेकरी यांणीं पाहिला, त्यावरून कारकुनास रोजनिशी वरदीचे वेळेस बातमी सांगितली. त्यांत फारच तारीफ केली. ती ऐकून हजरतीजवळ त्यांणीं वरदी दिली. ती हजरतीनें ऐकून, कामें करून विषमज्वर जाला आणि त्या कन्येचा निजध्यास लागला. राजास सांगोन पाठविलें. 'तुमची कन्या उपवर आहे, ती आह्मांस दिली असतां, तुमचा बंदोबस्त करून देऊं; नाहीं तरी तुम्ही कैदेंत आहांच, बलात्कारें मुलगी घेऊं, तुमची विदारणा करूं, यांत रहस्य नाहीं. सोयीनें तुम्ही आह्माशीं चालले असतां, आह्मांस तुह्मांपेक्षां आप्त कोण आहे?' ह्मणोन कितीएक प्रकारें साम बोलत असोन, राजा देहावर न येतां, उत्तरच न देतां, वर्ष सहा महिने गुजरले. पुढें राजा एके दिवशीं प्रातःकाळीं उठोन, शौचास जाऊन आले, मुखमार्जनास बसला तों ती आंगठी हातांतील फकिरानीं दिली, तिचे ठायीं दृष्टि ठेवून, पहातां त्याजवर "ये बी दीन जायंगे" अशीं अक्षरें पाहून, विचार करितां जाहला कीं, 'मी राज्याधिकारी असतां, ही आंगठी मजला फकिरानीं दिली. ते समईं मी मदांधेंकरून पाहिली नाहीं, आतां अर्थ मनन करितां, तें राज्य गेलें, वैभव नाहीं, नजरबंद राहिलों, हे दिवस ईश्वर ठेवणार नाहीं'. म्हणोन आनंदांतरीं निमग्न होऊन हर्ष करून, कारकुनास बोलावून सांगितलें कीं, 'एक लाख रुपये रोकड आतां पाहिजेत, आणावे'. तें वचन ऐकून, त्याजलाही बहुत हर्ष जाला. 'आजपर्यंत हा राजा मजशीं भाषण करीत नव्हता; आज मला चाकरी सांगितली; तेव्हां माझा कांहीं उदयकाल आहे.' असें मानून हजरतीस जवळ जाऊन तसलीम[1] करून आदबान[2] जाऊन

---

१ मुजरा. २ आदबीनें.

बंदगी बोलता जाला कीं, 'हे हजरत, हिंदुपतीची आज्ञा जाली कीं, एक लाख रुपये घेऊन ये; त्यास काय हुकूम आहे?' तेव्हां हजरत विचारूं लागले कीं, 'राजा काय करीत होता? कसा आहे?' तो विचार कारकुनानीं निवेदन केला. नंतर हुकूम दिला. नंतर रुपये घेऊन, कारकून राजाजवळ आला. राजानीं पाहून, बहुत आनंदानें बोलता जाला कीं, 'गोरगरीब ब्राह्मणांस बोलावून आणावें,आणि कांहीं पक्वान्नें आणोन, अन्न द्यावें. त्याप्रमाणें करून, त्यांस दक्षणा देऊन, तमाम शहरांतील कसबी, गुणी, गाणार, वाद्य वाजविणार, अनेक तऱ्हेचे कुशल, चतुर, बोलावून बैठकी करून, गवई आदिकरून हरिदास गोसावी सुद्धां, ठाई ठाई गीत, नृत्य, रागरागोद्धार, सुस्वरयुक्त करून, त्यांस बिदा केलें; लाख रुपयांत एक कपर्दिक ठेविली नाहीं. त्या कारकुनापासूनच व्यवहार करविला. त्याप्रमाणें रात्रीं जाऊन, हजरतीस वरदी दिली. दुसरें दिवशीं राजा शौचास जाऊन, मुखप्रक्षालन करून बसला. हीबातमी पादशहानीं ठेवून, स्वतः आपण आले. उभयतांची नजरेस नजर एक होतांच, राजा उठोन, सामोरा जाऊन, हजरतीस हातीं धरून, घेऊन एकासनीं बसले आणि परस्परें स्नेहयुक्त भाषणें जालीं. त्यांत हजरतीनें आसिकीचा[१] इशारा दर्शविला. त्याचें उत्तर केलें कीं, भगवंत इच्छेनीं होणार तें होतें. अस्तु. मनोदयानुरूप उभयपक्षीं आनंदानीं वागले असता, मनोरथ सिद्धीस जातील. आमचे कारभारी येतील, त्यांचें आपलें बोलणें नेमांत येईल तसें घडेल. हें ऐकून हजरत संतोष पावून, आपले स्वस्थानीं गेले. नंतर भोजनादि विधि जाला. हजरतीनीं मंत्री सचीव यांस बोलावून, एकांतीं विचार करितां राजकन्येस वृत्त कळलें कीं, ' आपल्यास यवन मागतो. राजा संकटांत

---

१ आशिर्वचन. २ सोयरिक.

तेव्हां तोही कबूल करितो. तेव्हां आपण भ्रष्ट होतों मनांत आणून, लज्जा सोडोन बापाशीं बोलती जाली कीं, ' राजा रे, मला यवनास देण्याचा विचार केला, तो नीटच आहे; परंतु मी त्याचे घरीं जाणार नाहीं. मीं सांगेन तें ऐकेल, कबूल करील, तरी मीही ऐकेन; नाहीं तरी मी आपला प्राण देईन; परंतु धर्मशास्त्रीं विचार आहे कीं, कुटुंबनाश होतो, त्यापेक्षां एक मनुष्य देऊन, मुक्त व्हावें तसा प्रकार तूं आरंभिला तो कसा! तो ही मान्य आहे. तुझे पोटीं येऊन, तुजला सुख द्यावें. हाच आमचा धर्म; त्यापेक्षां या गोष्टीचेंही दुःख मोजीत नाहीं. परंतु पुढें ज्या गोष्टीनें कीर्ति होईल, ती गोष्ट करावी. यास्तव माझें सांगणें असें सांगावें कीं, तुमचें संरक्षण व्हावें, त्या वचनांत अंतर करूं नये. मुख्य या कुळांतील पादशाहीवर यवन बसेल, त्याणीं कन्या वरावी, तेव्हां सिंहासनस्थ व्हावें. तिसरे, चरणांगुष्ट डावे पायाचा त्यांणीं गंधाचा टिळा लावावा; चवथे, कान टोंचावे; माझें संपूर्ण स्त्रियांत परंपरा सहीत ज्येष्टत्व, आज्ञेंत वर्तावें, या प्रमाणें कबूल जाला, तरी जीव ठेवणें; नाहीं तरी प्राण देणें उत्तम.' असें बोलली. तेव्हां तें वृत्त कारकुनानीं ऐकून, राजाज्ञेनीं हजरतीस एकांताचे एकांतीं जाऊन, सुचविलें; तें उभयपक्षीं मान्य होऊन, सुमुहूर्त पाहून, निका ह्मणजे लग्न लाविलें. राजास चितोड वगैरे जागा; दहाकोटी रुपयांची दिली; आणि हिंदु राजे सर्वांत श्रेष्ठ, सार्वभौम पूर्वीचे ह्मणोन यवनाधिपत्यांत राणे ह्मणवावें; यवन लोक संपूर्ण, त्यांत पादशहा, राजास मान आणि पादशहा ह्मणवावें, ह्मणजे सार्वभौमत्व त्याचेठायीं अशा अर्थें करून उभय पक्षीं बेकिलाफ[1] निर्मल मनें बहुत दिवस कंठिले. पुढें चितोडास राजाचे संग्रहीं एक गणेक[2] सर्वाभ्य, बहुत चतुर निर्माण जाला. तो केवळ वाचस्पतीच[3] असतां, त्याणीं दुंदुभी[4] स्वर्गलोकीं

१. निष्कपट. २ ज्योतिशी. ३ बृहस्पति.
४. नौबत.

वाजविल्या, त्या मृत्युलोकीं श्रवणीं आल्या, अशी वार्ता पुराणांतर्गत सांगितली, कोण्हीं ती या गणकास विचारिलें. असा नाद श्रवणीं दूर यावयाजोगी दुंदुभी कशी होती? या गणकास विचारिलें. गणकानीं उत्तर केलें कीं, देव कृती व मनुष्य कृतीस अंतर बहुत असतें. त्यावरून राजानीं मनुष्य-कृतीनें उत्तम प्रकारची दुंदुभी कोणत्या प्रकारची होती, ती करण्यास साहित्य काय, व सुमुहूर्तेकरून तयार करावयाची सांगाल, तशी तरतुद ठेवूं. हें ऐकून, उत्तम मुहूर्त योजून, सरंजाम[1] व धातु निर्वंध सिद्ध केल्या आणि रस करून दुंदुभी जोडी एक समयावच्छेदें ओतिली. नंतर तयार करून वाजविली. तिचा नाद दोन कोशपर्यंत श्रवणीं यावा अशी झाली. थोर विशेष नसतां, नाद व घांट अत्यद्भुत, चांगला, याची वार्ता सर्वत्र लहान थोर राज्यांत गेली; पादशहास कळोन त्या दुंदुभीचा लोभ उत्पन्न जाला. मागणें केलें असतां, राजाचें मानस देण्याचें नाहीं, पाहून नातीनें बाके सल्तनत फौजसुद्धां चितोडास येऊन लागले. दहा पांच लढाया मातबर जाल्या. सामदामप्रकारें राजा अनकूल न होय; तेव्हां पूर्वील तऱ्हाचा बिघाड होऊन, राज्यच घ्यावें, असा हेतु धरणें पृथ्वीपतीस प्राप्त जाला. समस्त हिंदु राजे यांणीं राजास किती एक प्रकारें समजाविलें; परंतु न ऐकत, याजमुळें हिंदु राजांनीं स्नेह सोडून, सेवकपणें युद्धाचा इरादा धरिते जाले. एक स्वामिसेवाच मुख्य प्राधान्य केली. राणा हिंमतदार व भाऊ फटया, रजवाडे सेवक, सरंजामी तुंबळ, याजमुळें एकदिलपणा; येणेंकरून पृथ्वीपतीस तृणासमान मानोन, युद्धारंभीं निमग्न राहिले. पादशहानीं सभोंवत्या फौजा ठेवून, रसद बंद करून, शह देऊन राहिले आव-

---

१. अन्न सामुग्री.

णीचे जागीं बागबगीचे, आमराया, रमणीय स्थळें, नूतन तयार केलीं. अंगावरी जाऊन झटून पडणें, अगर हल्ला करणें, एकाएकीं जुलूम केला, मला जुलमी हजरत ह्मणतील, याकरितां मनुष्य खराब न होतां, हारीस आणून, आपला मतलब करून घेण्याचे विचारांत राहिले. राणा एकदिल सरंजाम, यामुळें बेजवा[१] वागले. पांच सहा वर्षें जाल्यानंतर, राणा एकाएकीं बेआरामी होऊन, मास पक्षांत वारले. पत्नी गरोदर होती. अधिकारी वैकुंठवासी जाले, तेव्हां लहान थोर जमा होऊन, विचार केला कीं, पुढें कसें करावें? नौबत देऊन तह करावा, तरी मरते समयीं आज्ञा जाली, होणें तसें होईल; परंतु अपकीर्ति करून, हारीस येऊन दुंदुभी दिली, हा दुर्लौकिक करून घ्यावयाचा नाहीं. त्याचे चुलतबंधु यांणीं अभिमानकंकण बांधून छपन्न हजार भाऊबंद एकताटी[२], शिवाय पन्नास. हजार आह्मविषयीं मिळोन लाख सरंजाम, इतके जाऊन हल्ला करूं या. तख्त या तावूत. नेम करून निश्चय ठरावून किल्ला काकाजी भोंसले यांचे स्वाधीन खजिन्यासुद्धां सोंपणूक करून, सायंकाळचे समयीं किल्ल्यावरून उतरून, सामना केला. त्यांत मागें पुढें पाहिलेंच नाहीं, कत्तल करीत चालले. पादशहानीं छरा भरोन, तोफा ठेविल्या होत्या, त्यांजला सरबत्ती देतांच, पंचवीस तीस हजार मनुष्य खपले; नंतर राजाचा सरंजाम व पादशाही परस्परें लढाई करितां, आले मनुष्यांतून कोणी परत गेला नाहीं. इकडील व तिकडील दीड दोन लक्ष मनुष्य कामास आले, त्या जागीं अद्यापवत् सायंकाळीं रण घुमतें. पादशहाचे सरंजामांत मनुष्यहानि फार जाली. तीस हजारपर्यंत सरंजाम राहिला, तो तयार होऊन, किल्ल्यावरी हल्ला केली. तो किल्ल्याचे दर-

१ बे पर्वा २ एका दिलाचे.

बाजाचे व जागणींत रखवालीचे लोक राहिले. लढाई जोगा सरंजाम नव्हता, हें काकाजींनीं वर्तमान पाहून, श्रवणीं येऊन राजपत्नीस व आपले कुटुंबास घेऊन, दक्षणेकडील दरवाजानीं रत्नादि अलंकार भूषणें नाणें भरून, सर्वत्र बायका सरंजाम घेऊन निघाले; ते रातोरात तालभोपाळ येथें आले. राजपत्नी गरोदर होती, ती प्रसूत जाली. पुत्र जाला. तीन दिवस मुक्काम करून, चौथे दिवशीं तला दौलताबाद येथें बादशहास येऊन भेटले. सारंजाम गारत[1] जाला. सर्व हकिकत वकिलांनीं लिहिलीच होती; यांचें मुखें श्रवणीं आली. आश्वासन घेऊन, कुटुंब ठेवून, उदेपुरास गेले. त्यांजला वर्तमान समजाविलें. पुढें कसें करावें विचारिलें. त्याजवरून श्रमतेहा पावोन, जागा देऊन, राणीपुत्रास आणविलें. त्यांचा सन्मान करून, बरदास्त ठेविली. नंतर आपण भोजन सोडून, निराहार करूं लागले. राजचिन्हें वागविणें सोडलें. ज्या समयीं दरवाजाच्या[2] झेडपा व दुंदुभी आणूं, ते समयीं ऐश्वर्य भोगूं. अशा अर्थें मोठ्या तमानें वागतां, पृथ्वीपतीशीं स्पर्धा करणें चांगलें नाहीं, असें वकिलाचें लिहिलें आल्यावरून, काकाजीस दम देऊन, दिवस काढूं लागले. लढाईची हिंमत न चाले. पुढें काकाजीचा व राणीचा एक विचार, बसणें, उठणें, वागणें एकत्र; यामुळें विपरीत चर्चा करूं लागले. राजपुत्रही प्रौढ जाला. तेव्हां असह्य वाटून काकाजीस मारण्याची योजना राणाजीस विचारून आरंभिली. तें वर्तमान काकाजीस कळोन, राणीस एकांतीं विचारिलें. त्यांत विपरीत भाव दृष्टीस पडला. तेव्हां तेथून निघून दौलताबादेस आले. राजपुत्र व राणी तेथें राहिली. राणाजी राजचिन्हें मागें व एक लिंगजी पुढें चालवून, आपण त्याचे मुत्सद्दी अशा भावें चालले. पुढें अन्नाचे पात्रावरी

१ ठार नष्ट. २ द्वारें.

चिमुटभर राख ठेवावी; त्याप्रमाणें चाल आजपर्यंत चालत आहे. **काकाजी** पळून निघाले; याजमुळें त्यांचे माथां 'आमचे घरचे लेकावळे कुंवर सुतारणीचे पोटीं जाले' असा दोष ठेवून, बोलणें लिहिणें वागूं लागले. नंतर जाधव वगैरे हिंदू रजपूत, चांगले संभावित, यांचा पदर जातगोत माहीत; याजमुळें पूर्वील चालीप्रमाणें शरीर संबंध वागणूक वागूं लागली. परंतु दौलताबादेस वतन पाटिलक्या वगैरे खरीदी घेतल्या. पाटिलक्यांत निर्वाह जाला. जाजती हाजरतीकडून बंदोबस्त न जाला; कारण उदेपुरकरांचें व दिल्लीचें लिहिणें हरामखोर ह्मणून येऊं लागलें. तेव्हां बंदोबस्त करणें राहिला. स्वाधीन करावें तरी, पोटचें द्यावें, परंतु पाठचें देऊं नये, हा शिरस्ता हिंदु व यवनांचा, असें असोन हवालीं करावें, तरी दौलताबादकर स्वयं पादशहा, आपण दिल्लीपतीचे अंकित स्थापित नाहीं. अशीं बोलणीं व वागणीं होतीं; यामुळें स्थिति राहून, जिवाचा बचाव केला. रोजगाराचा लोभ धरिला नाहीं. चितोडाहून जड जवाहीर व नाणें आणिलें, त्याजवरी प्रपंच कैक शें दोनशें वर्षें वहिवाटल्या नंतर, पुढें **काकाजी** भोंसले यांचे वंशीं **बाबाजी** भोंसले जाले. त्यांची कारकीर्दपर्यंत निर्वाह कोणाचे चाकर ह्मणून केला नाहीं. पुढें **बाबाजी** भोंसले यांस पुत्र **मालोजी** राजे वडील व धाकटे **विठोजी** उभयतां जाले. तीर्थरूपांनीं कैलासवास केला! शेतसारा देऊन बाकी राहील, त्याजवरी गुजराण होईना. दुष्काळ पडला. पैसा खर्च जाला. लग्नें केलीं. शेताचा सारा देणें आला, त्यासमयीं **जाधवराव** यांचे घरीं देवडीवरी, पांच रुपये शेरा कबूल करून, उभयतां बंधु शिपाईपणावरी राहिले. ढालाईताचें काम करावें. उभयतां पुरुष दिग्गज, थोर, बलिष्ट, स्वरूपवान होते; यामुळें व आर्जवी, येणेंकडून लहान थोरांचा लोभ वागत होता. पुढें कांहीं दिवसीं दोन घोडीं घेऊन, सिलेदारी जाधवांचे पथकांत करूं लागले. दिपवाळीचा सण जाणोन, निरोप घेऊन, घरीं

झाले. **मालोजी** राजे शैव, सांबभक्त, धर्मपरायण, परोपकारार्थ शरीर, दानास उदित, सत्यवादी, एकपत्नी, बहुत योग्य, सुशीलसंपन्न; त्यांजला दृष्टांत झाला कीं, कोणी एक स्त्री मौक्तिक अलंकारें सुशोभित, उत्तम वस्त्र, कपाळीं कुंकुम; **मालोजी** राजे यांशीं बोलूं लागली कीं, माझा हेतु तुझे जवळ राहावयाचा आहे; याजकरितां सावध आस. जागृत होतात तों कोठें कोणीं नाहीं. दिपवाळी जाल्यावरी परतून आपले चाकरीवर गेले. पुढें दुसरे सालीं चैत्र शुद्ध प्रतिपदेस घरीं जावयास सणाकरितां निरोप मागितला. दिडा वर्षांनीं तव्हां एक महिन्याची रजा घेतली. घरास उभयतां आले. प्रतिपदेस भोजनें झालीं. खेती घरची होती, त्याजवरी चौकशीस नेहमीं **विठोजी** राजे होते. **मालोजी** राजे कधींच शेतीवर जाण्याचा संप्रदाय नव्हता. पौर्णिमा कुलधर्माचा दिवस अस्तमीत जाला, उपोशित, **विठोजी** राजे आले नाहींत, ह्मणोन घराहून शेतास जाऊं लागले. गांव सोडून लांब दोन तीन गोळ्यांचे टप्यावर गेले. तेथें एक घटिका रात्रींचें मान जालें. पौर्णिमा, चंद्र उदय, चांदणें चांगलें स्वच्छ निरभ्र होतें. पुढें बाभळीचे झाडानजीक वारूळ वाटेवें गेलें. त्या अलीकडे एक शुभ्र वस्त्र परिधानयुक्त, कुंकुमयुक्त, गळ्यांत, कानांत, नाकांत, उत्तम अलकाराचे ठायीं रत्नजडीत, चुडेमंडित, मुद्रिकासहीत, चांगलें स्वरूप, तेजस्वी स्त्री उभी राहिली. ती प्रत्यक्ष दृष्टीनीं पाहून स्वरूपाचें तेज सहन न जालें. तेणेंकरून मूर्च्छा येऊन, भूमिवरी दंडप्राय पडते झाले. तिरमिरी आली; बहुत व्याकूळ होऊन, पडते जाले. हें देवीनें पाहून, पुढें येऊन, आपल्या स्वकरेंकरून तोंडावरून, पृष्ठीवरून, हात फिरविला. तेणेंकरून सावध जाले. नंतर अन्तःकरणीं परम भयाभीत होऊन, उठावयाची शक्ति न होय. हें पाहून देवी बोलती जाली कीं, 'अरे, तूं

राजा, ऊठ; मी तुझे कुळाची कुळदेवता आलें, प्रसन्न जालें, मजजवळ इच्छित मागशील, तें मी देण्यास सिद्ध आहें. परंतु राजाचे मुखांतून वाक्य न निघे. उठोन बसले, नेत्र उघडून पाहिलें. पुन्हा देवी बोलती जाली, अरे राजा, या वारुळाचें तळीं सात रांजण द्रव्य आहे, तें घेऊन, तूं जी इच्छा करशील, ती मनकामना मी परिपूर्ण करीन. माझें स्मरण करशील, ते समयीं मी तुझेजवळ येईन, दृष्टांतीं सर्व सांगेन, तसें कर.' असें बोलल्यावरी राजांनीं चरणीं मस्तक ठेवून, जय अंबे, त्रिपुरवासी, वरदायिनी, तुझी इच्छा, काय एक न घडे? असें मनांत आणोन पायावरी डोई ठेवून, हात जोडून विनंति केली, हें द्रव्य अपरमित, कोण्या प्रकारें यवनी राज्यांत आह्मांस पचून, कोणत्या साहसें वर्तावें? त्याजवरून जगन्माता सांगती जाली कीं, हे राजा रे, हें द्रव्य खणून, आपले घरीं नेऊन, श्रीगोंद्यांत शेषाबा नाईक पुंडे, सावकार परम भक्त आहे, त्याचे घरीं ठेव; ह्मणजे तो तुजला मागेल तसें द्रव्य देत जाईल. असें सांगितलें. नंतर राजे घरीं आले. शरीर विकळ, बसणें, उठणें सोडून मंचकीं निजते जाले. विठोजी राजे शेतीहून आले. घरीं स्वयंपाक होऊन, ताटें वाढलीं. नंतर विठोजी राजे येऊन, मालोजी राजांस उठविलें. भोजनास विठोजी राजे यांचे चौत्रे पुत्र पुढें समागमें घेऊन भोजन केलें. राजांची दिकदारीची प्रकृती पाहून, भोजनोत्तर संन्निध बसोन, विचारिते जाले कीं, आपण व्यग्र काय निमित्य झालांत, सांगावें. संशय धरूं नये. बहुत प्रकारें बोलून राजांस बोलावें असे प्रकारें प्रसन्नता केली. नंतर राजांनीं उत्तर केलें कीं, तुह्मी माझे भाऊ प्रत्यक्ष आहांत, मजला दुखणें नाहीं, व पिशाच्चबाधाही नाहीं. आज तुह्मांस येण्यास उशीर लागेल, ह्मणोन तुह्माकडे येत असतां मध्यंतरीं कारण जालें, तें सांगावयास शंका प्राप्त होती. कारण देवकृति

परिस्फुट जाली असतां, मृत्यूच प्राप्त होणार; याजकरितां कांहीं सूचत नाहीं, भ्रांत जालों. तेव्हां **विठोजी राजे** यांणीं शफत प्रमाण करून, राजांशीं बोलले, आधीं उभयतां अप्रतरणीक, त्यांत निखालस बोलतां, मग सांगण्यास वेधच नाहीं. असा योग येऊन, राजांनीं जाला वृत्तांत सांगितला. उभयतां हर्ष पावून, उभयतां बंधु, उभयतां चिरंजीव, व दोन मुनीम, चांगलीं माणसें शेतीची घेऊन, दोन गोंड जुंपून शेतास गेले. कुदळी लावून, वारूळ खणून, द्रव्य घेऊन, घरास आले. दोन दिवस ठेवून, श्रीगोंद्यास उभयतां बंधु गेले. शेषाबा नाईक यांस सांगोन पाठविलें. **नाईक** यांस दृष्टांत देवीनीं दिला कीं **मालोजी** व **विठोजी** राजे द्रव्य घेऊन, तुजकडे येतील, तें ठेवणें, लागेल तसें खर्चास त्यांस देणें. त्यावरून सामोरें येऊन, त्यांस घरास नेऊन, उत्तम प्रकारचें भोजन जालें. विडे दिले. नंतर प्रश्न केला कीं, काय आज्ञा ती सांगावी. मी चाकर तुमचा आहे. कांहीं संशय धरूं नका. मजला श्रीदेवीनें दृष्टांत दिला आहे कीं, **मालोजी** व **विठोजी** राजे हिंगणी बेरडी देऊळगांव तरफ पाटस, येथील जमीनदार येतील, ते तुझे घरीं द्रव्य ठेवतील, तें ठेवून, लागेल तसें खर्चास देणें; त्यास आपली मर्जी काय ती सांगावी. त्यावरून उभयतां राजे प्रसन्न होऊन, साद्यंत वृत्त सांगितलें. उभयतांचें एक चित्त होऊन, त्यांस परंपरेनें पोतदारी करावयाची, घालमेल करणार नाहीं. असा लेख लिहून देऊन, त्यांचे घरीं तें द्रव्य संपूर्ण आणोन ठेविलें. नंतर दिल्लीपतीचा व दौलताबादकरांचा तह बिघडला, तेव्हां कलम जारी उभयपक्षीं चालली. ते समयीं पंच हजारी मनसबदारीचीं वस्त्रें दिलीं. त्यांत **मालोजी** व **विठोजी** राजे यांणीं दोनशें स्वारांचा, जाधव यांजकडे जाबसाल करार करून, चांगले मातबरीनें रिसाला केला आणि घरीं येऊन मोठीं मोठीं,

चांगलीं, मातबर किमतीचीं, परीक्षा करून, तीनशें चारशें घोडीं घरगुती करून, दोनशें स्वारांची हजिरी जाधवांकडे दिली. दुसरी दोनशें घोडियांची विठोजी राजे यांचे नांवची सरदरी करून घ्यावी, ह्मणून बोलणें बोलतां, मोठा जथा होऊन, पुढें सुरळीत वागणार नाहींत ह्मणोन, जाधवांनीं दुसरे पथक कबूल केलें नाहीं. नंतर निंबाळकर यांजकडे विठोजी राजे यांचे पुत्राचे नांवें दोनशें स्वारांची सरदारी केली. विठोजी राजे यांस पूर्वीं पुत्र चार जाले होते. नंतर मालोजी राजे यांचे स्त्रीनें नगरचे पिरास नवस केला. त्याची प्रसन्नता होऊन, बाईस पुत्र जाले. त्यास त्या पिराचे नांव ठेवावयाची कबुलात होती; ह्मणून वडिलास शहाजी राजे नांव ठेविलें. दुसरे पुत्रास शरिफजी राजे नांव ठेविलें; एकोन दोन पुत्रांचीं नांवें मिळोन त्या पिराचें नांव शहाशरिफ होतें, त्यांस याप्रमाणें उभयतांचीं नांवें ठेविलीं. ज्येष्ठ पुत्र सात वर्षांचे होते. तेही समागमें दौलताबादेस गेले. धाकटा मूल, पांच वर्षांचा. घरीं मातुश्रीजवळ राहिला होता. शहाजी राजे, मोठे उमदे, शहाणे, मूल होत्साता प्रौढ मनुष्यास न सुचे तें समयोचित बोलणें, मर्यादा, सौजन्य बहुत चांगलें; याजमुळें ब्राह्मण लोक सुद्धां, त्या राजाचें ठायीं लोभ करून परकीपणा ठेवीनात. याप्रमाणें दौलताबादच्या पादशहाकडे स्वारीस व दरबारास जाणें येणें, सर्वत्र लोभ, श्रीची कृपा, याजमुळें वृद्धिंगत होत चालला. शहाजी राजे स्वरूपेंकरून सुंदर, चतुर, शहाणे, आर्जवी, सर्व गुणेंकरून युक्त, चाकरीस हुशार. जाधवराव पत्नीसहित एकांतीं असतां राजांस जाण्यायेण्यास प्रतिबंध नाहीं. दिल्लीपतीचें व दौलताबादकरांचें युद्ध होऊन, दिल्लेंद्र नामोहरम[1] जाले. दौलताबादकर शहाजाहानें वाजवीत, मुक्कामीं येऊन, परमानंद पावोन मिठाई वांटणी

१. पराभूत.

वांटली. नजरा झाल्या, इनाम, बक्षिसें दिलीं. नाच, रागरंग, उत्साह केला. शहरांत आल्या गेल्या, हुताशनीचा समारंभ, हिंदु लोकांत मातबर जाला. त्यांत रंगपंचमीचे दिवशीं भोजनास सर्वत्रांस जाधवांनीं बालकर, शिर्के, मोहिते, महाडिक यांचे घरोघर व्हावा असा नेम ठरला. त्यांत रंगपंचमीचे दिवशीं प्रयोजन, जाधवराव यांजकडे होत होतें. निमंत्रण सर्वांस करून, बोलावून, मंडळी सर्व जमा केली. नाच उभा केला. त्यांत शहाजी राजे गादीजवळ बसले. तेथें जाधवराव यांची कन्या पांच सहा वर्षांची होती, ती येऊन बसली. राजांचें वय नऊ दहा वर्षांचें होतें. उभयतां बालभावें परस्परें हास्यविनोदीं निमग्न जालीं. एकमेकांवरी रंगगुलाल खेळणें खेळत असतां, जाधवराव यांनीं क्रीडा पाहून, परम कौतुकें सुखावून, हंसोन बोलों लागले कीं, 'अगे, जिजी, हा वर तुला पाहिजे कीं काय? तुजला आवडतो काय'? त्याजवरून बाई बोलली कीं, 'बाबा, हाच नवरा मला पाहिजे'. त्या बोलण्याचा हर्ष मानून, विचार करून बोलावें, तें राहून, त्याच आनंदांत जाधवराव राजांशीं बोलूं लागले कीं, 'अहो, मालोजी बाबा, तुमचा मुलगा, आमची मुलगी खेळतात, बोलतात याजवरी तुमची दृष्टि आहे कीं काय? उभयतां नवरानवरी आपसांत राजी झालीं. तुह्मी आह्मी व्याही होऊं; तुमचे मनास येतें कीं नाहीं'? त्याजवरून राजांनीं उत्तर केलें कीं, 'आपण पादशाही मनसबदार, आह्मी आपले ताबेदार, आपण खावंदपणानीं बोलले; परंतु त्याचें उत्तर माझेनीं कसें होतें'? त्याजवरी जाधवराव उत्तर करूं लागले कीं, 'तुह्मी आह्मी आप्तकींत शरीरसंबंधींच आहों. व्याही आतां जालों ह्मणोन चिंता काय आहे? चाकरीचा पेशा, त्याजकडे आप्तकीचें विरुद्ध काय मानावयाचें आहे, दैवयोगानें माहात्म्य, आपला आमचा शरीरसंबंध करावयाचा हाच; असें बोलले. तेव्हां मालोजी राजे यांणीं

लहान थोर बसले, यांस हात जोडून, विनंती केली कीं, '**जाधवराव** खावंद होत्साता, काय बोलतात, हें समस्तांनीं ऐकून घ्यावें'. त्याज-वरून सर्वत्रांत संभावित होते, त्यांनीं **जाधवरावास** विचारिलें. '**जाधवराव**, त्यांशींही सदरहूप्रमाणेंच बोलले. तें ऐकून घेऊन, आप्त-कीस योग्य व वरवधू जशी असावी, तसा जोडा उभयतांचा योग्य आहे'. हें सर्वानुमतें ठरल्यावरी **मालोजी** राजे यांणीं हात जोडून पुन्हा बोलले कीं, '**जाधवराव** खावंद, आणि वधू आमचे मुलास दिली. जुबान माघारी परतावयाची नाहीं. ही मिठाई व कुंकूं आमचे तर्फेचें घ्यावें. सर्वांनीं आमच्या लाचारीवरी दृष्टि देऊन, पद-रांत घ्यावें'. बोलून सरंजाम आणोन, पुढें ठेवून सर्वांस राम राम करून, आपले गोटांत मुक्कामावरी मुलास घेऊन गेले. **जाधवराव** यांस सर्व लहान थोरांनीं सांगितलें कीं, '**राजे** आपलें वचन आपले पदरीं ठेवून, मुलीचें कुंकूं, वाचाविधि करून घरीं गेले. आतां लग्न केल्याशिवाय सोडणार नाहींत, आपणांस बदलं देणार नाहींत'. त्याचेंही उत्तर **जाधवरावांनीं** केलें. 'लेंकलेंकीचीं बोलणीं नेमांत आल्यावरी, संभावित असतात, ते फिरत नाहींत. त्यांची आमची आप्तकीच आहे. त्यापेक्षां त्या मुलास आह्मांस मुलगी देण्यास अडचण काय आहे? देतों बो-ललोंच आहों, देऊं', असे जाब जाले. नंतर भोजनास सर्वांस उठविलें. आणि **राजांस**ही बोलावूं पाठविलें.त्यांणीं परत उत्तर सांगोन पाठविलें कीं, '**जाधवरावां**स सांगावें कीं, आतां तुमचें आमचें जेवण लग्नांतच होईल. मधीं तुह्मीं आह्मांस बोलावूं नये, व आह्मी जेवावयास येऊं नये. वरकड, सरदार तुह्मी, आह्मी ताबेदार, चाकरी सांगाल ती करा-वयाची, जाणूनच आहों'. असें उत्तर आल्यानंतर **जाधवरावांनीं** ऐकून, सर्वत्र मंडळीस पाय धुवावयास उठवून, आपण घरांत

तजविजीस गेले. तेथें **जाधवरावांची** पत्नी होती. त्यांनीं **जाधवरावांस** बोलावून, **मालोजी**बावाचे मुलास मुलगी देण्याचा प्रकार विचारिला. तो ऐकून घेऊन, बाईनीं **जाधवरावांचा** फार फार निषेध केला कीं, '**मालोजी** आपले पदरचा चाकर, आपणच लहानाचा थोर केला, त्याचे मुलास मुलगी, आपली देणें, चांगलें नाहीं. बराबरीचा सोयरा पाहून, मुलगी द्यावयाची'. त्यावरून **जाधवांनीं** पुन्हा **मालोजी**कडे सांगून पाठविलें कीं, 'लेंक लेंकीचीं बोलणीं हंसतात, बोलतात, ह्मणोन तोंच थार्‍या[1] धरून बसणें, समजदारांनीं बसूं नये; जेवणास यावें, जवावें; ऋणानुबंध, ब्रह्मसूत्र असेल तसें होतें'. असें सांगोन पाठविलें. त्याचें उत्तर त्याजबराबर सांगितलें कीं, 'ब्रह्मसूत्र, मातापितरांची वाणी, दहा ज्ञाती, गंगेचे साक्षीनें कबूल केलें असतां, तीं वचनें फिरतील कशीं? चौघांत बोलून नाकबूल केल्यास ईश्वरी ऋणानुबंध तसें होईल'. याप्रमाणें उत्तर करून, याच फाल्गुन मासीं तीथ आहे, लग्न करूं, भोजनास येऊं; नाहीं तरी आह्मीं इतक्यांचे मुर्दे होतील, मग होणार तसें घडेल. मधीं दुसरा वर, योजना होईल कशी'? असें निविष्टपणें, हिंमतीचें उत्तर सांगोन पाठविलें. त्याजवरून **जाधवराव** बहुत खिन्न जाले. आली मंडळी ती भोजनास बसवून, चौघांत बोलूं लागले कीं, 'पहा, या **मालोजी** राजे यांची जिद्द[2] केवढी आह्मांस? असें उत्तर सांगोन पाठविलें. त्यास लेंकलेंकी जेथें असतात, तेथें हंसतात, बोलतात, ह्मणोन त्या बोलण्यावरी कोणी जातो कीं काय? असे अविचारी आमचे घरचे ढालाइत शिपाई! आम्ही वाढवून, यांसी सरदारी शिलेदारींत दिली. आतां आमचेच मुलीविशीं आग्रह धरितात. मरावयास उदित जाले. असें दंडेल आहेत; मीच म्हणोन आजपर्यंत वडीळ यांची काढली. दुसरा कोणी

---

१. हट्ट. २. जिकीर.

असता, तरी तात्काळ शिक्षाच करिता. त्यांत **निंबाळकर** राजे होते. त्यांनीं उत्तर केलें कीं, '**जाधवराव**, तुमचे पदरीं रोजगार लहान थोर केला, म्हणोन जातींत उणें जालें कीं काय? त्यांत नीच होते, तरी मूळ यासच द्यावी, योग्य आहे. चौवांस त्यांनीं तीन वेळ वजा-विलें; ते समयीं ब्रह्मसूत्र असेल तसें घडेल; आम्ही, चांगलीं गोजिरवाणीं दिसतात ह्मणोन बोलतों, असें न म्हणतां द्यावयाची असें उत्तर कशा करितां केलें ? आतां संपादणीचीं बोलणीं बोलता. आम्हांस त्यांचा दरकार नाहीं व तुमचे कारभाराचा दरकार नाहीं; परंतु ऐकिलें तसें बोलतों; त्यांत तुम्हांस राग आल्यास येवो. आम्हांस वाजवी सांगा-वयाचें'. त्याजवरून **जाधवराव** निरुत्तर होऊन उगेच राहिले. भो-जनोत्तर विडे, पानसुपारी, अत्तरगुलाब, नाच, रागरंग जाले. त्यांत **मालोजी** राजे यांणीं सांगोन पाठविलें कीं, 'तुमची मुलगी आमचे मु-लास तुम्ही दिली; त्यास वद्यपक्षीं एक दोन तिथी चांगल्या आहेत; प्रयोजन करावयाची मर्जी असल्यास फार चांगलें आहे, आम्ही सिद्ध आहों. आपणांस अडचण असेल, ती आम्हांस सांगावी; आमचेवस्तु पार पडावयाजोगी असेल, ती पार पाडूं. वरकड तुम्ही नाकबूल दुसरी गोष्ट सांगाल तरी ऐकणार नाहीं. लढाईची मर्जी असली तरी कबूल आहे; परंतु लग्न करूं, सोडणार नाहीं. इतक्या-वरी आपली मर्जी. स्नेहानीं, आप्तकीनीं, ममतेनीं, जितकी मर्यादा, तितके विचारें फार फार समजोन वाढवूं नये; यांत चांगलें आहे'. हें ऐकून **जाधवराव** फार रागास येऊन स्वार, पागा, लोक तयार क-रून **राजा**चा गोट वेढा देवून मोर्चेबंदी करविली. तेव्हां **मालोजी**-बावांनीं आपली पागा व शिलेदार व लोक तयार करवून मोर्चे ठेविले. आणि रात्रंदिवस तयार होऊन राहून, **जाधवराव** यांस बादशहाचे

मुजरियास जावयाचें बंद केलें. हजारपांचशें सरंजाम घोडे, एकदिल द्रव्याधीश, वरदी पुरुष, भाग्यवान्, ज्याणीं जें मनांत धरावें, तें सिद्धीस ईश्वरीनीं न्यावें. असे लौकिकवान, ईश्वरी अंश, त्यांनीं **जिजाऊबाई, जाधवांची** कन्या, सून करावी अशी इच्छा करितांच, भगवंतानीं **जाधवांचे** मनांत आणोन, स्वमुखें कबूल जाले. पुढें पत्नीचे वाक्येंकरून, विकल्प मनांत आणोन, गैरवाजवी चालीनीं बोलून, करणें आरंभिलें. सातहजारी मनसबदारी, मोठे मरातबाचे सरदार, दरबारास जाणें येणें; तयारी केली असतां **मालोजी** राजे आपले सरंजामानिशीं अहोरात्र तयारीनीं असतच होते. बातमी समजतांच स्वार होऊन, शिंग वाजवितांच **राजाचे** लोकांनीं जमा होऊन, मार्गावरोध करावा, उठोन युद्धास प्रवर्तावें. तों यवनी राज्य, कोणे थरास जाईल नकळे, यामुळें आपली आगळीक होऊं न देतां चालावें, हें चांगलें जाणून वागत होते. तसेंच **राजाचाही** बेत. **जाधवांनीं** तरवार चालविली असतां पडोन मरावें. परंतु बोलला बोल सिद्धीस न्यावा. अशी उभयतांची अड पडून, सरकार दरबारीं जाणें येणें बंद केलें. **पादशहानीं** एके दिवशीं विचारिलें, '**जाधवराव** कचेरींत कां येत नाहींत'? त्याजवरून कारभारी, उमराव मोठे होते. त्यांणीं हकिकत जाली, तशी कच्ची समजाविली; तेव्हां हजरतीनीं उत्तर केलें कीं, '**जाधवराव** यांनीं मुलगी कबूल करून, आतां नाकबूल होण्याचें प्रयोजन काय'? त्या समयीं उभयतांचे पक्षपातांतील तिऱ्हाईत गृहस्थ होते, त्यांणीं उत्तर दिलें कीं, '**जाधवरावानीं** मुलगा शहाणा, हुशार, आप्तवर्गांतील जाणोन, देण्यास उदित जाले; परंतु **जाधवरावाचे** पत्नीचें ह्मणणें, '**राजे** आपले पदरचे सेवक, त्यांचे मुलास ही मूल द्यावयाची नाहीं. बरोबरीचा सोयरा पाहून वराड करावयाचें'. तेव्हां

पादशहानीं विचारिलें, 'बराबरीचा सोयरा पहावयाचा, त्यास हे जातींत कमी आहेत कीं काय'? त्याचें उत्तर **राजांकडील** अमिरांनीं सांगितलें कीं, '**जाधवरावांचे** भावबंदांतील शरीरसंबंधी आतां **राजांचे** घरीं आहेत, परंतु यांचें पदरीं बहुत दिवस आहेत, ह्मणून देऊं नये, इतकाच अर्थ धरून बाई बोलतात'? त्याजवरी पादशहानीं जाब केला कीं, 'सोयरीक प्रत्यक्ष यांची त्यांची नाहीं; कारण मिळोन हे सरकारी मनसबदारी, **राजे** त्यांचे दिमतीस, यामुळें सरकारचे अमीर उमराव सरदार, स्वजात पाहून, लग्न करावयाचा मनसबा असेल, त्यास हे॰ ही चाकर पादशाही आहेत, **जाधव** यांचेच चाकर कशानीं जाले? जातींत अंतर असलें, तरी आमचा उपाय नाहीं. वरकड बराबरीचा इरादा धरण्यास, ते चाकर मातबर, हे लहान, त्यांचें निसबतीस आहेत. याचा विचार निघेल. मूल कसला आहे, पाहूं. आणावा'. ह्मणोन वाक्य निघतांच, **राजांकडील** उमराव यांणीं **मालोजी** राजे यांजकडे सांगोन पाठवून, हजरतीचें भेटीस सर्वांस आणविलें. **राजांनीं** मुजरा करून, नजर केली. घोडे दोन चांगले मातबर बाकेसरंजाम दिले. पोशाक, जवाहीर वगैरे मेजवानगी सरंजाम पुढें ठेवून, हात जोडून अर्ज केला कीं, 'मी गरीब, **जाधव** श्रीमंत जाणून 'शरीर संबंधाविशीं बोलत नसतां, **जाधवच** बोलून, चौघांत कबूल होउन, आतां दिगर बोलतात; त्यांस आह्मांस व आमचे जातीकुळास बट्टा काय, त्याचें नांव ठेवून, पदरीं मुद्यानिशीं घालून, दुसरें वरास देतों ह्मणाल्यास नीटच आहे. तें न करितां करार करून, ठरून, नाहीं ह्मटल्यास, आह्मांस मूल दिली, ती दुसरियास देतों बोलों लागले. आह्मी ऐकिलें आणि विचार न केला, तरी नामुरादी[1] येती, त्यापेक्षां मरणें बहत्तर; परंतु **जाधवांची** शहानिशी खुदावंत आज्ञा करतील, तरी पुरवूं, नाहीं तरी ही दाली सरकारची आहे; इची शरम वाजबी

१. ना मर्दी.

जावसाल असला, तरी ठेवण्याचा हुकूम देणार खुदावंत समर्थ आहेत'. असें कितीएक प्रकारें नम्र विनयतेनीं मिष्ट भाषण केल्यावरून, अंतःकरणांत अतिसमाधान पावून, उत्तर देते जाले कीं, 'जाधवराव बायकोच्या नादानीं बोलतात. हे शहाणे मर्द कुलीन आहेत. जवळ असावयाजोगे मनुष्य, प्रामाणीक, हे चाकर ह्मणोन मूल द्यावयाची नाहीं, हें ह्मणणें चांगलें नाहीं. कोणी जाधव यांजकडे स्वार कारकून पाठवून विचारावें. त्यांचें काय ह्मणणें तें ऐकून सांगूं'. त्यावरून वजिरांनीं मोहिते व निंबाळकर सरकार दौलतदार चाकर यांस पाठवून, जाब आणविला. त्यांचें निविष्ट बोलणें जे, 'हे आमचे घरचे प्यादे, यांस आमची मुलगी कशी द्यावी? बराबरीचे सरदार सोईरे, आज अगदीं नाहींसे होतील, तरी यांचे घरीं मुलगी देऊं'. हें उत्तर हजरतीनें ऐकून, आह्मी सांगून पाठविलें असतां, ऐकत नाहींत, त्यापेक्षां जाधव दंडेल; ह्मणोन मालोजी राजे यांस बोलावून आणोन, पंचहजारी मनसबदारी किताब देऊन, खिलत सरंजाम, शिवनेरीचा किल्ला व चाकण चौऱ्यायशी वगैरे गांव, परगणे, महाल देखील वस्त्रें शिक्यासुद्धां देऊन, आपण राजांचे डेऱ्यास जाऊन, बहुतबहुत खातरी करोन, जाधवाकडे सांगोन पाठविलें कीं, 'तुह्मी सप्त हजारी मनसबदार, तसे राजे पंचहजारी मनसबदार, सरकारचे चाकर आहेत. यास वचन देऊन, लग्नाविषयीं तुह्मी नाकबूल जाला; परंतु वराचे वडील आह्मी, आह्मांस हें लग्न कर्तव्य; तुह्मी वधूकडील सरंजाम सिद्ध करून, लग्नास उभें रहा, हें चांगलें; तुह्मांस दुसरा वर मुलीस आह्मी करूं देणार नाहीं'. याप्रमाणें साफ सांगा. हीं वचनें ऐकून, जाधवराव यांस लग्नास उभें राहणें प्राप्त जालें. दोहीं कडील तरतूद हजरतीस करणें, त्यांत

स्वांगें राजाकडे येणें जाणें, न्यूनपूर्ण करणें, पाहणें, सांगणें विशेष. याप्रमाणें होऊन ज्येष्ठ शुद्ध दशमीस लग्न जालें. शहाजी राजे यांचें वागणें हजरतीजवळ. जनानखान्यांत सर्व ठिकाणीं कोठेंच मनाई नाहीं. पादशाही चिरंजीव अशा भावें वागणें. यामुळें बायकामुलासुद्धां बादशहाचा लोभ जाहला. ईश्वरी कृपा, याजमुळें शहाजी राजे अती चतुर, हुशार, इंगितज्ञ, हजरतीचे मनांत येऊन, बोलणें होतांच तें जाणून हजरतीची सेवा परमनिष्टेनीं ईश्वर सदृशें वडील तद्रूप दिवसें दिवस प्रेमाची वृद्धि करून घेतें जाले. जाधवराव यांजकडून जिजाबाई साहेब शहाजी राजांचें लग्न केलें. त्या समयीं जाधवरावांकडील कामदार नारो त्रिंबक मजमदार हणमंते, व गोमाजी नाईक पानसंबल हवालदार, इतबारी, बायकामुलांत इतबारानीं वागणार, विश्वासू, खातरजमेचे जाणून, जिजाऊ साहेबांबरोबर दिल्हे. मालोजी राजे वेरूळ, दौलताबाद, वावी, वगैरे पाटिलकी करून होते. दौलतदार पंचहजारी मनबदारी वगैरे किल्ले व महाल मुलुख लग्न जाल्यापासून दिवसेंदिवस हजरतीनें कृपा करून दिल्हे. त्याच्या पादशाही सनदा देविल्या. दौलतवंत ईश्वरी अंश, जें मनांत आणावें, तें कार्य सहजांत व्हावें; परइंगित जाणावें, मर्म दुसरियाचें लोपवावें, उपकारांनीं जोर करावा, आपले कस्यपीं लावावा, त्याचें कार्य निजांगें करावें, अन्नविषयीं विन्मुख न व्हावें, असेल त्यांत सर्वांस घेऊन, गोड करून दाखवावें; हे एवढे थोर गृहस्थ, साक्षात्, ईश्वरी अंश परंतु विदुराच्या कण्या भगवतांनीं सेवन केल्या, तसेंच माझे भाकरीसमान दिल्हा; त्यास चटणी देखील चांगली नाहीं. अशा समर्थाचे चालीस, आपले चर्माचा जोडा करून पायीं लाविला, तरी उत्तीर्णता होणार नाहीं. काय पूर्वार्जित ऋणानुबंधाचे योगें माझे वचनास या भाकरीविशीं मान दिल्हा, हे भगवान् जाणत

असेल तें असो. अशा सरदाराचे सेवेविषयीं देह गेला, तरी बेहेत्तर आहे, अशी वारंवार स्तुति करावी. येणेंकरून किती द्वेष असला, तरी अन्नाचा मारला, वर मान करूं शकत नाहीं. त्यांत त्यांचें भूषण वर्णन करावें. तेणेंकरून माझे ठाई हा थोर मनुष्य हजरतीचे कृपेंतील, काम काजांत वागत असतां, माझे ठायीं अप्रतराणिक लोभ; खाण्यापिण्यांत कोणतेही जागीं प्रतरणा नसतां, मी यांशीं द्वेष धरिल्यास ईश्वर, कल्याण माझें कदापि करणार नाहीं, जाणून दुर्बुद्धि सोडून राजांचे करण्यास अनुसरोन महत्संकटोचें कार्य न होत असेल, असें असेल तें राजांकडे मनास आणोन, उलगडावयाची हजरतीची आज्ञा जाली असतां सहजांत कार्य करून वरचेवर जाब घ्यावा; तेव्हां वादविवादी पंचाइत करितां बसले. त्याणीं ती कार्ये राजांची पाहून'दोघे वादी यांणीं आपले रजावंदीनें हजरतीचा हुकूम घेऊन, आपलाले किस्से सांगावे. चौघांनीं ऐकावें, त्यांत भवती न० भवती होऊन, दोंचहूं दिवसांत तो वाद उडगडून, फारखती करून घेऊन, सरकारास समजावून, हजरतीचे समक्ष सिके करून देऊन, मार्गास लावावें; येणेंकरून दिगंत कीर्ति होऊन, वर्णन विशेष करिते जाले. योग्यता मरातब दिवसेंदिवस मोठी दरजानीं सरकारानीं वाढविलें; व राजे ही तशाच निष्टेनें राहिले. मालोजी राजां पेक्षां शहाजी राजांची बुद्धि तीव्र, कुशाग्र बुद्धि; जो जिन्नस पाहिला तो कल्पना बसवून तसा कारागिरापासून करवून, हजरतीस आणोन दाखवावा; असल नकल वोळख पडूं नये, असे तऱ्हेनीं करावा करवावा. मसलत, राजकारण, विचार, प्रसंगीं शहाजीराजे, लहान वय परंतु सल्ला घेतल्या शिवाय बैठक मसलत व्हावयाची नाहीं. मालोजी राजे सत्वस्थ, देवाब्राह्मणांचा ठाई भक्ति पुरःसर निष्ठा,

यामुळें त्यांचे वंशीं साक्षात् विष्णु अंश **शहाजी** महाराज सर्व गुणप्रवीण **जिजाबाई**साहेब लक्ष्मीचे रुपें मनुष्याकृतीनें **राजांचे** घरीं प्रवेश करून, अमोल्य वस्तु प्राप्त होऊन, संपूर्ण चातुर्य, सदनाचे × ठाई मनुष्यामनुष्य हुशार, तेथें घरचे अधिकारी खावंदनामा ( ? ) प्रसिद्ध असे प्रकारें नहुते. सर्व स्वांगें कला, गुण, विद्या, विचारवंत हाते. धीर, वीर, सुशील, आचारशील, कर्मनिष्ठ, सदोदित सेवा-भजनीं सादर, हजरतीची कृपा चिरंजीवावरी सर्वोत्कृष्ट जाणोन, **मालोजी**राजे वयस्क जाले. सदाचार, पुराणश्रवण, वेदधर्म. व्रत-वैकल्य, संपादून, नित्यान्हिकारूप राजसभा मंत्री दर्शनादि एकावचछेदें करून चिरंजीवावर भार ठेवून, आपण वडीलपणें कांहीं योग्यायोग्य पाहून, मनास आणोन हजरतीची आज्ञा घेऊन, घरास-यावें; नंतर श्रीशंकर शंभुमहादेव येथील देवालय व तलावें बहुत पुरातन होता, तो भरून गेला; यात्रेस पाण्याचें दुर्भिक्ष बहुत पडत होतें, यामुळें हजारों रुपये खर्च करून, जीर्णोद्धार केला. **मालोजी** राजांस धाकटे पुत्र **शरीफजी** जाले होते, त्यांस शरीर संबध आप्तवर्गात कुलगोत्र उत्तम पाहून, त्याचें लग्न केलें. नंतर **शहाजी** राजे यांस प्रथम पुत्र पंचवीस वर्षांचे वयांत **संभाजी** राजे **जिजाबाई** साहेब यांचे पोटीं जाले. पातशहानीं मोठा समारंभ केला; वस्त्रें भूषणें, अलंकार, परगणें व किल्ला बक्षीस देऊन, **राजांचे** घरीं कचेरीस आले; सत्कार केला. **जाधवरावानीं**ही उत्साह केला; नाच, रागरंग, घरोघर, वस्त्रभूषणें, भोजन, मेजवान्या, जाल्या; ब्राह्मणभोजन, दक्षणा, देकार, संभावित पंडित जनांस

---

× येथें जागा कोरी टाकली आहे, यावरून लिहिणारास त्याचें नांव माहित नव्हतें असें दिसतें.

महावस्त्रें व महादक्षणा; भाट, बंदीजन, गवई, गोसावी, हरिदासादिकांचा सन्मान केला; स्तुति विशेषात्कारें करिते जाले; मोठा आनंद नगरींत व राज्यांत जाला. जाधवरावाचा लोभ जावयाचे ठिकाणीं, व राजेही गुणी; आज्ञा वंदून मर्जीप्रमाणें चालणें, वागणें; जशी लग्नापूर्वी स्तुति केली, तद्वाधिक्य अनुभवास आलें. स्वपत्नीस एके दिवशीं एकांतीं बोलूं लागले कीं, 'हा मूल चांगला गुणी आहे; यास मूल द्यावयाची नेमस्त केली असता, तुमचे दुराग्रहानीं नाहीं ह्मणतां, ईजरतीचा दुराग्रह पडोन, त्याजला ही मनसबदारी देऊन, आमचे बराबरीचा किताब दिला, वाढविलें, आणि घरांत, दारांत आम्हांस परवानगीचा अटकाव लागतो; त्यास एकांतीं, लोकांतीं जाण्यास येण्यास मनाई नाहीं; तद्रूप होऊन तेथें आमची मर्यादा ठेवितात; वागणूक, योग्यता अंतरगत आह्मांहून त्याची विशेष; इतकी सलगी करून, अमर्यादा करून घेत असतील ह्मणावें, तरी आपले कृत्यानीं जाणें, येणें, बोलणें, बसणें, कोठें व्यंग राहत नाहीं; रीतिस्थितीनें राहतात, हें पाहून मनांत संताप वाटतो; परंतु लोकलज्जेनीं बहुत खपा होतो; कारण आपले पदरचे असोन, पादशहा आमचेपेक्षां लोभ, प्रतिष्ठा त्यांचेठायीं वाढवितात. तुमला विषाद या गोष्टीचा येतो किंवा ऐश्वर्यवंत जाले, येणेंकरून सुख वाटतें, तें सांगावें'. त्याचें उत्तर बाईनीं केलें कीं, 'तुह्मांस कांहीं सुख आहे, यावरी तुह्मी समाधानें राहता; परंतु मला कन्या व जांवई उभयतां दृष्टीसमोर नसावींत असा क्रोध उत्पन्न होतो; परंतु आपले मर्जीपुढें लाचार.' असें वचन ऐकून जाधवरावाचेही मनांत कांहीं द्वेष राहूं लागला. बाह्यात्कारें मनोधारणा ठेवीत होते. त्या काळीं मालोजी राजे यांस कांहीं रोगाची व्यथा उठोन, मासपक्ष हैराण राहून कैलासवास केला. उभयतां पुत्र

पादशाही चाकर, उमराव; राजे बहादर, लौकिकवान, गुणज्ञ, हजरतीनीं जातीनीं येऊन, शांतवन केलें. दररोज हुक्का अंतरगतांतील पाठवून, समाचार घेत असावा; न्यून पदार्थ पुरवीत असावों; असा केवळच लोभ विशेषात्कारें करून लालन ठेविलें, यामुळें शहाजी महाराजांस दुःख वाटलें नाहीं. आपला आईबाप, तो स्वयमेव हजरत पादशहा, असें चित्तांत वागून, स्वस्थ राहिले. नंतर तवहिरी निजामशाह पादशहा दौलताबादकर, यास आजार कांहीं एक न होतां, हुशार असतां, मृत्युव्यथा उद्भव जाला; हें जाणून हजरतें खबरदार, याजमुळें सावाजी अनंत कारभारी बहुत चतुर, गुणज्ञ सर्व कलानिपुण, विद्वान्, सव्यापसव्यांत लिहिणार. धुरंधर, कोणत्याही गोष्टींत उणें नाहीं, असे दक्ष होते. त्यांनीं संपूर्ण दक्षणप्रांत, हजरतचि अंमल, तितक्याची नजर पहाणी केली. ते समई विघाटीचो काठी सात हात, पांच हात, त्याजवरी दस्त काय, हक्कदाराचा अंमल किती, सरकारी कानूकायदे काय, रयतेस सूट कशी असावी, अर्जबाब कशी द्यावी, व्यापारी उदमी यांणीं सरकारी भरणा कोणता करावा, त्याची बरदास्त कोणती ठेवावी, इत्यादि धारे बांधून, वसाहत पडित रानाची लागणी करून केली; याजमुळें त्यांसच चतुर सावाजी ह्मणत होते. त्यांचा मरातब पादशहा जवळ फारच फार; केवळ विश्वासांतील वागणार, त्यांस बोलावून आणून, शहाजी राजांचे हात त्यांचे हातांत घालून ‘ उभयतां तुह्मी सेवक नव्हे, चिरंजीवांतील जाणोन, विश्वास ठेवून वागलों; पुढें आमचे समाप्तीचा काल समीप आला; तुह्मी हुशार आहांत, ह्मणोन सुचवितों. दिल्लीपतीचा आमचा द्वेष आहे; त्यांत मुलें अज्ञानसज्ञान तुम्ही जाणतां, त्यापेक्षां दौलतीचा बखेडा होऊ न देतां आजपर्यंत चाललें असेंच पुढें चालवून, मागें कीर्ति उरे असें करावें’.

ह्मणून बहुत प्रकारें समजावून सांगोन, ~~चार सुजन~~ थोर, सत्पात्र त्यांचें विद्येंत प्रवीण, निर्लोभ, त्यांजला आणवोन, कुराणें वाचावयास लावून, घरांत बायका मुलांचें समाधान करून, चतुर साबाजी व शहाजी राजांचे स्वाधीन परस्परें हातांत हात एकमेकांचे घालून, सोंपणूक करून, आपण आत्मानात्म विचारीं नासाग्रीं दृष्टि ठेवून, निर्गुण निर्विकार जगदीश, निरामय निराभास जगन्निवासस्वरूप लक्षांत आठवून तद्रूप होऊन, चैतन्यीं चैतन्य एकवटून, पंचभूतात्मक देहाचें विसर्जन केलें? तें सर्व लोकीं पाहून, पादशहा केवळ मायबाप दुसरा अर्थंच धणीपण्याचा ज्याणीं प्रजेस दाखविला नाहीं. त्याणीं परम साधन केलें. हें पाहून संपूर्ण प्रजा, सेवकजन आदिकरून, पृथ्वी लिंगरूपी सांब परब्रह्म जाणून, अभिषेक करिते जाले. कोणासच धैर्य होऊन, प्रेतसंस्कार यवन धर्मानुरूप यथा चालीनीं करणें त्यास विलंब होऊ लागला. हें शहाजी राजे याणीं जाणून, चतुर साबाजी महासूज्ञ असोन, मायामोहांत निमग्न जाले, पाहून तत्काल राजे यांनीं धर्मचालीनरूप सर्व साहित्य आणून, तयारी करविली. पंतांस सावध करून, देहधर्मव्यवस्थेचा विचार मनांत आणा, या मायामोहांत तुह्मी नौकारूपें तारूं होऊन, सर्वांस पैल-पार करावें, तें राहून अज्ञानप्रवर्ती लोकांस बागण्यास चाल करिता हें नीट नाहीं. समर्थांनीं समर्थ चाल आबालवृद्ध निभे अशी लावावी. तेणेंकरून इहपर योग्य धर्म राहतील., असें बोलतांच पंत शाहणे, इतका इशारा होतांच, पुत्रांदिकांचें शांतवन करून, पादशहाचे देहास रोजास नेऊन, कबर करवून, सर्वत्र परतून आले. राजपदीं उभयतां पुत्र वडील आठ वर्षांचा, धाकटा पांच वर्षांचा याप्रमाणें होते. तक्तनीस करावे, तरी एकाकरितां एक रडणार.

याकारितां उभयतां मुलांस तख्तनीस केलें; परंतु अज्ञान मुलें, शहाजी राजे चालक, त्याजविना एक क्षण राहत नव्हतीं; तीं तख्तावरी मुलांस बसविलें असतां, बरती जवळ बसावयाकारितां दोघांनीं मनस्वी रडावें; पदरचे लहान थोर सेवकांस मुजरा आदब करणें, तीं या करण्यास अव्यवस्थित, याजमुळें बाईनीं राजांस मुलांस तख्तावरी घेऊन तुह्मी बसावें., ह्मणून सांगितलें व सांगोन कचेरींत पाठविलें. तत्रापि राजे विचारवंत, तख्त ईश्वरी गादी, त्याजवरी बसणें मुनासब[1] नाहीं, जवळ आहें ह्मणोन सांगोन पाठविलें. बादशहाजादी[2] रागास आली, तेव्हां चतुर साबाजींनीं राजे यांस सांगितलें कीं, ' खांवदांची आज्ञा तसें चालावें. त्याचें उत्तर राजांनीं केलें कीं, 'आपण सांगतां व खावंद आज्ञा करितात ती मान्यच आहे; परंतु मी मुलांस घेऊन बसलों, तरी जाधव आमचे सासरे, तसेंच निंबाळकर, मोहिते, महाडिक, शिर्के सर्व आप्त, यांणीं हजरतीस मुजरा करणें, मी मुलांस घेऊन बसणें, त्यांचे विषाद वाटणें, राज्यास अपाय होणें, हें सर्वथैव चांगलें नव्हे. खांवद धणीच आहे, तुम्ही सर्वत्र असोन सल्लाह[3] ही कशी देतां '; ह्मणून जाब दिला. त्याजवरून चतुर साबाजींनीं उत्तर केलें कीं, ' मुलें आज्ञान आहेत, तीं जाणतीं होऊन, मानापमान जाणते होत, तोंपर्यंत तुम्ही तख्तावरी उभयतांस घेऊन बसत जावें. आम्ही मुजरा करीत जाऊं ह्मणजे जाधवसुद्धां तसलमात[4] बजावण्यास दिक्कत[5] करणार नाहींत. मी जे दिवशीं दुसरी कल्पना तुमचे विषयीं मनांत आणीन, ते दिवशीं तुम्ही बसूं नये,. याप्रमाणें सांगितलें. हें

१ उचित. २ राज्यकन्या ( बेगम ) ही. त्या मुलांची मातुश्री. ३ अनुमति. ४ तीव्र रीति. ५ हरकत.

बोलणें घरांत एकांतीं जालें. याच्या वर्त्या, अमीर उमराव यांजकडे जाऊन पोंहचल्या. तेव्हां लहान थोर सेवकजनांनीं विचार केला कीं, 'बादशहा वर्तमान असतां, हजरतीनें राजांनीं एके गादीवर बसावें, आह्मी तसलीम करावी, ते समयीं आह्मी दुसरी कल्पनाच केली नव्हती. आतां स्त्रीराज्य बालराज्य जालें. आतां यांत विषम मनांत आणोन दौलतींत बखेडा करावयाचा नाहीं. त्याचें अन्न लेंकरांलेंकरीं खात आलों व पुढें खाणार; त्यापेक्षां खावंद सुखी राहून, नजरेनीं पाहतील, हुशार होऊन, परीक्षा करतील, त्यासमयीं जें बोलणें तें करूं; परंतु आतां वांकडें करावयाचें नाहीं., असा सर्वांचा एक विचार आपआपले जागीं जातजातीनीं घरीं केला. याची प्रगटता मंडळींत जाली नाहीं, दुसरे दिवशीं कचेरीचे समयीं मुलांस जाण्याविषयीं पादशहाजादीनें हुकूम केला. तेव्हां तीं मुलें आईस ह्मणूं लागलीं कीं, ' आई , शहाजी आमचे नजीक बसेल, तरी बाहेर जाऊं, नाहीं तरी नाहीं, तव्हां बसतील ह्मणून सांगितलें, परंतु तूं आई आमचे समक्ष, जवळ बसावयास सांग, ह्मणून बसलीं. ते समयीं शहाजी राजांस बोलावून आणोन, हुकूम केला कीं, ' तुह्मी उभयतां मुलांस तख्तावरी पुढें घेऊन, ज्याचा जसा दरजा मामुल चालत आला, त्याप्रमाणें शिकवून चालवीत जाणें. मुलांस रडूं देऊं नयेत, अशी ताकीद करविली. निरुपाय जाणोन, आज्ञा वंदून, तोच सुमुहूर्त करून, मुलांस घेऊन येऊन तख्तानीस जाले. नंतर साबाजी, जाधव आदीकरून अमीर उमराव सहित, तसलीमात बजावून, बंदगींत हात जोडून चतुर साबाजी हकीगत समजाऊं लागले कीं, 'खुदावंद, कोणी एक ब्राह्मणाची पत्नी, तरुण, स्वरूपेंकडून दिव्य असोन, सुशील-

१ बातम्या, ताकिदी.

संपन्न, ती गंगेस धुणें धुवावयास गेली. तेथें अमूक नवाब पाठी लागून, तिचे घरीं आले, तिणें या नवाबास पाहिलें नाहीं. मागें यवन लोक मनांत आणून, घरांत जाण्याची शंका करून, घरीं सासरा, दीर, नवरा, आदीकरून लहान थोर बसले, त्यांशीं बोलूं लागले कीं, 'ती बायको बाहेर आणोन, मग मी कोण, काय तें मला विचारा,' असें ह्मणतांच तिजला बाहेर बोलावण्याकरितां दीर घरांत गेला. त्याणीं चौकशी केली. त्यांत तिजला संभूती (?) कां हीच श्रुत नाहीं; रडून शफता करूं लागली. ते समयीं दारीं नवाब थोर माणूस जाणून, बाहेरील खोलींत तिला उभी करून, नवाबास विचारूं लागले. तेव्हां त्याणीं सांगितलें, 'ही स्त्री दोन वर्षें लागू आहे. माझी व इची परम दोस्ती; उद्यां 'मला दौलताबादेस जावयाचें, सांगितलें. त्या वेळेस 'मीही येतें,' कबूल जाली. आतां ती व मी पुलावा वगैरे खादला. नंतर चल ह्मणून विचारितां नाकबूल जाली. यावरून मी तुह्मांकडे आलों. ही नापाक स्त्री, भ्रष्ट तुह्मी आपले घरीं ठेवूं नये; हें खोटें ह्मणाल, तरी जेवलेले पदार्थ आतां धुणें घेऊन आली, त्यांत तिणें संध्याकाळाकरितां तिणेंच बांधून आणिले आहेत, खरें कीं खोटें पाहून घ्या, ह्मणजे सत्य माझें बोलणें असेल, तरी ही स्त्री माझें स्वाधीन करा, दोन रुपये तुह्मांस मी देईन; कां तुमचा पैसा शादीस लागला व दोन रुपयाचे नगनगोटी ही आहेत, तितके तुमचे उलगडण्या पुरतां पैसा देईल असें बोलल्यावरून तिच्या नवऱ्याचे अंगीं रोमांच उभे राहून, नेत्रांत जहर चढलें. कारण तिचें व तिचें नवऱ्याचें परम अतःकरण एक, सर्वगुणें व रूपेंकरून रंभेचीच उपमा, द्वैत नसतां, जारत्व करावयास इजला वेळ एक मध्यान्हीं गंगेस

---

१ ह्मास.

आवयांचे; वरकड वेळ घरांत असोन, हे कौटिल्य करील, अशी खातर वाटत नाहीं. परंतु यवनाचे बोलण्यावरून चौकशी करितां; धुणें बाहेर आणोन पाहतात; तों सारे धुण्याचे खालीं यवनी रुमालांत गव्हाच्या चपात्या पांच चार, व त्याजवरी पुलाव व मांस पचित; भक्षणीय पदार्थ एक दोन होते; परंतु विसकटले, अगर खादल्याचें चिन्ह गांठ प्रथमचीच वस्त्राची होती, ती त्याणीं मनांत आणोन, असा समय प्राप्त जाल्यावरी; चार आप्त लहान थोर सर्वांचीच खातर तिजविशीं होती. त्याणीं किसा पाहून; त्याजला घेऊन सुभ्यास नेऊन, हकिकत समजाविली. तो त्या सुभेदाराचे बायकोचा भाऊ समजला; परंतु इनसाफाकरितां उभयतांसही वाड्यांत आणून; एकदृष्टि होऊं न देतां; एक सोपा होता; त्यांत दोन खोल्या मधीं होत्या, त्या खोल्या मधील खोलींतून पार, त्या खोलींत जाण्यास मार्ग नाहीं; मधीं भिंत तिजला जाळी दृष्टि पोंहचावया जोगी होती; तेथें कोंडून ठेवून दोंही दारांशीं पाहरे चांगले दुहेरी बसवून, जातीनीं हुशारी ठेविली. कारण ब्राह्मणी वस्ती बहुत, हा आपला साला, याची गोष्ट खरी असली; तरी उद्यां शहरचा लोक तमाम ह्मणूं लागेल कीं, 'चांगली बायको पाहून, तुफान घेऊन घरांत घालतात, दाद लागत नाहीं, असें होईल. याजकरितां जातीनीं चोरून येऊन, चौकशी करून जावें. त्या पाहण्यांत अर्धी रात्र गेल्यानंतर नबाब विप्र स्त्रीयेशीं बोलूं लागला कीं, 'पहा तूं मजला अनुकूळ आहे, असें ह्मण, ह्मणजे संपूर्ण माझी दौलत आहे, ती तुझे स्वाधीन करीन. दिकत धरूं नको. मी दोन वर्षें प्रयत्न तुजसाठीं करीत होतों. परंतु तूं गांठच पडूं दिली नाहींस. आतां कशी कबजेंत आलीस ? इतकी सख्त कैद भोगतीस, यांत तुजला फायदा काय आहे? राजी जाली तरी, ज्याणीं कैद केली, तेच त्याच्या

स्त्रिया तुझा आदर सन्मान करतील. इतकी तसदी मला आहे, म्ह-णशील, तरी मला तसदी काडी मात्र नाहीं. आम्ही त्याचेच आस, तुझे अंगीं मुद्दा मी कशा हिकमतीनें लाविला?' असें कितीएक प्रकारें बोलत होते, तें पहारेकरी सुभेदार यांनीं ऐकिलें. दहा पांच साक्षीस होते, तेव्हां मुसलमानानीं आदावत करून, ब्राह्मणाचे स्त्री-वरी लबाडीनें आदावत घेतली, ही खातरी जाली. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं चार संभावित लहानथोर जमा जाल्यानंतर नवाबास बोलावून आणोन, त्याची जबानी लेहून घेत-ली होती, ती जवळ घेऊन, त्यास विचारूं लागले कीं, 'ही स्त्री तुह्मांस कशी अनुकूळ जाली, यास कोणी मध्यस्थ आहे किंवा जातीनें वश कशी केली, तो तपशील सांगा, 'यांत दुसरा मध्यस्थ नाहीं' हीं अक्षरें स्पष्ट निघालीं; परंतु जातीनें राजी केल्याचा पर्याय त्वरित उच्चारावयास वाणीस रोध होऊं लागला. तें ध्यानांत येऊन, चौघांस विचारूं लागला कीं, नकळे, स्त्रीयांचे जातीचीं कौटिल्यें कशीं असतात! परंतु याचा व तिचा दोन वर्षे समागम जाला. त्यापेक्षां मांसादिक भक्षण करीत आली. याचा बाजिन्नस मुद्दा यांणीं दाखविला. त्यापेक्षां याची परीक्षा पाहिली पाहिजे, ती परीक्षा कशी करावी? हें विचारतां कोणी बोलेनात; तेव्हां त्याणींच कौसपात्र विस्तीर्ण आणून, त्यांत तेल घालून, त्या नवाबाची व त्या स्त्रीयेची करांगळ्या किंचित् चिरून, रक्ताचे बिंदू तेलांत सोडिले. ते एकत्र न जाले; दोन्ही रक्तें वेगळालीं जमून राहिलीं, पाहून रात्रीचें बोलण्याचे मुद्दकरी आणोन रुजुवात करून, लबाड ठरावून, त्या ब्राह्मणपत्नीचा गौरव करून, साडीचोळी व भूषणें देऊन

१. कटई.

पालखींत बसवून, वाजतगाजत, बहीण ह्मणवून, घरीं पोंहचती केली. नवाबाचे घराची जप्ती करून, जिन्नसमात्र भरून, सरकारांत आणिली. आप्त, मेहुणा, ह्मणून शिक्षा करावयास आळस केला नाहीं. वास्तविक न्याय केला. उठोन जावें, तरी काविलेदार अमीर, याजमुळें लाचार होऊन, हजरती जवळ येण्यास शरम प्राप्त होऊन, कचेरीस न आले. पुढें त्याणीं कोणत्या पर्यायें वागले. त्याविशींची आज्ञा जाली पाहिजे. ते समईं हजरतीचीं दोन मुलें अधिकारी, परंतु प्रौढ नाहींत; याजमुळें शहाजी राजे यांस उत्तर देणें प्राप्त आलें. तें उत्तर 'थोर सरदार असोन, दुराचरण केलें, त्याची शिक्षा सुभेदारानीं यथामार्गें केली. पुढें बरतर्फ जाले, तेव्हां कुटुंबाचें कसें चालावें, हा हेतु आहे; त्यास चौऱ्यावरी दररोज एक रुपया पोटास देत जावा, ह्मणजे निर्वाह चालेल. ते लोक परीक्षक आहेत. त्यास क्षणक्षणीं शिक्षा लावीत जातील. या प्रमाणें हुकूम दिला. तो सर्वांस मान्य जाला. हुकूमनामापत्र पैठणास सदरहू प्रमाणें आलें. असे नीतीनीं राजांनीं राजधर्म चालविला. कांहीं एक व्यंग पडूं दिलें नाहीं. सर्वत्रांस राजे चांगले, यांचें उत्तरोत्तर कल्याण वृद्धिंगत असो, असेच सर्वांमुखीं वाजतें जालें. पांच सात वर्षें या प्रमाणें गुजरली. नंतर जाधवराव पत्नीशीं विनोदांत भाषण करीत असतां, जाधवरावानीं स्त्रीची निर्भर्त्सना अती केली. तें सहन न होय. ते समयीं तिणें उत्तर दिलें कीं, 'आमचे सुखदुःख आह्मीच स्वांगीं वागवितों. परंतु तुमच्यासारिखे आपले चाकर यजमानस्थानीं बसवून, त्यास हात जोडून, आर्जवात्र करीत नाहीं'. हीं अक्षरें दुःसह लागून, विरुद्धपणास प्रवर्त जाले. दिल्लीस संदर्प लावून,

१. कुटुंबवत्सल.

हजरती करून दौलताबादचे पादशाहीवरी रणमस्तखान पादशाही वझीर, दिल्लीपतीनें वस्त्रें फौज सारंजाम देऊन, रवाना केलें. त्याची बातमी हजरतीजवळ दौलताबादेस समजली. चतुर साबाजी व शहाजी राजे, जाधवराव, बसोन विचार करून, पुढें फौज तोंडावरी पाठवावी. असा पादशहाजादी व मुलें, यांचे आज्ञेनीं वस्त्रें देऊन, रवाना केली. दिल्लीपतीचा सरंजाम मातबर, चाळीस हजार स्वार शिवाय पन्नास, तोफा पायदळ, तेव्हां सामोरा सरंजाम गेला, तो जेरदस्तींत येऊन, दौलताबादेचे अमलांत येऊन, मुक्काम करून राहिले. हें वर्तमान कळतांच चतुर साबाजी व शहाजी राजे, जाधवराव आदीकरून, तमाम सरदार फौज पन्नास हजार घेऊन पुढें गेले; नंतर लढाई उभयतां फौजेची जाली, त्यांत जाधवराव यांणीं पळ काढिला. मूळचाच संकेत, फौजेंत मेळ नजरेस येईना, ते समई शहाजी राजे यांणीं चतुर साबाजी यांस विचारिलें. 'जाधवरावाकडील फौजेनीं पळ काढिला. आपली फौज हवालदील जाली, दुस्मन छातीवर चढला, आपण निघालों असतां, बसावयास जागा राहत नाहीं, आपली मर्जी कशी आहे, ती सांगा'. तेव्हां आपण पळावयाची सलाह द्यावी तरी दौलत गारत करितात. अपेश आपले माथां येणार, लढावें, तरी फौज सर्व बेदील आहे. मरणापेक्षां वाईट जाणोन राजांस उत्तर दिलें कीं, 'फौज-बेदिल, फितूर दिसतो; आपण लढलों, तरी लढाई आपले डोईवर येईल, यश अपेश ईश्वराधीन, परंतु वाईट जालें असतां जन्मांतून उठावें लागेल; त्यास तुमचे मागें मी आहें'. असें सांगितल्यावरून राजांनीं आपला सरंजाम एकीकडे उभा करून, चतुर साबाजी आदी मानकरी यांजकडे येऊन विचारलें कीं,

'पुढें मर्जी काय? आजपर्यंत लौकिक मेळविला तो बुडवून, खादल्या घरचे वांसे मोजावे हे, रीत नव्हे; त्यांत तुम्ही बु-नादी [ ? ] चाकर कामदार, आमची आपल्यापुढें बुद्धि किती? असें वाटून, जशी आज्ञा कराल तसें करूं' ह्मणतांच चतुर **साबाजी** यांणीं सर्वांस विचारिलें.; ते समयीं लहानथोरांनीं उत्तर केलें कीं, 'राजे यांणीं सांगितलें तें प्रमाण; या समयीं **जाधवांनीं** असें करूं नयें, परंतु केलें, त्यास उपाय काय? असो, एकदिलपणें एक वेळ आपण सर्वांनीं उठावणी करून उठावें, मग यश अपेश ईश्वर दे-ईल त्याणीं द्यावें. येणेंकरून निमकहरामपणा आपले माथां येणार नाहीं;' असें बोलले. तें चतुर **साबाजीस** मान्य होऊन, लहान थोर हत्यारबंद शिपाई, यांसीं हात जोडून, बोलते जाले कीं, 'आपल्या लोकांत हूवालदील जाली ह्मणोन तुह्मा सर्वांशीं बोलतों कीं, हजर-तीनें मरतेसमयीं दौलत सारी आपले स्वाधीन केली; मुलें लहान, आपण या समई पळ काढिला, तरी आजपर्यंत खाऊन हराम-खोरी आपले माथां येती, या करितां जिवाची आशा न धरितां, दुस्मानाचें शासन करावें; या समयीं बक्षीस द्यावें घ्यावें', असें बोलून पदर पसरून, सांगितलें. तें सर्वांनीं मान्य केलें, आणि सर्व दील एक होऊन, उठावणी केली आणि शस्त्राची लढाई जाली, त्यांत दिल्लीपतीची फौज नामोहरम जाली, पळ काढून पळूं लागली. बुनगे गांववाल्यांनीं वगैरे हरण केले. चतुर **साबाजीनीं** यश संपा-दन करून, ते दिवशीं मुक्काम करून राहिले. दुसरे दिवशीं स्नान-संध्या करून, भोजनें संपादिलीं. नंतर स्वार होऊन, दौलताबादेस येऊन, पादशहाजादीस व मुलांस नजरा करून, हकिकत सम-जाविली. बाई संतोषी होऊन, सर्वांस वस्त्र भूषणें अलंकार, जशी

ज्याची योग्यता, तशी त्यास अर्पून, सुखी केलें; आणि शहाजी राजे, यांजवरी कृपाळू होऊन, वजीरीचीं वस्त्रें दिलीं, व सारंजाम, किल्ले, कोट, देऊन सत्कार चांगला केला; संपूर्ण विश्वास राजांवर ठेविला. दौलतीचा कारभार, बरें वाईट करणें, ह्मणणें, हे राजांकडे; यांचें विचारें चतुर साबाजीनीं वागावें असें जालें, आणि जाधवरायास इतराजी होऊन, कांहीं महाल मुलकाची जप्ती केली; याजमुळें जाधवराव त्यागी जाले. वकील सरकारांत बोलणें बोलत; परंतु पादशहाजादीचे विचारास येईना; शहाजी राजे यांणीं रदबदल केली. त्यास उत्तर केलें, 'सप्त हजारी मनसबदार, सरकारी चाकर, इतबारी असोन, त्यांणीं दिल्लीस फंद फितुर करून, फाज आणोन, दौलत गारद करावयाचा इरादा धरिला; हरामखोर, याज विषयीं तुह्मी बोलूं नये. बोलला असतां परिछिन्न कार्यास येणार नाहीं. लढाईत जाऊन, आपण अगोदर पळ काढिला, असे इतबारी आहेत. तुमचे सासरे, ह्मणून रदबदली करितां कीं काय? परंतु मी या विषयीं तुमचे ऐकणार नाहीं.' असें एकांतीं लोकांतीं बहुत तऱ्हेनीं सांगितलें असतां, ऐकेनात. चतुर साबाजीसही माहीत, दिवसेंदिवस जाधवरावाची हलाखी होत चालली. चतुर साबाजीचे घरीं जाऊन, जातीनें रदबदली करूं लागले. तेव्हां त्यांणीं समजोन सांगितलें; तेव्हां ही खातरी जाली. मग चतुर साबाजीचें वचन, जाधवराव यांणीं घेऊन, दिल्लीचें राजकारण पुन्हां केलें; त्यांत सर्वांचा उच्छेद व्हावा, आपला अर्थ घडावा, त्याचा नेमधर्म ठरवून आणिला. मग शहाजी राजावरी आदावती करूं लागले. बाई व मुलें अनकूळ, यामुळें कांहींच अर्थ चालेना. एक दोन वर्षें अशीं लोटलीं. पुढें चतुर साबाजीचा काळ

जाला. शहाजी राजे एकटे; ते समई सरकारचा पोतदार होता, तो फार दिवसांचा, वृद्ध, त्याचा अंतःकाल समीप आला. तेव्हां त्याणीं आपले लेंकास घर दौलत द्यावी. तो पुत्र रांडबाज नियाला, संचित द्रव्याचा व्यय फार करूं लागला; सांगितलें, शिकविलें, ऐकेना; तेव्हां घरांतून बाहेर काढून लाविला, तो विदेशीं गेला, त्याचें ठिकाण नाहीं. पोतदारानीं शूद्री ठेविली, तिचे पोटीं पुत्र जाला. त्याजला संपूर्ण विद्या लिहिण्यासुद्धां, कला चातुर्य, अवगत केला. नीच वर्णाचे ठाईं बुद्धि विशेष, हा धर्मच नीतिशास्त्रीं आहे. त्या योगें अल्प आयासें आधीन जाला. विषयसंरक्षणीं दक्ष, शहाणा, संपूर्ण दुकानचा व सरकारी वहिवाट करूं लागला. सेटजीस जाण्याची गरजच नाहीं. नायकांनीं स्वस्थ स्नानसंध्या करून, पुराण श्रवण, दान धर्मीं कालक्षेप करावा. सायंकाल जाला, म्हणजे व्यवहार, गुमास्ते व चिरंजीव यांणीं येऊन, समजावावा; त्यांत खातीं पोतीं सर्व पहावीं; त्यांत प्रतारणा अगर लबाडी नाहीं, यथास्थित वहिवाट पाहून, आपलें चिन्ह करावें, अशी चालीची वहिवाट जाली; शेवटीं अंतःकाल प्राप्त जाला. पुत्र नाहीं. आपण दासीपुत्र अधिकारी केला, परंतु पुढें धणी अगर पुत्र येऊन, विवाद करतील, सबब दौलताबादेस चतुर साबाजी वर्तमान असतां हजरती सुध्दां दरकदार, कामदार, मुत्सद्दी, अमीर उमराव, सरदार देखील, जमीनदार, वतनदार, लहानथोर आणोन, माझा अंतःकाल प्राप्त जाला, हा माझा पुत्र आहे, दौलत, व्यवहार व्यवस्था यास दिली; याजवरी आपण सर्वांनीं कृपा करून, साक्षी लेहून द्याव्यात. याजवरून सर्वांस मान्य होऊन, लाख दोन लाख रुपये, सरकारांत नजर घेऊन, साक्षी सर्वांच्या करून दिल्ह्या. त्या

दुकानची वहिवाट, तो दासीपुत्र करून, कांहीं दिवस असतां, पुढें नाइकाचा पुत्र औरस वडील देशांतरीं गेला; तो भिकारी कंगाल येऊन दासीपुत्रास भेटला. त्याजला माहीत, वोळखीचा, एकजागीं खेळलेला, प्रौढ होऊन गेला, आठ नऊ वर्षे देशांतरीं फिरला. इतक्यांत वोळख मोडत नाहीं. लहान थोर हकीम दिवाणांत माहीत होता; तेव्हां आपला खावंद जाणून, त्याचा इतमाम, वस्त्रपात्र, जेवणें, खाणें वगैरे, बरदास्त जशी तीर्थरूपांची तशीच याचीही करून ठेविली. पांच चार महिने जाले; खिसमतगार वगैरे शागिर्द हलकीं माणसें जवळ राहणार, यजमान मूळचे जार, त्यांत समवई सेवक, शहरांतील अनेक ठिकाणच्या बातम्या सांगणार; तेव्हां एक दिवशीं एक स्त्री आणोन, तिजला रात्रीं विषय करून, बिदागीस चोळी सेलारी शंभर रुपये दिले. ते गुमास्ते यांणीं रोजखर्चांत लिहिले. सायंकाळीं जमाखर्च दासीपुत्रानीं पाहिला; त्यांत हे रुपयें यजमानाकड खर्ची लिहिले. गुमास्ते यास परवानगीच होती; माझा उजूर करीत जाऊं नये, तेव्हां त्यानलो काय बोलतात? खावंदाशीं बोलूं लागले कीं, या करण्यामुळें वडिलांनीं आपला त्याग केला; आपण मुलूख धुंडून आले असतां, आपली चाल जावी ते न जातां, आहे तशीच आहे; आपली पत्नी जवळ असोन, हें करणें उचित नाहीं. या करण्यानीं आपला आमचा सुरळीत वाहिवाट चालणार नाहीं. त्याजवरून उभयतांत विरुद्ध पडोन तंटा उत्पन्न जाला. तेव्हां दौलत माझी ह्मणोन, औरस पुत्र बोलूं लागला. तेव्हां याणीं त्याचे बापाचें पत्र साक्षी काढून दाखविलें. त्यांत तुझें नांव देखील नाहीं व वांटा अमुक अर्थाचा राखिला, ठेविला; असे काय आहे तें दाखीव. यामुळें दिवाण पाहणें प्राप्त आलें.

सरकारांत जाऊन बोलतां, 'घरधणी औरस पुत्र' सर्वत्र ह्मणत, परंतु त्याणीं कागद दाखविला, ह्मणजे मालक नव्हे असें ह्मणत. पुढें सारे कामदार व वतनदार यांणीं व्यवहार दासीपुत्राशीं घेण्यादेण्याचा केला. यासी अर्थ काय लेख, साक्षी आपल्या, त्याजवळ गुंतल्या ह्मणोन औरस पुत्रास साफ दिवाणानीं कचेरींत सांगितलें कीं, 'बाळा, तूं धणी खरा, परंतु तुझे बापानीं आह्मांस घरीं नेऊन, कागद लेहून देऊन, साक्षी आमच्या लेहून देविल्या, त्यांत तुझा संबंध ठेविला नाहीं. मालक दासीपुत्र, तूं त्याचा भाऊ, उगेंच ईश्वरप्रीत्यर्थ धर्मादाय त्यांणीं तुझी योग्यता ठेवून, चालविलें. पहा, ते अर्थी चालवूं नये, असें मुळींच बापानीं करून ठेविलें'. त्यावरून घरीं येऊन दिक जाला. पुन्हां कोणी उत्तेजन देऊन, वादास उभा केला. सहा चार महिने पंचाईत जाली. त्यांतही असाच न्याय ठरला. तेव्हां धक्के देऊन, पंचांनीं काढून लाविला. खोटा वादी, याजवळ अर्थ नाहीं, मग प्रतिष्ठा कशास ठेवावी? अप्रतिष्ठा चौवांत जाली. यामुळें रडत परत देशांतरास जावें, ह्मणोन निघाला. अश्रुपात चालले, असें एक सिदी देवडी पुढें पाहरीयावरी उभा होता. त्याणीं त्याचा किसा ऐकिला होता. त्याचे मनांत दया उपजोन, यास बोलावून, तूं कां रडतोस? ह्मणोन विचारलें. ते समई माझें कपाळ फुटलें, ह्मणोन रडतो सांगितलें. तेव्हां सिदीनीं उत्तर केलें कीं, तूं त्यागी होऊं नकोस, नीट सांग. त्याजवरून जाला किसा यथंभूत सांगितला. त्याजप्रमाणें ऐकून घेऊन, सांगितलें कीं, चतुर साबाजी वगैरे लहान थोर बसले, त्यांजकडे पुन्हां जा; त्यांस विचार कीं, माझा न्याय जाला, आतां माझा संबंध नाहीं, कीं मी उठोन जावें, तुमचे विचारास आलें, असें विचार. ते उत्तर करतील, तेव्हां मी तुझा वकील होऊन, त्यांशीं बोलेन; तूं मला एक

पैसा देऊं नको, मी मागणार नाहीं, हें माझें वचन घे, असें बोलून त्याजला घेऊन, परत कचेरींत गेला. दरबार कचेरी जाली पाहून, पुन्हां तो नायकाचा मूल जाऊन, हात जोडून शिकविलीं अक्षरें बोंलला. तीं ऐकून, सर्व लहान थोर हंसूं लागले. आतांच हा गांडगुडघे खाऊन गेला असतां, पुन्हां विचारावयास आला. वेडा ब्राह्मण, यास काय सांगावें? तेव्हां आणखी हात जोडून, पायां पडून विचारूं लागला कीं, मला उत्तर कांहीं तरी नीट सांगा, हंसूं नका. त्यावरून चतुर साबाजीनीं सांगितलें कीं, तुझा दौलतींत संबंध नाहीं; मूर्खा, मूर्खपणें काय विचारितोस? त्याचें उत्तर त्या ब्राह्मणाचे मुलापासून न होय. मग सिंदी पुढें येऊन, कुरनूष करून, हात जोडून, विनंती करूं लागला कीं, माझी विनंती एक आहे. याचा बाप मरूं लागला, तेव्हां धण्यानीं कागद करून दिला, तो खरा, आम्ही खोटा ह्मणत नाहीं, आम्ही सत्य मानितों; परंतु हा आमचे बटकीचा लेंक होय कीं नाहीं, हें सांगा. तेव्हां खरा आहे, ह्मणोन उत्तर दिलें. त्याजवर सिंदी बोलला कीं, दौलतीचा कागद करून घेतला तसा बटीकपणापासोन आईची सोड व लेकवळेपणापासून या गुलामाची सोड, याचा दस्ताऐवज काढून दाखवा, मग आह्मीं बोलतों, हें सर्व खोटें. त्या वरून न्यायाची गोष्ट बोलला, हें ऐकून त्या दासीपुत्रास सोडचिठी मागूं लागले. त्याणीं हा कागद दिला, या शिवायमजजवळ दुसरा दस्ताऐवज नाहीं, ह्मणतांच सर्वांच्या न्यायास आणोन, हातीं धरून, त्या मुलाचा जोडा हातीं त्याचे देऊन, पोऱ्यांत उभा केला; आणि तो सिंदी चतुर साबाजीशीं बोलूं लागला कीं, हा मूल विषयीं, बाप याचा फार शहाणा होता; कसा ह्मणाल तरी, जर करितां भाग दौलतीचा केला, तरी त्याला हात पाय लावून,

हा लेकवळा बुडवील. या.साठीं दौलत त्यासच लेहून दिली; ह्मणजे तो जपून प्रपंच करून, दौलत संरक्षील; हा येऊन, दौलत सांभाळील. असा विचार करून, धण्याचे साक्षीनें व्यवस्था केली. दौलत काय, त्याची माहिती खावंदास आहेच. असें उत्तर केल्यावरून चतुर **सावाजीचे** मनांत न्याय येऊन, दौलतीस धणी औरस पुत्र ठरावून, पहिला बापाचे वेळेस दासीपुत्र वागला, त्याचें चालविलें, तसें यांणीं चालवावें असें ठरावून, सरकारचीं वस्त्रें बहुमान देऊन, पाठविला. त्याणीं त्या सिद्दीचा सत्कार करून, कामकाजांत वागवूं लागले. पुढें **शहाजी** राजास वजिरी जाली. चतुर **साबाजी** यास विषाद होऊन, दिल्लीचें राजकारण **जाधवरावाशीं** मिळोन केलें. पुढें कैलासवासी जाले. अमीर उमराव यांत वितुष्ट वाढलें. 'मलिकांबर चांग सखानी ॥ बंदे दरगाहयगानी ॥' याप्रमाणें सिका करून, तो सिद्दी दौलताबादेस कारभार करूं लागला. एवढें ज्ञान, दौलतीचा आटोप करण्याची बुद्धि होण्यास, पूर्वीं विजापुरीं **चांगसखान** पादशहा होते, त्यांचे कृपेंत राहून, कारभारा **मुरार जगदेराव** यांचे विचारें दौलतीचा बंदोबस्त चांगला; त्यांत विजापुरचे पादशहास व्यथा उद्भवली आणि पादशहा वारले. मागें पादशहाजादी व मुलें लहान, यांणीं **मुरार जगदेराव** याजवरीं आदावती केल्या, वाड्यांत धरोन आणोन बसविलें; तेव्हां आपली अब्रू राहात नाहीं जाणून, वाड्यांत बसले जाग्यानजीक हौद पाणिया जितामु चांगला ब्राह्मणाचाच होता, तेथें जाऊन बुडी मारून, प्रपाच्चार (?) करून, शिखासूत्राचा त्याग केला, सन्यस्त जाले. हें वर्तमान बाईस व हजरतीस कळोन, व्यवहारापासून मुक्त केलें. घरदार जप्त करून, आणिलेंच होतें. **मुरार जगदेराव** स्वामी जाले. हें पाहून, मलिकांबर तेथून

पळून निघाला. कारण त्याचे हाताखालीं कारभारांत दोन रुपये ठेव. जाणत होता. याजमुळें वेष पालटून, दौलताबादेस येऊन सिदी **बिलाल** याचे बिरादरींत **मलिक** सिदा या नामें करून, हजरी देऊन होता, तो या पंचायतीचे योगें प्रौढतेंत येऊन, कारभार करूं लागला. **शहाजी** राजे यांनीं विचार केला कीं, बाई व मुलें आपले तर्फेनीं बोलतात, वागतात; चतुर **सावाजी**[१]चा रोंख फिरला; मुत्सदी कारभारी, वकील, सरदार, यांत फितुर आहे, बालनायकी, स्त्रीराज्य, यांत चांगले मुनासबपणें वागणें होणार नाहीं; शेवटीं दगा देतील, आदावत टाकतील, आबरू जाईल, यांत तथाच नाहीं; पक्षीं आपण आपला विचार करावा, जाणून विजापुरास **जगपाळ** नाईक, **निंबाळकर, फलटणकर,** पादशाही चाकर, पंचहजारी मनसबदार होते, पाळेगार होते, त्यांशीं शरीरसंबंध करून, आसकी जोडून, त्यांचे आस विजापुरीं होते, त्यांचे हातून बोलणें बोलून, राज्याचा बंदोबस्त करून घ्यावा, असें ठराविलें. विजापुरचे पादशहानीं, यांचे येण्याचें वृत्त ऐकून, बहुत संतोष मानिला. दौलताबाद पादशहात दिल्लीपतीशीं भांडून रक्षिली, असे मनुष्याचा त्याग कंटाळा केला. आपल्यास अनुकूळ जाले, तेव्हां संपूर्ण पृथ्वींत आपण अंमल करून, सार्वभौमता करूं, चिंता काय? असे अर्थें आदर मानून, **राजांचे** हेतुप्रमाणें मान्य होऊन, सनदा लेहून पाठविल्या. त्या दाखल जाल्यावरी, **राजांनीं** दौलतीचा बखेडा आपण मसलत करून रक्षण करूं; परंतु **जाधव** सासरे हे, प्रत्यक्ष हेच आमचे विरुद्धावरी, तेव्हां यांचा बंदोबस्त करावा, तरी राज्य राहणार, या मनसब्यानीं करूं जातां, आपली स्त्री आपणांस प्रतिकूळ होणार, त्यांत घरांतच विवाड, तेव्हां ही गोष्ट कामाची नाहीं; त्या पेक्षां विदेश पाहावा, हें सर्वोपरी चांगलें, सनदा विजापु-

१ मागल्याच पृष्ठांत **सावाजी** कैलासवासी झाले असें लेखक ह्मणतो; परंतु येथें व पुढेंही सावाजीचा बरेच ठिकाणीं उल्लेख आहे. असा विरोध कां ?

रच्या आल्या, त्या शिरसा वंदून, तेंच मुहूर्त ह्मणोन, शहरबाहेर डेरे दिले; आपले सलतनत सारें उतराविलें, आसबाब संपूर्ण आशरच्या किल्यावरी पोंहचविला; आणि वाड्यांत जाऊन, बाई आणि पादशहा यांचे पुत्र, यांचे चरणारविंदीं मस्तक ठेऊन, विनंती केली कीं, आजपर्यंत आपण संगोपन करून, वाढविलेंन, सांभाळ केला, पुढें धणीच आहेत; परंतु आपले कूंत विक्षेप घालणार फार, नित्य आपणास वाण आणितात; आपण माझे मुरवतीनें ऐकत नाहीं; तत्रापि एखादे समई अविचार मनांत आणिल्यास, मला प्राणानिशीं जावें लागेल; त्या पेक्षां ते मुत्सद्दी व कारभारी, सरदार व अमीर उमराव, जुने आपले पदरचे, त्यांचे हातून सेवा घ्यावी: मजला दोन दिवस आज्ञा द्यावी, मी पोट कोठें तरी आपले नांवावरी भरीन, चिंता नाहीं; जे दिवशीं आपण स्मरण करतील, ते दिवशीं मी हाजर होईन, असें कितेक प्रकारें बोलले. बाईच्या मनांत विचार बरा वाटला; कारण सारे नित्य उपद्रव देत होते, ते तुटेल. राजे आपले खुषीनें घरीं बसतात, त्यांजकडे जाहगीर आहे, ती खाऊन असावें, प्रसंगीं बोलाऊं, तेव्हां यावें, इतका जाब दिल्हा. तो ऐकून, चरणावरी डोई ठेवून, डेरियास आले. वस्त्रें भूषणें सुद्धां जिजाबाई साहेबसह, यांस देऊन रजा दिल्ही. हें वर्तमान जाधवराव व मलिकांबर यांस कळोन, बाईजवळ येऊन, विनंती करूं लागले कीं, शहाजीनीं आजपर्यंत कारभार केला, त्याजपाशीं चार रुपये घेणें, तें सोडून, सरकारी खिलत देऊन, बिदा केलें हें काय ? तो आपल्या मुखें निरोपास आला, हाच त्याचे माथां अपराध ठेवावा, आणि सरकारी दौलत जाहागीर जप्त करून, दौलतींत दौलत आणावी, असें चतुर साबाजी सुद्धां सर्व मंडळी अधीच, त्यांत पोक्तें[1] माणसांचा सला, मग अविचारास

१ पोक्त माणसाचा सल्ला असल्यावर अविचारास थारा कसा राहील ?

आडचण काय राहिली ? राजांकडे सांगून पाठविलें, तुम्ही निरोप घेतला गेलां, हें चांगलें केलेंत; हजरतीनें तुह्मांस लहानाचें थोर केलें, तें अशा प्रसंगीं सोडून जावयाकरितां वाढविलें नाहीं; दौलतीचे उपयोगास्तव तुह्मांस भूषणें दिल्हीं; त्यास दौलतींत वोढ पडली, याजकरितां कांहीं खजान्यांत द्रव्याची मदत तुह्मांकडून व्हावी. आणि दौलत जाहागीर तुम्ही सोडावी, घरीं स्वस्थ राहावें; तुमचें प्रयोजन लागेल तेव्हां तुह्मांस बोलावून घेऊ, असें उत्तर आलें. तें ऐकून, राजांनीं विचार केला, तो मार्गाचाच; मनाची खातरी होऊन, बाईस विनंती सांगोन पाठविली कीं, मी, खुदावंद, आपले जवळ आहें, बरतर्फी घेतली नाहीं, कलह वाढूं नये, ह्मणोन विनंती करून, घरीं राहण्याकरितां निरोप घेऊन आलों, असतां, खावंदांचे मर्जीस असें आलें. ऐसियास कारभारी दौलत चालविणार समर्थ आहेत; द्रव्यास उणें पडूं देणार नाहींत; मी आपला दासानुदास आहे, पुत्र ह्मणावयाची योग्यता माझी नाहीं. परंतु साहेबांस अडचण पडेल, ते समई मला सूचना होतांच, मी जातीनें हाजर होऊन, प्राणानिशीं खर्ची घालीन, मग द्रव्याची कथा किती? आपण तिळप्राय मजविषयीं सांगणाराचें मनावरी धरूं नये; मी कच्या आज्ञेनीं वागेन, असें अनेक प्रकारें सौम्योपचारें त्यांजबरोबरवएकांतीं लोकांतीं सांगून पाठविलें; त्याजवरून बाईनीं गोष्ट मागें टाकली. राजे कूच करून, गंगातीरीं आले. मागें कारभारी याणीं विचार केला कीं, फौज तयार करून जावें; मागें जावें आणि लूटून घ्यावें; दौलत बहुता दिवसांची जमली आहे, ती मिळेल, सरकारांत कांहीं दाखल करावी, कांहीं फौजेंत द्यावी, ह्मणजे फौजही हुशार होईल. या विचारें तयारी करून आले.

जिजाबाई गरुदर, जवळ कारभारी, दादाजी कोंडदेव व त्रिंबक-नारायण हणमंते, उभयतां बाईजवळ होते. राजांचे कुपेतील सरदारांचाही बंदोबस्त पाहण्यांत होता, त्यांस समागमें ठेवून, दौलताबादेची फौज आली, याची बातमी कळोन, आपण सडे होऊन, बाईस वेगळा सरंजाम देऊन, रवाना केली आणि दौलताबादेस लेहून पाठविलें कीं, मी आपणांस सेखहुसेन खोजाबरोबर विनंती सांगून पाठविली असोन, फौज पाठविली, तेव्हां मी निरुपाय आहें. या उपरी मी क्रियेपासून मुक्त जालों. आतां माझें दैव माझे बरोबर ह्मणोन सनदांच्या नकला सुद्धां पाठवून दिल्या. पादशहाजादीनें पाहून, कारभारी याजवरी रागास आली; हा कारभार करावयास तुह्मास कोणी सांगितला? आतां परराज्यांत गेल्यावरी आपला दावा; त्याजवरी कसा चालेल. तुह्मी दौलत बुडवावयास बसलां; रक्षण तुमचें हातून होणें दिसत नाहीं, असें सांगोन खिन्न होऊन, दुसरा विचार करावा, तरी तसा माणूस दुसरा नाहीं. शहाजीस आणोन करावें, तरी त्यास विश्वास येणार नाहीं. तेव्हां दौलत बुडविली, अशी खातरी जाली. मोठेंच संकटांत पडली. इकडे हेकारी ( ? ) मलिकांबर व जाधवराव फौज घेऊन जाऊन, वणदिंडोरीचे घांटाखालीं मैदानांत लढाई जाली. मोठेच कसोशीनें लढून, दौलताबादकरांची फौज तीन कोश माघारी पिटून काढली; मग आपण बहिरबुणगे सांभाळून, कारभारी गेलेच होते, आणि खासा गंगास्नान करून, नासिकास पंचवटीवरी मुक्काम करून, तीर्थविधी केला. फौज मोडली, ती जाधवराव व मलिकांबरास जाऊन मिळाली. दोन्ही फौजा एक होऊन, पुन्हां मोहिम केली, जाधवरावसुद्धां चालून आले. शहाजी राजांनीं जिजाबाई साहेब यांची रवानगी पुढें करून देऊन, सडे राहिले होते. चौथे दिवशीं कूच करून निघाले, तों

मागें फौज आली तिची व राजांची लढाई जाली. दोघे फौजबंद. लढाई करीत करीत चालिले. त्यांत जिजाबाई साहेब गरुदर, याजमुळें हलक्या मजला करीत चालले असतां, गनिमाची गांठ पडून, हल्ला केली; तों मागें जाधवराव होते, त्यांस खबर कळली कीं, जिजाऊ साहेब आहेत, हें ऐकून सांगून पाठविलें, यांसी भांडूं नये, शहाजीची जेथें गांठ पडेल, तेथें पाडून आणावें. त्याजवरून मोहरा सोडून, फौज चालती जाली. मागाहून जिजाबाई साहेबांची व जाधवरावांची गांठ पडून बोलणें जालें. बाईसाहेब गरुदर, सहा सात महिने जालेली. तेव्हां बाईसाहेब यांणीं सांगितलें 'बाबा, तुह्मी चुकलां, आतां क्षमा माझेकरितां करून, सरपोस ठेवावा, तें राहून हा इरादा धरणें, आपल्यास उचित नाहीं. असा अपराधही माझा पाहण्यांत आला नाहीं. अस्तु. आतां मी तुमचे जवळ आहें. काय मर्जी, पारिपत्यं करावयाचें असेल, तें पारिपत्य करावें.' तेव्हां जाधवरावानीं जिजाबाई साहेबांस पोटाशीं धरून, रडून समाधान केलें. 'बाई, जन्मांतरानीं विरुद्ध पाडिलें, त्यास आतां माझ्या टाळल्यानीं टळत नाहीं. यांतच मरण दैवास आलें. आतां तुझ्या मनांत कोठें जावयाचें तें सांग.' तेव्हां बाईनीं उत्तर केलें कीं, 'शिवनेरी किल्ल्यास मला जावयाचें आहे, तेथें पोंहचवून देणें.' त्यावरून जाधवराव यांनीं आपले इतबारी लोक पागा सरंजाम देऊन, रवानी[1] केली. बराबर उभयतां कारभारी होते. शिवनेरीचे किल्ल्यावरी जाऊन पांचवे सातवे दिवशीं प्रसूत जाली. शके १५४९ रक्ताक्षी नाम संवत्सरे पुत्ररत्न जालें. दहा दिवस हेलकरणी गांवोगांवच्या हेल येऊन, घातला,

[1] शहाजीनें जिजाबाईस शिवनेरीस पोंचविलें होतें असें इतर बखरीवरून दिसतें.

तितक्यांस लुगडीं व चोळ्या व खण देऊन, भोजनास घातलें; तेरावे दिवशीं बारसें केलें. नांव **श्रीमन्महाराज शिवाजी राजे भोंसले** ठेविलें. ज्याची कीर्ति दिगांतरीं जाली, त्याचें पूर्व कथन. पुढें **शहाजी** राजे व **मलिकांबर** यांची गांठ पडून लढाई जाली. नंतर त्या लढाईत **जाधवरावांसुद्धां** नामोहरम केले. **जाधवराव** व **मलिकांबर** दौलताबादेस पळून गेले. इकडे **राजे** फलटणास **निंबाळकर** यांचे येथें मेजवानी घेऊन, विजापुरास चालले. विजापुरास वर्तमान कळतांच, पादशहानीं **मुरार जगदेराव** वगैरे कारभारी व मानकरी व वजीर व अमीर उमराव आडवे येऊन, भेटून, मोठे समारंभानीं घेऊन गेले. शहराबाहेर उतरले; मेजवानीचे सरंजाम पाठविले, हर्षाच्या तोफा केल्या; साकरा वांटल्या; घरोघर नाच रागरंग जाले. **राजांस** नेऊन मेजवानी करावी, वस्त्रें अलंकार द्यावेत. याप्रमाणें एक मास होऊन, राहावयास जागा दिल्ही. फौजसुद्धां एक विल्हेस राहिले. नजीक येण्याजाण्यास शहरांत वाडा एक सरकारांतून घेतला. दौलताबादकरांकडील सरंजाम विजापुरकरांनीं बहाल करून, सनदा **राजांस** दिल्ह्या. हें वृत्त **मलिकांबर** व **जाधवराव** यांस कळोन, जसी करितां तंटा उद्भव करण्याची योजना चित्तांत धरली. याप्रमाणें प्रथमचरणीं राजनीति **शिवाजी राजे** यांची बखर समाप्त, कार्तिक शुद्ध १४ संवत् १८८१ चे सालीं, बडोदें येथें केली; बहुत काय लिहिणें हें विनंती.

---

# द्वितीय चरण.

श्रीमत्सद्गुणाभरण नयविनयविवेकसंपन्न नीतिशास्त्रविशारद विराजमान राजश्री **शहाजी राजे भोंसले** यांची व वि-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



आपरुफत. पादशाहाची भेटीचा योग व्हावयाचा, तमाम मुतसद्दी, सरदार व अमीर उमराव, यांच्या भेटी होऊन, मेजवानग्या जाल्या. शहरांत राहावयास जागा दिल्ही; व फौज खटलें राहण्याची योजना नजीक केली, याप्रमाणें प्रथमचरणकथा विदित केली. तदुत्तर द्वितीय चरण पूर्वार्ध कथा:— हिजरतीनीं किल्ल्याचे दरवाजिया नजीक मोठी गोरखी दहा हजार खासा बसावयाची उभी करून, खासे जाग्यावरी छत झालरा लावून, कारंजी चालूं करून, नाच ठाई ठाई उभे केले. याप्रमाणें तयारी करून, हजरतीस कारभारी याणीं वजीर अमीर सुद्धां हवेलींतून येऊन, खासत्रागेंतील हवा घेऊन, **राजे** आपले मुक्कामाहून निघोन, बागे नजीक सरकारस्वारी दृष्टी पडे ऐसी संनिध पाहून, घोड्यावरून उतरून पाई स्वार जाले. **निळोपंत** कारभारी यांस हजरतीस तसलीमात बजावून, **राजांचे** बंदगीची विनंती केली. **राजांची** स्वारी समीप पाहून, तेथेंच उभे राहिले. नंतर मानकरी लहान थोर **राजांकडील** येऊन, नजर मुजरे केले. नंतर पांचपंचवीस पाउलें **राजांस**, जवळ पाहून, पुढें येऊन, नजर मुजरा करून, उभे राहिले. तों हजरतीनें हातीं धरिले. कांहीं मागें करते **राजे** चालत, कचेरीचे जागीं आले. हजरत तख्तनीस जाले. नंतर पुन्हां **राजे** यांणीं नजर मुजरा केला. आदब बजावून, हत्ती, घोडे, तोफा, जवाहीर, तरवार, पांच हत्यारें, पांच पोषाख पुढें हजर केले. तें पाहून, बहुत संतोषी जाले. नंतर कर्नाटकप्रांतींचा सरसुभा **राजांस** सांगोन, वस्त्रें बहुमान सत्कार पूर्वक दिल्हा. **रणदुलाखान** व **रणमस्तखान** व **सर्जाखान** वगैरे अमिरांनीं **राजांचे** थोरपणाची व शहाणपणाची तारीफ केली. याप्रमाणें प्रहर सहा घटका होऊन, नंतर हवेलीस स्वारी जावयाची तयारी जाली. **राजांस** खवासखान्यांत

बसवून, दौलताबादेंतील वर्तमान विचारीत वाड्यांत आले. तेथून हवेलींत जावयाची राजांस परवानगी दिल्ही. राजांनीं बंदगी बजावून, मुक्कामीं आले. हजरतीनें राजांची स्तुति मार्गे बहुत बहुत केली. हें वर्तमान दौलताबादेचे वकिलानीं दौलताबादेस लेहून पाठविलें. ते समई मलिकांबर व चतुर साबाजी व जाधवराव कारभारी होते. त्यांस विषाद वाटून, विजापुरकरांचे वकिलास बोलावून आणोन, त्याजला बोलते जाले कीं, 'या दौलतींतील मोठे माणूस उठोन, तुमचे दौलतींत गेल्यास, तुह्मी त्याची बरदास्त ठेवावी, तुमचे कडील आल्यास आह्मी ठेवावी. या चाली पूर्वापारच आहेत. संस्थानराज्याशिवाय संभावित मनुष्याचा गुजारा होत नाहीं; परंतु तुमचे महाल मुलूख त्यांचे ताबे जाले आहेत. आमचे महाल मुलूख शहाजीचे ताबीना आहेत. त्यास त्याणीं आमचा निरोप घेऊन, घरीं जाण्याचा बेत करून गेले असतां, तुमचेकडे जाणार; हें कळल्यावरून, आह्मी जाऊं नये, ह्मणून सांगून पाठविलें. महाल मुलूख सोडून द्यावे, तें न ऐकतां तुमच्या सनदा आमचेकडे पाठविल्या. याजकरितां त्यास घेऊन येण्या करितां सरंजाम पाठविला. त्यांशी तंटा करून, पळून तुमचे पाठीशीं पडले. ऐशीयास तुमची आमची दौलत दोन नाहींत. पूर्वीपासून यखलासीनें चालत आल्याप्रमाणें पुढें चालावें. यांत आपले दोस्तीस मुनासब आहे. दिगर तंटा वाढवून, महाल दाबणें असल्यास, स्नेहांत अंतर होईल. असें करूं नये. येविशीं तुह्मी आपले खावंदास बरें खेशीनें ल्याहावें.' त्यावरून विजापुरकर वकिलानीं उत्तर केलें कीं, 'आपण आह्मांस सांगितला मजकूर, हजरतीस लेहून पाठवितों, चिंता नाहीं; परंतु आह्मांस खावं-

दांची आज्ञा अशी आहे कीं, ' तुमचा आमचा तह, गंगा-उत्तरतीरीं तुमचा अंमल, व दक्षीणतीरीं आमचा अंमल, असें असतां, पुंड पाळेगार तुह्मी आह्मांकडील अमलांतील फितवा करून ठेऊन अंमल दाबला. त्यास तुमचा आमचा स्नेह, अल्प अर्थाकरितां कलह केल्यानीं उभय-पक्षीं नाश, मनुष्यें मारवावीं' यांत जीव नाहीं. तुह्मी समजोन, आमचीं मनुष्यें आम्हांकडे पाठवाल, तें न करितां पंचवीस वर्षें तुह्मीच अनु-भव केला. याचा पैका हिशेबीं, निघेल, तो तुह्मी आमचा देऊन, आमचा अंमल आह्मांस खालीं करून द्यावा. तुह्मांस त्या मनुष्यांचा दरकार आहे, तरी तीं माणसें ठेवावींत; परंतु मुलूख आमचा आह्मांस द्यावा. येविशीं बोलण्याविशीं आह्मास लिहिणीं येत गेलीं; परंतु आह्मी तुह्माशीं न बोललों. कारण दोन्ही दौलती परक्या नाहींत. एकच धण्याच्या आहेत. त्यापेक्षां आपण बोलून कलह जोडावा, ही कुलवानाची रीत नाहीं, जाणोन खावंदास कळेल तसें लिहिलें. पुढें बोलावें तरी तुमचे दौल-तींत हजरतीनीं कैलासवास केला. कारभाराचा बखेडा, यांत कलह उभा केला, तरी तुह्मी ह्मणाल, आमची दौलत बिघडली, ह्मणोन दायादी शत्रूपणा आह्मांशीं मांडिला. त्यास तुमचें स्थिरस्थावर होऊं द्यावें; मग बोलावें, ह्मणोन विचारांत होतों, तों आपल्या कडूनच उद्गार निघाला, म्हणून मला एवढा किसा सांगणें प्राप्त जालें. याकरितां माझेंही म्हणणें, दौलती दोन्हीही एक, यांत जुदाई नाहीं, तुमचें म्हणणें तेंच आमचें आहे, याचा विचार करून, तहाप्रमाणें चालावें; यांत उभयपक्षीं चांगलें, म्हणजे कलह वाढ-णार नाहीं.' त्यावरून दौलताबादकर कारभारी याणीं उत्तर केलें कीं, 'आम्ही तुमचीं मनुष्यें फितुर करून आणिलीं नाहींत. त्यांजला

सुख न पडे, म्हणोन आमचे आश्चर्यी राहिले. तुमचीं माणसें तुम्ही समजावून, घेऊन जावींत, आम्ही नको म्हणत नाहीं. त्यांत तुमचे दौलती पैकीं आले, त्यांपासून दोन रुपये घेऊन, आम्ही आपले दौलतींत लाविलें, असेंही जालें नाहीं. हिशेब करून काय द्यावें? तुम्ही इतके दिवस बोललां नाहीं. आतां केल्यास हात फुटले कीं काय ? म्हणोन विचारलें.' त्याजवरून वकिलानीं उत्तर केलें कीं, 'आमचे पाळेगार तुम्हांकडे आले, ते समई तुम्ही त्यांस ठेवूं नये, ह्मणोन बोललों व सरकारचीं पत्रें देखील आपल्यास दिल्हीं. ते समई आपलीं उत्तरें कशीं जालीं; त्यांचें स्मरण करून बोलावें. ते समई बोलणार एक होता व आतां एक आहे, असें मनांत आणूं नये. आह्मांस जमीदारान्वयें त्यांस ठेवून, जिल्हेचा अंमल घेऊन, बाकी ऐवजांत चाकरी त्यांजला सांगणें. तुह्मांस बक्षीस सारेंच करणें; तेव्हां त्याचा आमचा समेट कशा रीतीनें होतो, अशा रीती दर्दी मनांत आणाल, तरी दौलती दोन्ही एकरूपच वागतील.' त्याजवरून दौलताबादकरांचें ह्मणणें पडलें कीं, 'तुमचे मनांत कलह वाढवावयाचा आहे असें दिसतें. आम्ही गोडीनें बोलतों, तुह्मी गळांच पडतां, त्यापेक्षां उद्यां तुह्मी या, ह्मणजे तुह्मांशीं बोलूं.' यांणीं उत्तर केलें कीं,' विनंती करावयास मी होऊन आलों नाहीं, आपण बोलाविलें ह्मणोन आलों. सांगितलें त्याचें उत्तर केलें'. ह्मणोन निरोप घेऊन, आपले वाड्यास गेले. दुसरे दिवशीं कारभारी, मुत्सद्दी, अमीर उमराव एकत्र होऊन, विचार करूं लागले कीं, 'वकिलाचा जाब नेटाचा पडतो. आज दबून बोललें असतां, शहाजीकडील प्रांत जाऊन, पुढें वाद सांगणार त्यास 'कुराडीचा दांडा गोतास काळ'. आपले कडील शहाजी तिकडे मिळाला, त्यापेक्षां नाशास

उभे राहतील. याजकरितां त्यांजला दम खाऊं देऊं नये. तयारी करून, त्यांचा मुलूख लुटून, वैरान करावा, ह्मणजे जेरदस्तींत येऊन, तहास कबूल होतील; नाहीं तरी दिवसें दिवस पारडें जड होईल'. असा विचार करून, वाकिलास बोलावून सांगितलें, ' तुह्मी शहाजी बाबत प्रांत आमचा सोडून द्यावा, नाहीं तरी लढाई करण्यास सिद्ध व्हावें'. वकिलानीं उत्तर केलें कीं, 'तुह्मी आपली तयारी करून दिल्ली-पतीवर जाऊन, काय लढाई मारलीत व शहाजीवर चढून गेलां, तेथें काय यश मेळवून आलांत? आमचे खावंदांवरी जाऊन, यश मिळविणार, तें समजलेंच आहे. उगेंच बोलोन स्नेहांत अंतर पाडून घेऊन, वाईटपणा पदरीं आणोन घ्याल. आह्मांस ही सला तुमची गोड वाटत नाहीं. दौलत बुडवावयाचा विचार आरंभिला. माणूस राज्यांत नसलें, ह्मणजे अशाच करण्यांनीं दौलती बुडतात.' हें बोलल्यावरोन फारच विषाद वाटला आणि बक्षीस बोला-वून ढाल विजापुरावरी जाण्याचे तयारीची आज्ञा केली. त्यानीं आज्ञेप्रमाणें ढाल देऊन, फौजेस उतरवून, येऊन विनंती केली. बक्षीस वस्त्रें देऊन पाठवावें, असें मलिकांबराचे विचारास आलें. तें श्रवण होतांच, वकिलानीं उत्तर दिल्हें कीं, 'जाधव आणि आपण चतुर साबाजी जाऊन, मागें काय जालें तें पुढें करणार ? बक्षी विचारे गरीब, 'वाघाचे गळ्यांत शेळी बांधावी ' तसा पर्याय केला-सा दिसतो.' हें ऐकून जोशी बोलावून, सुमुहूर्त पाहून, त्रिवर्गानीं जा-तीनीं जाण्याचा निश्चय करून, डेरे दाखल जाले. वकिलानीं जाला मजकूर, विजापुरास लेहून पाठविला तिकडूनही सरंजाम तयार करून, मुरार जगदेराव यांणीं शिखासूत्र त्याग केला, ह्मणून प्रथम चरणीं मजकूर लिहिला, त्या पूर्वीं इतराजींत आले. वाडियांत

येऊं नये, घरीं असावें, असा हुकूम होता; त्याप्रमाणें घरीं बसले. ते समई गलबल पाहून, मलिकांबर निघोन, द्रव्य घेऊन, दौलताबादेस राहिले. पुढें परतून जावें, तरी मुरार जगदेराव याशीं दगाबाजी केली, अविश्वासी जाले; यामुळें या दौलतींत पाय घालोन, कारभारच करूं लागले. त्याजला, विजापुरकरांचें पारपत्य करून, आपलें कबजेंत आणावें, हे मानस; यामुळें विशेष उत्तेजन देऊन, कूच दरकूच जाऊन, मुलूख लुटून वैरान करावा, जेर करून आपले कलम तहांत उगवून घेण्याचा मनसबा; हें वृत्त वकिलानीं विजापुरास लिहिलें, तेथें साद्यंत समजलें. नंतर मुरार जगदेराव यांस बोलावून, वस्त्रें देऊन, शहाजी राजे व फौज देऊन, दौलताबादकर यांचे फौजेचे तोंडावरी पाठविलें. त्याची यांची गांठ नासिकाचे नजीक पडली. तेथें लढाई होऊन, आपलाले मुक्कामीं गेले. त्याजवरी विजापुरकरांनीं दौलताबादकर यांजकडे आपले जाहागीरदार मिळाले, त्यांचे पारपत्यास प्रारंभ केला. दौलताबादकर यांणीं सिद्ध होऊन, मुलूख लूटावयास प्रारंभ केला. आणि एकटें दुकटें फौजेंतील घोडे माणूस उंट तट्ट झोंबाडून न्यावें. या वरून याणींही तशा रीतीनीं चार महिने लूटलबाड केली. त्यांत राजे दौलताबादकरांचे चालीस माहीत, व प्रांत वगैरे सर्व माहीतगारी, याजमुळें त्यांजवरी आपली छाप ठेवून, आपला मुलूख व फौज बचाऊन त्यांजकडील हारीस आणावें, असेंच होऊं लागलें. त्यावरून चतुर साबाजी व जाधवराव व मलिकांबर यांणीं मनसबा केला. विजापुरकरांची फौज नगराकडे गेली. या समई आपण चालून जाऊन, लढाई जवामर्दीनीं द्यावी, पुढें त्यांचा आवांका लढाईचा न होय, असें करावें. मुरार जगदेराव व राजे यांणीं

बहुतेक पुंड पाळेगार यांचीं शासनें करून, कबजेंत आणोन, अंमल बसविला. याचा विषाद येऊन, **जाधवराव** व **मलिकांबर** फौज सुद्धां चालून येऊन, लढाई मातवर दिल्ही. त्यांत **जाधवराव** शिकस्त[1] जाले. त्याणीं व **मलिकांबर** याणीं पळ काढला. गंगा पार दहा कोश घालवून, परत नांगर गांवीं येऊन, मुक्काम केला. रात्रीस पर्वतावरी पर्जन्य अद्भुत पडला; त्या योगें गंगेस पाणी आलें. सूर्यग्रहण पडलें, याजमुळें ते मुक्काम करून राहिले. पाणी अथाक, दोन्ही तीरें भरून चाललीं. ते समई **मुरारपंतीं राजांस** विचारिलें, ‘ हत्तीचीं तुला करणें जाली, तरी कशी करावी?’ मोठे मोठे कर्ते, सुज्ञ, शेंदोनशें मंडळी मातबर बसले; परंतु त्यांचे वस्तु उत्तर न जालें; **राजांनीं** जाब दिला कीं, ‘नावेंत हत्ती घालावा आणि पाण्यांत नेऊन, पाणी नावेस लागतें, त्याची खुणा करावी; मग हत्ती काढून, द्रव्य भरून, संकल्प करून, ब्राह्मणांस द्यावें. या प्रमाणें सांगितल्यावरून, बहुतच संतोषी होऊन, **राजांची** तारीफ विजापुरीं शहाणपणाची व मर्दपणाची व मसलतीची वगैरे, कर्तेपणाची लेहून पाठवून, **राजांस** बक्षीस, नजीक बांधारीचे गांव, खेडीं तीन लक्षांचीं देऊन, जवाहीर वस्त्रें दिल्हीं. व हत्तीची तुला द्रव्य भरून केली. आणि ब्राह्मणांस मनस्वी धर्म करून, नांगरगांव दरोबस्त ब्राह्मणांस अग्रहार करून दिल्हें. त्या गांवचें नांव नांगरगांव मोडून, तुळापुर ठेविलें; तें अद्यापपर्यंत चालतें. दौलताबादकर पराभवून, आपले संस्थानीं गेले. **मुरारपंत** विजापुरास आले, कांहीं दिवस कामकाजांत होते. नंतर सरकारी अंमल असतां, हुकूम न नेतां, आप अख्तियारीनें ब्राम्हणांस

---

१ पराभव पावले.

आग्रहारें दिल्हीं व द्रव्य मनस्वी वांटलें, असा पैसा कधींही सरकारानीं खैरात केला नाहीं. हें द्रव्य सरकारचें; अशीच दौलत यांणीं बुडविली. शहाजी राजे यांस बरोबर दिल्हे, ह्मणोन दौलताबादकरांची लढाई मारली; नाहीं तरी याचा कारभारी मलिकांबर दौलताबादेस द्रव्य घेऊन पळून गेला. ते व हे एक होऊन, हजरतीची दौलत बुडविते, असें कितेक प्रकारें बाइजवळ हजरती जवळ कोणीं सांगणारांनीं सांगितल्यावरून, मुरारपंतांची शोभा न ठेवितां, सरकारवाड्यांत प्रातःकाळीं स्नान-संध्या करीत असतां धरून नेले. ते उजवे बाजूस सोप्याजवळ वाड्यांत कुसवा शेजारीं हौद आहे, तेथें नेऊन बसविलें. यांणीं विचार केला कीं, आपले पोटीं पोरबाळ कांहींच नाहीं, वांचून प्रतिष्ठा काय आतां मेळवणें? मेळविली ती गमाविली; त्यापेक्षां आपले देहाचें सार्थक करावें, ह्मणोन हौदांत उडी टाकून, *शिखासूत्र त्यागून प्रेतोच्चार केला. हें वर्तमान हजरतीजवळ समजल्यावर, त्याजला हिशेबापासून मुक्त करून, निरोप दिल्हा. राजे यांजवरी परम विश्वास; रणदुलाखानें कारभारी संपूर्ण बंदोबस्त पाहणें पाहत होते. शहाजी राजे कर्नाटक प्रांतीं सरसुभ्याचे कामावरी गेले. मागें दौलताबादकरांचे व विजापुरकरांचे वकिलांचीं भाषणें जालीं, तीं मलिकांबरास दुस्सह वाटून, फौजेची तयारी करून, कूच करावें, या संधीस चतुर साबाजीनीं कैलासवास केला! त्यांचें उत्तरकार्य जाल्यानंतर, हजरतीनीं वस्त्रें घेऊन, मंजल दरमजल विजापुरावरी जाधवरायासुद्धां चालले, ही बातमी वकिलांनीं लेहून कळविली. विजापुरकर बेफाम, राजे कर्नाटक प्रांतीं गेले. त्यांस लेहून पाठविलें.

---

* मुरार जगदेवाविषयीं पृष्ठ ४३ मध्यें अशाच प्रकारचा उल्लेख आहे. लेखकानें द्विरुक्ति केली आहे असें दिसतें.

त्यांस तिकडून सरंजामसुद्धां येण्यास दिवसगत लागली. मुरार जगदेराव कारभारी सन्यस्त जाले. रणदुल्लाखान कारभारी, त्यास दौलताबादकर येण्याची तमाच नाहीं. मलिकांबर विजापुरकरांचा प्रांत लुटीत ह्मसवडानजीक फौज समेत आले. तेव्हां विजापुरकरांनीं तयारी करविली. शहाजी राजेही येऊन फौज सुद्धां दाखल जाले. तों ह्मसवडास आल्याचें वर्तमान कळलें, तसेंच स्वार होऊन, रणदुल्लाखान व रणमस्तखान व सर्जाखान व शहाजी राजे व अमीर उमराव सडे, घोडे खासा दहा पंधरा हजार, सरंजाम निवडक, एकदील निशान, दुडाण घोडीं धरून चालले. रात्रीस जवळ्यास मुक्काम, घासदाणा चारावयाकरितां करून, खोगरें हलवून, चार सहा घटका विसावा घेऊन, पुनः तयारी केली. दुडाण सात्रक घोडे चालून, पाहाटेचे दोन घटिका रात्रीचे सुमारें येऊन फौजेनिशीं राजे एकच हलकल्लोळ, फौजेस रखवालीस छबिना होना, त्याजला फौजेंत येऊं दिलें नाहीं; त्यामुळें बेफामी राहिली. फौजेची खराबी बहुत केली. लढाईचा इरादा धरण्यास धैर्य राहिलें नाहीं. ज्याचे त्यांस प्राण वांचोत, असें संकट पडलें. त्यांत जाधवराव व मलिकांबर यांचीं कोतवाल घोडीं व कांहीं स्वारांचीं घोडीं तयार केलीं होतीं, तितके स्वार होऊन पळ काढिला, मागें रणदुल्लाखान व रणमस्तखान व राजे लागले, आधींच विजापुरीं तीस चाळीस कोश घोडीं चाललेलीं, त्यांत पाठलाग करण्यानीं दमावीं; परंतु रफत रात्रंदिवस घोडे माणसास, याजमुळें तमाच वाटली नाहीं. या प्रकारें गंगापार दहा वीस कोश, आपले अंमलापलीकडे, पोंहचवून गंगा ऐल तीरीं येऊन मुक्काम केला. यश संपादन केलें. आनंद उत्साह करून, परमानंदानीं विजापुरास लेहून पाठविलें. मलिकांबरांनीं

कारकून व वकील मातबर रवाना केले. पुढें विजापुरकरांवरी स्वारी करावी, असा दम राहिला नाहीं. वकील गंगा उत्तरतीरीं आलियाचें वृत्त कळलें नाहीं. फौज आली समजोन, लष्करांत गलबल जाली. रणदुलाखानानीं बातमी आणविली. त्यात वकील आल्याचें कळलें. नंतर वकीलाची व अमीर उमराव ह्याच्या भेटी होऊन बोलणीं जालीं; त्यांत राजांनीं बहुत फजीत केलें. तें वृत्त दौलताबादेस जाहीर होऊन, पादशहाजादीनें राजांस फर्मान पाठविला, त्यांत किताब उमदा लिहिला, 'तुम्ही आमचेच आहां. तुमचा करार आमचेजवळ, आपण आज्ञा कारितील ते समई हजर होईन. ऐशीयास ही दौलत तुमची, इची नामोशी गेल्यानीं, तुह्मास श्रेयस्कर नाहीं. आजपर्यंत तुम्ही बढतीची इच्छा केली असोन, आतां अनिष्ट चिंतूं नये. एक तुम्ही गेलां, याजमुळें राज्यांत बखेडा जाला. खराबी होऊन, स्वरूपभंग जाला. हें यश तुम्ही मेळविलें; हें आमचे अन्नाचें महात्म पक्कें ध्यानांत आणावें. तुह्मांस यावें, ह्मणोन ल्याहावें, तरी तुमचे सासरे मलिकास घेऊन, कारभार करितात. यांतच तूर्त नाश होणार. याजकरितां समयपरत्वें सूचना करीन. सध्यां विजापुरकरांनीं सरकारी दौलत, हत्ती, घोडे, तोफा, खजीना वगैरे, म्हसवडचे मुक्कामीं लुटलें. ते नौबत, डंके, जरीपटकासुद्धां, सलतनत सरकारांत पोंहचवून द्यावी, आणि पुढें सुरळीत चालावयाचा तह दुरुस्त देवजी मालुसरे यांचे विचारें वकिलाचे स्वाधीन ठरावून द्यावा,' अशीं आलीं. तीं पत्रें रणदुलाखानाकडे पाठविलीं, त्यानीं राजांची कजाखी व मर्दपणा दुरुस्त वागणें पाहून, बहुत संतोषी होऊन, दाली बदलोन पगडी बदल भाईचारा निःकपट केला. वकिलासुद्धां विजापुरास येऊन, हजरतीस येऊन भेटून, जाली हकीकत समजावून, राजांस वजीरीदाखल

खिलत देऊन, चंदी व चंजावर ठाणीं सुभे हवालीं केले. आणि दौलतींत राजापरता विश्वासू दुसरा कोणीहि नाहीं, अशी सर्वांजवळ साख ठेविली. पुढें निरोप घेऊन, चंदी चंदावर प्रांतीं जातां, कनकगिरि नजीक किल्ला एक होता, तेथें मिर्जा राजे यांचा भाऊ राहत होता. त्याजला जाधवरावाचे बहीणीची लेक दिल्ही होती. यांजकडे दोन तीन लक्षांचा अंमल, परराज्यांतील अमलदार, कर्नाटकचीवस्ती. मार्गींराजांची फौज जातां मुक्काम नजीक आला पाहून, लष्करी लोक कडबाकाडी जमा करण्यांत, कनकगिरीकडील ठाणेदारानीं गोळी वाजविली. सबब मागाहून राजे आले, त्यांणीं तें वर्तमान ऐकून, तोफा लावून, मोर्चा बांधला. इकडे मागाहून मिर्जा राजानीं आपला सरंजाम गडीचे मदतीस आणितांच, शहाजी राजांचे ज्येष्ठ चिरंजीव संभाजी राजे सात आठ वर्षांचे होते, त्यांजवळही आडावकर व भालेकरी स्वार दोन हजार पर्यंत होता. लेकरूं लहान, घोड्यावरी बसविलें, आरती अपत्तागीर धरले. त्या शिस्तीनें जंबुरा गोळी भरून गोळा लाविला, तों संभाजी राजांचा प्राण घातक जाला! जवळचे वागणारांस शोकसमुद्रीं ठेवून, कैलासवासी जाले. राजांस वर्तमान कळलें, बहुत हैराण जाले. शोकाग्नींत असतां, धैर्य धरून, ती गढी पाडून, हल्ला चढवून, गाढवाचा नांगर फिरवून, कनकगिरीवरी गेले. तेथें लढाई सात आठ दिवस पडली, राजांची फौज मातबर व सरंजाम जंगी, सामान पोक्त, यामुळें किल्ला जायां केला, पुढें हल्ला करून घ्यावा, तों मिर्जा राजे यांचा भाऊ पळोन हैदराबादेस गेला. नंतर मिर्जा राजे यांस समजलें. मिर्जा राजे कूच दरकूच निघोन, राजे यांस येऊन भेटले. राजांनीं यांचे भेटीपूर्वीं कनकगिरींतील मालमावेश काढून, आपलें ठाणें बसवून, विजापुरास लेहून

पाठविलें. तेथून सनदा आणविल्या. **मिर्जा** राजे बहुत स्नेहभावानीं बोलूं लागले; परंतु ठाणें देण्याची मर्जी नाहीं. हें पाहून **मिर्जा** राजे यांणीं **राजांस** मेजवानी करून, जवळ आपली गढी मातबर होती, ती आणखी खुनाबद्दल दिली; आणि पुढें तंटा भावाशीं करूं नये, असें कित्येक प्रकारें सांगितलें, नंतर आपले संस्थानास गेले. **राजे** निघोन चंदी चंदावरास गेले. तेथील दखल घेऊन, ठाणें बसविलें. कांहीं दिवस तेथेंच होते, नंतर **शिवाजी राजे** सात आठ वर्षांचे जाले, जन्मापासून भेटी नाहीं, **संभाजी** राजे वारले; सबब **जिजा-बाई** साहेबांस बोलावूं पाठविलें, ती निघाल्याचें वृत्त कळलें. त्याजवरी **रणदुलाखान** यांणीं **राजांस** पादशाही हुकूम पाठविला कीं, '**शि-वाजी राजे** तुमचे चिरंजीव, तुमच्या भेटीकरितां निघाले आहेत, येतील; तुह्मांसही झहागिरींत जाऊन, फार दिवस जाले आहेत. त्यास तुह्मी हुजूर आलां, ह्मणजे सरकारचेंही दर्शन घडेल; आणि चिरंजीवही येऊन भेटतील'. त्याजवरून, **राजांनीं** दुसरें लग्न केलें, त्यांचे पोटीं **व्यंकोजी** राजे जाले होते, तेथें **निळोपंत** आमात्य कारभारी ठेवून, सडे तयार होऊन; विजापुरानजीक गलगल्यास कृष्णा-तीरीं येऊन, मुक्काम केला. **शिवाजी महाराज जिजाबाई** साहेब सुद्धां काराजगीस आल्याचें पत्र आलें. पादशाही आज्ञा येण्याची; तेव्हां तेथून निघोन, बेगम तलावावरी येऊन उतरले. तेथें **रणजि-तखान** व **रणदुलाखान** येऊन भेटून, सत्कारानीं हजरतीस बोहर बागांत जातांना मार्गांत मुजरा होऊन, हजरतीनें बहुमान करून, हत्तीवरी घेऊन, बागांतील बंगल्यांत बैठक केली. तेथें बसवून कर्नाटक प्रांतांतील व **संभाजी** राजे यांस गोळा लागोन ठार जाल्या-चें वृत्त विचारून, बहुत समाधान केलें. तों **शिवाजी महाराज**

झाल्याचें वृत्त कळोन, आज्ञा घेऊन, घरीं जाऊन भेटले. आनंदोत्सव झाला; भोजनें करून, जिजाऊ साहेबांचें व राजांचें बोलणें, नूतन लग्न, तत्संपादनीं प्रीति व्यवहाराचीं होऊन, हास्यविनोद केला. उभयतां अद्वैत वर्तत असतां, शिवाजी महाराज यांस हजरतीचे भेटीस नेलें, मुजरा करविला; परंतु एक वेळ रामराम करून, वडिलांजवळ बसले. अज्ञानपणा, घरीं सर्वांस रामराम करणें शिक्षा, त्या चाली अन्वयें, बालभावें रामराम करितात, थोर समंजस झाल्यावरी कशास करतील? अशा अर्थानीं हजरतीनें विकल्प मनांत न आणितां, लोभपुरःसर येऊन, शिवाजी महाराजांचें लालित्य करीत असावें. नित्य नूतन भूषण, वस्तू, पदार्थ, भिन्न भिन्न दिवसादिवसाचे ठाईं देत असावें. याप्रकारें दोन तीन वर्षें होत आलीं. नंतर आठ नऊ वर्षांचें वय जालें. आगतस्वागत समजों लागलें; हजरतीजवळ रामरामच करण्याचा पाठ राहिला. हजरतीनें मनांत आणिलें कीं, 'हा मूल राजदरबारांत येत असतो. सर्वत्र चाल पाहतो, असें असोन याजला कुरनूप करावयाचें ज्ञान नाहीं; ज्ञान नाहीं ह्मणावें, तरी उत्तरप्रत्योत्तरीं दक्ष आहे, तेव्हां समजोन करतो काय न कळे, याची परीक्षा पहावी' असें मनांत आलें. परंतु शहाजीचे मनांत राग येईल, अल्पाकरितां मोठे मनुष्याची स्पर्धा करावी, हें समर्थास श्लाघ्य नाहीं, असें ह्मणून नित्य पाहानुसंधानें वागत जाले. राजांचे स्वारीपुढें शिवाजी महाराजांची स्वारी, चिमणी घोडी, चिमणी पालखी, चिमणेच भोई, चिमणे चोपदार, चिमणे स्वार, कारकून, शिबंदी, चिमणी चिमणीच, समागमें चालत असतां, हजरतीची स्वारी गुलाल बागेंत गेली कळल्यावरोन, रोशनपुऱ्यांतून गुलालबागेंत जातां, मार्गीं कसायाचीं घरें लागलीं; तेथें पशुमांस कच्चें विकावयास बसलें पाहिलें. त्यांत गुरांचीं मस्तकें

मांडिली होती. ती पाहून भृकुटी चढवून, अत्यंत तिरस्कार करिते जाले. लहान, यांजमुळें पारपत्य करण्यास विचार केला. हजरतीस रामराम करून, आपले जाग्यावरी जाऊन बसले. प्रकृत बहुतच खिन्न पाहिली. त्याजवरोन जवळ बोलावून, शिवाजी महाराजांस विचारिलें, 'आज तुमची मर्जी बहुत दिक आहे, काय कारण?' त्याजवरून राजांनीं उत्तर केलें कीं, 'मार्गीं महावधादिक दृष्टि पडल्यावरून, अन्तःकरणास त्रास जाला, चैन पडत नाहीं.' त्याजवरून प्रत्योत्तर हाजरतीनें दिल्हें कीं, 'तझाम बकऱ्याचें मांसाचा कंटाळा येत नाहीं, तसा आह्मांस आमचे लोकांस तिरस्कार नाहीं'. याजवरून महाराजांची मर्जी फारच जात राहिली. ते समई शहाजी राजांनीं हजरतीस विनंती केली कीं, 'आजपर्यंत खुदावंद, किल्यावरी राहिले, तेथें ह्या प्रसंग पाहिला नाहीं, येथें पाहून अज्ञानपणें बोलतात, यास वाकफ काय आहे.' ऐकून शहाजी उमदा मनुष्य, सरकार उपयोगी, जाणोन, कसाई आणोन, गांवाबाहेर आडमार्गीं गैरवळणीं तुह्मी दुकानें घालोन, उदीम करावा; गांवांत दुकान पाहिलें ऐकिलें असतां, पारपत्य केलें जाईल, याप्रमाणें ताकीद केली. ती महाराजांनीं लक्षांत आणून, पुढें चार दिवस राज्य करतील, असें मनांत वागविलें. संतोषी होऊन, घरास गेले. नंतर महाराजांस शहाजी राजे यांनीं एकांतीं नेऊन, जिजाबाईसाहेबांसमक्ष आज्ञा करिते जाले कीं, 'तुम्ही मुलें, तुह्मांस ज्ञान काय? भलतेच गोष्टीचा विषाद मानून, अंगीं क्रोध आणून, मुजरा न करणें, महावध न पहाणें, मार्गीं पारपत्यास उदित होणें, हें चांगलें नाहीं. बाबा, आम्ही असें वागतों, तरी आह्मांस बसावयास जागाच मिळतीना. तुम्ही दैवाचे, तुह्मांवरी कोणत्या अर्थेंकरून लोभ ठेवून, लालनपालन करितों, हेंच सर्वोत्कृष्ट मानावें; तुमचे वडील जवामर्दीनीं प्याद्याचे फर्जीपणास आले.

किती कसाले भोगिले, त्यांचे जिवास दुःख विचारावें. त्याचे शतांश दुःख आह्मांस ठाऊकच नाहीं. तेथें आमचे सासरे, उमराव, सप्त हजारी मनसबदारी, त्यांणीं आपले लेकांचे कल्याणाकरितां आमची बरदास्त ठेवावी, तें सोडून लग्नारंभापासोन हा वेळपर्यंत सुरीच हातीं धरली. पादशहाचीं मुलें दौलताबादेस लहान, त्यांजला आमचा लळा, त्यास मुलें आह्मांस सोडून, एक क्षण राहीनात, तेव्हां त्याचे योगें करून, तक्तावरी बसणें प्राप्त जालें. त्याजमुळें दिल्लीहून फौज आणविली, लढाईंत आह्मीच मरावें; परंतु पूर्व प्रारब्धानुसार लढाई शिकस्त करून, जगून वांचून आलों, स्वामीदर्शन जालें. कारभार आमचे हातून घेऊं लागले. हें दुःख आमच्या सासऱ्यास वाटून, पुन्हा दिल्लीची फौज आणून, लढाई करून, दौलत बुडवावी हें मनांत धरिलें. हें आम्हांस समजोन, खावंदाची रजा घेऊन, हर यत्न करून, निघोन येथें आलों. मागें कारभारी चतुर साबाजी वारले. मलिकांबर कारभारी जाले. दिल्लीची फौज आली, त्यांणीं दौलत गारत करून, आपली सत्ता ठेवून, सर्व अमीर उमराव यांस दिल्लीस चाकरीस नेलें. खावंद व खावंदीण तीन मनुष्यें निघोन मक्कस गेलीं. या प्रमाणें अवस्था जाली. आमचे सासरे, सप्त हजारी मनसब होती, दूर होऊन, दोन हजार फौजेनिशीं दिल्लीची चाकरी करूं लागले. मलिकांबर एकटा मक्केस निघोन गेला. आमचे वडिलांचे पुण्य समर्थ, त्या योगानीं, या आश्रयानीं, मोठे उमदेपणानीं ठेवून घेऊन, भाडभीड बाळगितात, असा आश्रय दुसरे जागीं मिळावयाचा नाहीं. तुम्ही खावंदास मुजरा करून, आर्जवानीं लीनपणानीं जितके वागाल, तरी गरिबीनीं आर्जव करून वागल्यास, ही दौलत तुमचीच आहे.

तुम्हांशीं जुदाई वागविणार नाहींत आणि तुम्हासारिखा श्रीमंत दुसरा कोण्ही नाहीं, असें होईल. न वागाल तरी राज्यांतून काढून देतील.' हीं वाक्यें ऐकून, प्रत्युत्तर न देतां, मौन्यच राहिले. कारण वडिलाशीं प्रत्योत्तर करणें, ही अवज्ञा, व आपण अवतार घेतला, हा सर्वांस सुख द्यावयास, तेव्हां त्या करण्याचें प्रकटीकृत जाल्यास जनांस बोध होऊन, मायामोह पडळ, दूर होतें; भगवल्लीला मुख्य प्राधान्य, त्या योगें स्तब्ध राहून, मायार्णवीं मोहाप्रती पावविते जाले. नित्य पाठाप्रमाणें जाणें, येणें, बोलणें, वागणें, तसेंच चालू राखिलें. हजरतीचे मनांत द्वैतभेदचे नाहीं. व मंडळी सर्व अनुकूल, त्यामुळें व्यंगोक्तीची गोचरता करण्यास कोणी छलकता केली नाहीं, म्हणोन आब राहिला. ईश्वरी करणी विचित्र, द्वितीयेचा चंद्र वृद्धि पावतो, तद्वत् **शिवाजी महाराज** दिवसें दिवस थोर होंतें चालले. यवनेंद्राचे द्वारीं जाण्यास मार्गाचे ठाईं महावध बंद केले असतां, राज्यच त्यांचें, त्या योगें अन्नमांस घेऊन, सरकार वाड्यासंनिध उदमी यांणीं येऊन, दुकानें घालोन बसावें; **राजांस** बहुत वाईट वाटावें, परंतु निरुपाय; याजवरून **शहाजी** राजांस एकदोन वेळ समक्ष विनंती केली कीं, 'आपण वडील, मी अज्ञान, हरवक्त सरकार चाकरीस आपणांस, जावें यावें लागतें, तेव्हां जातां येतां, महावध होतात, हें मना करवणें आपल्यास घडत नाहीं; कारण तावेदारीचा इरादा, खावंदास जेणेंकडून सुख, ती गोष्ट बोलले, तरी रुचीस येऊन, आपला बोज वाढतो, त्यांत न्युनाधिक्यें बोलल्यास, अन्तःकरणांतून लोभ त्याचा कमी होतो. त्यास आपणास चाकरी करणें, आह्मास आपण वडील शिरावरी असतां, अशा बारीक गोष्टीची विचारणा कशाकरितां आम्ही कराव्या. या उपर दृष्टीस महावध होतां, तीं मनुष्यें पाहिलीं, तरी तत्काल

शिरच्छेद करवीन. मग अविचारीपणा मजकडे येईल, याजकरितां ही शब्दमाला लक्षांत आणून, बंदोबस्त करावा. मग मला बरोबर येण्याची आज्ञा करावी, तों पर्यंत सरकारांत चलावयाविशीं मला आज्ञा न यावी'. असें बोलून मातुश्रीकडे जाते जाले. **राजे** यांनीं **शिवाजी महाराजां**चीं उत्तरें ऐकून, परम संकटीं पडोन, विचार करिते जाले कीं, मूल अज्ञान म्हणावा, तरी मोठे समंजसपणाचीं बोलणीं बोलला. वाईट बोलला, ह्मणोन त्याचे बोलण्यास दोष ठेवावा, तरी धर्मन्यायें उत्तरें केलीं. वडीलपणानीं आज्ञा करून बरावर घेऊन जावा, तरी उद्यांची कलागत आजच प्राप्त होणार, न नेला तरी हजरत विचारतील कीं, मुलास कां न आणिला, तेव्हां काय उत्तर करावें, असे संकटांत असतां **मिरजुमला** नवाब आले, त्यास सामोरे जाऊन, घेऊन येऊन बसले. त्यांणीं दरबारी बोलणीं, कामाकाजाचीं कित्येक बोलले; त्यांचीं उत्तरें ही **राजे** करीत गेले; परंतु मनाची खुषी कांहींच बोलण्यांत आली नाहीं, जाणून नवाबांनीं **राजांस** विचारिलें कीं, 'तुह्मी बोलतां, मीही ऐकितों, जाब करितों; परंतु तुमचे दिलापासून उत्तरें निघत नाहींत, दिलगिरी चर्या दिसती, याचें कारण काय ? आह्माशीं बोललें म्हणून चिंता काय आहे ? तुमची आमची जुदाईच नाहीं, जाणून हरवक्त तुम्हाकडे नेकीनें सल्लामसलतीस येतों; त्यापेक्षां तुह्मी आह्मांशीं खिलाफ न ठेवितां, साफ दिलानें बोला'. त्याजवरून **राजांनीं** सांगितलें कीं, ' आह्मी हजरतीस मायबाप समजोन वागलों व पुढेंही आमची नेकी हीच ईश्वर शेवटास नेवो. त्यांत आलिकडे आपत्यें एक दोन जालीं. त्यांत जेष्ट तरी शांत जाले. ते फार गरीब, शाहणे, मुरवतदार, मनुष्याचा दरकार, सर्व गोष्टींनीं लायक होते; त्याचा आमचा . ऋणानुबंध सरला. ईश्वरें त्यांस अखेर

केलें. ईश्वर इच्छा, त्या पुढें कोण जाणार? प्रस्तुत एक पुत्र, मोठ्या कबिल्याचा व दुसरे कबिल्यास एक पुत्र, असे दोघे जवळ आहेत. त्यांत जेष्टाचा स्वभाव बहुत तामसी आहे. त्याजला आह्मी सरकारांत जाण्याविसीं आज्ञा केली. त्यांनीं उत्तर केलें, 'कीं तुम्ही वडील, तुम्हीच जावें यावें, आह्मी जाऊन, रोजगार मिळवावा. त्यास तुह्मी करितां हाच रोजगार आमचा आह्मी करावया योग्य होऊं, तेव्हां जाऊं येऊं. आतां जावें, तरी महावध राजगृहा-वेष्टित होतात, ते पाहून आमचे मस्तकास पित्त चढून, आमची प्रकृत ठिकाणीं राहत नाहीं, आपण दुराग्रह करून, पाठविलें तरी जाऊं; परंतु तसा प्रसंग पडिला, तरी दृष्टीनें पाहिलें असतां, शासन करितां तेथें कलह उत्पन्न होईल. मग दोष ठेवाल, या करितां ही विनंती लक्षांत आणून, आज्ञा करणें ती करावी'. असें उत्तर दिल्हा वरून, 'मनांत विचार करितों; परंतु सुचत नाहीं. यास तोड कशी ती तुम्ही सांगावी'. त्या वरून तेही स्तब्धच राहून, राजांस उत्तर दिल्हें कीं, 'मुलास घरीं राहूं द्यावा. तुह्मी आह्मी दरबारांस जाऊं, हजरतीची मर्जी पाहून बोलूं. मग जें सांगणें असेल, तें सांगू'. असें बोलून, उभयतां दरबारास गेले. सरकारी कामकाजें कर्तव्य तीं केलीं. त्या समई हजरतीची मर्जी बहाल पाहून, अर्ज केला कीं, 'खुदावंद, हजरत, आपण पृथ्वीपती, सर्वांचे मायबाप, आपणा जवळ हिंदु व मुसलमान याचा किलाफ नाहीं, कारण सर्वांस वडील. तेव्हां ज्याचा जसा धर्म, तसें त्याणीं वर्तावें, या नीतीनीं वागतां ह्मणून ईश्वरी खुदाई हुकूम आपले पल्यांत बांधून दिल्हा. त्या पेक्षां हिंदु लोक लहान थोर हजरतीजवळ वागतात. त्यांचे बोलण्याची तथा राहिली नाहीं; कारण आपली मर्जी प्रसन्न ठेवून, निर्वाह करून घेणें, गांत गैररस्ते हजरत चालले, तरी त्याची निगाह

बानी खुद्रा परवरष करितो. तेणेंकरून आपले नेकीची कमाई सारिखीं देणीं देतो. वास्ते माझे दिलास हिताहित वाटलें, तें जाहीर करितों. पहिले शहाजी राजे यांचा पुत्र व स्त्री भेटीस आली, ते समई कसाई यांचीं दुकानें शहरांतून काढून, बाहेर कसाईपुरा वसाहत करविली असोन, हल्लीं सरकार हवेली नजीक दुकानें घालून, मार्गांवरी महावध करितात, ह्मणून शहाजीचा बेटा आज शहाजीवर घुस्सा भरून, येत नाहीं बोलला. त्यास हजरतीनें हुकूम केल्याप्रमाणें वर्तणूक व्हावी, तें राहून, आपलेच कारकिर्दींत बंद राहिला नाहीं. पुस्त दरपुस्त मग कायदा कसा चालेल, असा अंदेशा येऊन, ही विनंती केली. ही लक्षांत आणून, सर्वांस योग्य दिसे, अशी आज्ञा जाली पाहिजे'. तेव्हां याजवरून शिवाजी महाराजांचे शहाणपणाची हजरतीनें तारिफ करून, वजीर आदीकरून उमराव बसले, त्यांस आज्ञा केली कीं, 'तुम्ही दररोज जातां येतां, नवीन जालें पाहून सुचवावें, तें न करितां वागलां, तेव्हां कारभारांतही बेफामी अशीच असेल, असो. अतःपर कसाई यांचीं व दारुवाले यांचीं दुकानें, शहरापासून एका कोशावरी पुरे वसवून, तेथें दुकानें घालावीं. ज्यास घ्यावयाची गरज, त्याणीं तेथें जाऊन, खरिदी करावी. शहरांत दुकानें घातलीं, असें ऐकण्यांत आलें असतां, परिछिन्न कार्यास येणार नाहीं. आणि महावध हिंदूंनी पाहूं नये, हा हिंदूंचा धर्म, त्यास त्याणीं वधकर्त्यांस जिवें मारलें, तरी सरकारांतून त्यास शिक्षा होणार नाहीं. याप्रमाणें कौलनामा लेहून, हिंदू लोकांस जाहीर करून, कसाई यांस ताकिदी करणें'. याप्रमाणें जाहिरनामा करून, हिंदू लोकांस कौल माहित केला. दौंडी पिटली आणि सोटेवारदार कसायांचे मागें लावून, तीन तीनशें रुपये दर दुकानास दंड घेऊन, त्यांजला वसाहतीस दक्षिण दिशा शहरची, तेथें राहवयास परवा-

नगी दिल्ही. कसाईपुरा व कलालपुरा, असे दोन पुरे वसविले. **शिवाजी महाराज** यांस मुद्दाम हजरतीनें दुसरे दिवशीं बोलावूं पाठवून, आणिलें, हकिगत विचारली. त्यांणीं प्रत्योत्तरें हाजरतीचे मर्जी माफक, हिंदुधर्मस्थित. बोलले. तें ऐकून संतोषी होऊन, वस्त्रें, भूषणें, व भक्षणीय पदार्थ मेवामिठाई, अनेक प्रकारची घेऊन, स्वहस्तें देऊन, समाधान केलें. त्या दिवसापासून दररोज सायंकाळीं **महाराजहीं** जाऊं लागले. याप्रकारें वर्ष दीड वर्ष चाललें असतां, कोणी एक दांडगा कसाई, मांस पाटींत भरून, शहरचे दरवाज्यानजीक आंत येऊन, बसला. तिकडूनच **शिवाजी महाराज** स्वार घोड्यावरी होऊन, शेंपन्नास मुलें समवई, अमीर, उमराव, सरदार, सिलेदार यांचा, ... फिरावयास जातां, त्यांचे आसबाबी वीस पंचवीस पन्नास माणूस एकएकाचीं, अशीं सर्वांचींच होतीं. त्यांत **शिवाजी** महाराजांचे दोन तीनशें स्वार चांगले व शें दोनशें माणसें होतीं. कसायाचें दुकान सन्मुख पाहतांच, आपण जातीनें तरवार काढून, तत्काल त्या कसायाचा शिरच्छेद केला. त्याची स्त्री हजरतीचे वाड्यांत जाऊन, हकिकत सांगून रडूं लागली. हें वर्तमान दरवाजकरी याणींही सांगितलें. सर्व ऐकून घेऊन, '**शिवाजी** राजे' यांणीं ठीक केलें; तुम्हांस, शहरांत येऊं नये, दुकान घालूं नये, असें सांगितलें असतां, शहरांत विकावयास आला, त्यापेक्षां शिक्षा केली ही नीट केली; या उपरी शहरांत येऊन, बसलां असतां, परिच्छिन्न कार्यास येणार नाहीं'; म्हणोन ताकीद करून, चार रुपये दफणाईस देऊन, चोट्यावरी शेर रांडरोटी करून दिल्ही, ती हा वेळपर्यंत चालत आहे. व दुकानांवरी सरकारी कर आहे, तो त्याचा एकट्याचा माफ केला. त्या दिवसा पासून, दारू व मांस शहरांत विकूं नये. असा चक्र बसला. हजरतीकडे प्रातःकाळीं **शिवाजी** राजांनीं जाऊन, मुजरा करावा,

आज्ञा करतील, ती ऐकून घेऊन, चाकरी बजावावी. पुढें काम काजांत वागण्यास हुशार जाले असतां, तितका विसावा म्हणून, **शहाजी** राजे यांणीं उद्योगपूर्वक करीत असावे. परंतु **शिवाजी** राजे यांणीं मुजरा न करितां, हजरती जवळ जाऊन बसावें' असें कितिएक दिवस चालले असतां, हा गुण पादशाहानीं बालभावावरी लोप होऊन, बारीक मोठें विचारणें तें विचारावें. त्याचें प्रत्योत्तर समर्पक **महाराजानीं** द्यावें, तें **शहाजी** राजांसही समई न सुचावें, असें बोलावें. त्या भाषणावरी हजरत बहुत बहुत संतोष राहून, मागें पुढें **शिवाजी** महाराजांची स्तुति करीत असावी कीं, 'आमचे दौलतींत **शिवाजी** सारिखा दैववान् मूल, दुसरा कोणताही दिसत नाहीं. बोलणें, उठणें, मर्यादा, सर्वाभ्य चांगला; त्याजवरून संपूर्ण चाल घरचे वडिलावडिली. प्रभूनीं गुणानुवाद ग्रहण करून, उत्तम प्रकारें बोलले असतां, अनुभवीं जाणून, प्रत्योत्तर समर्पक देतात, योग्यताही वाढती, असे कित्येक दिवस गुजरले. पुढें रमजानची ईद जाली. **शहाजी** राजांस समाधान कांहीं विशेषात्कारें वाटत नहुतें. याजकरितां **शिवाजी** महाराज कारभारीसुद्धां स्वारीस जाऊन, परत आले. नंतर हजरत तख्तनीस होऊन, तमाम नजराणे देण्याची सुरवात जाली. त्यांत **शहाजी** राजे यांचा नजराणा करावयाचा, तो **शिवाजी** महाराजांबरोबर कारभारी गेले, त्यांणीं सांप्रदायाप्रमाणें पुढें ठेवून, मुजरा करून, जामदारखान्यांत लाविला. **महाराज** यांस मुजरा करण्याविशीं बहुत प्रयत्नपूर्वक सांगितलें असतां, मुजरा न केला. कांहीं दिवस गुजरल्यानंतर, हजरत **शहाजी** राजे यांचे घरीं समाचारास आले. समाधानवाक्यें परस्पर जालीं. **राजांनीं** स्तुति हजरतीची बहुत करून, नजराणाही केला. त्या रंगांत सहजगतीनें हजरतीनें सांगितलें कीं, 'दररोज खिदमतीस **शिवाजी** येतो; परंतु

बंदगी बजावीत नाहीं. ईदीचे दिवशीं मुजरा करण्याविशीं फार फार तुमचे कामदारांनीं सांगितलें; परंतु त्यांचें देखील मानिलें नाहीं. हलकी गोष्ट आह्मी काय सांगावी? आजपर्यंत यांचे अज्ञानपणावरी बोललों नाहीं. आतां दहा वर्षांचें वय होत आलें; लोकांचीं मुलें बंदगी बजावितात, हात जोडून उभे असतात; यांजला आम्ही सदर परवानगी बसावयाची दिल्ही. त्याप्रमाणें येऊन बसतो, विचारावें त्याचें उत्तर समर्थक देतो, याजवरी आम्ही संतोष पावून, खुषी होतों; तो मुजरा न केल्याचा अपराध विसरोन जातों. आज तुह्माजवळ आम्ही फिर्याद केली. आतां याचा मुलाहिजा ठेवणार नाहीं'. त्याचें प्रत्योत्तर **राजांनीं** केलें कीं, ' लेकरूं आपलें, आपण लडिवाळपणा चालवून नेला, ह्मणून गैरआदबी जाली, त्याची शिक्षा करून सन्मार्गीं लावून वागविणार खुदावंद आहेत.' त्या उपरी कचेरीस गेल्यानंतर, राम राम हजरतीस करून बसूं लागले. मुजरा करावयासी सांगितलें असतां, जाब द्यावा कीं, 'मला बालपणापासून शिकविलें नाहीं; आतां आज्ञा होती, करीन म्हणतों, विसरून जातों. या जोहारांतच कुरनुष आहे'. हें ऐकून, पादशाहानीं हंसावें. पुन्हां बोलूं जातां म्हणावें, '**शहाजी** राजे व आपण दोन सारिखे दिसाल, तरी मी मुजरा करावयास शिकेन, तेव्हां करीत जाईन. नाहीं तरी पायावरी डोई पाहिजे तरी ठेवीन; ती **राजांनीं** ठेवण्याकरितां शिकाविली. परंतु मुजरा लोक करितात तो पाहतों; मला करावयासारिखें वाटत नाहीं. कारण ही पादशाही आमचे वडिलांची; दुसरी जुदाई अन्तःकरणांत वाटल्याखेरीज मुजरा कसा करावा? परकी कोणी दिसेल, तेव्हां तसलीमात बजावयाची; माझी पादशाही, माझे वडील प्रत्यक्ष असोन, आणि मी मु-

जरा कोणास करूं? नवीन दुसरा धणी, आईबाप होईल, तेव्हां करीन, मर्धी मला सुचत नाहीं.' हें ऐकून अधिकच हंसावें. जवळचे कामदार मंडळीनीं ऐकून हंसावें, 'काय जाब देतो' म्हणावें. अशा वरच कांहीं दिवस गुजरले. पुढें **शहाजी** राजे यांस साद्यंत वृत्त सांगितलें. त्यावरून घरीं येऊन, **शिवाजी** महाराजांस **शहाजी** राजे याणीं वहुत बोध केला. त्याचें उत्तर केलें कीं, 'सामोपचारें ठेवण्याचे रितीची मर्जी समाधानें ठेवून येतों जातों: तुम्ही उगाच बोभाट करून, तुमचे माझे दर्शनाचा वियोग पाडून घेऊं नका; तुरकास मुजरा सहसा करणें नाहीं. तुमचे बद्दल मुरवत पायावरी डोई ठेवितों बोललों. याजवरी कोण्ही बोलल्यास आपणांस सहन होणार नाहीं. यास्तव ही विनंती लक्षांत आणोन, आज्ञा करणें ती करावी'. अशीं अक्षरें समक्ष ऐकून, पारपत्य करावें, तरी अज्ञान मूल, न करावें तरी उत्तर साफ देतात. त्यास सोसावयाजोगें मारणें अथवा सांगणें सांगितलें असतां, तामस प्रकृत **शिवाजी**ची आहे. क्रोधावेश येऊन कोणताही अंदेशा न ठेवितां, काय करील न कळे. वडील धाकटे म्हणणार नाहीं, याचा भरंवसा धरूं नये. असा विचार करून, विवेकानीं राग आला, त्याचें शमन करून, अंतःपुरांत जाऊन **जिजाऊ** साहेबां जवळ जाला प्रकार सांगितला. त्यावरून तीही उदास होऊन, दुसरे दिवशीं भोजनोत्तर **शिवाजी** महाराजांस एकांतीं घेऊन बसोन, युक्तीनें गोडीच्या गोष्टी बोलून, **राजां**नीं सांगितल्या प्रश्नाचा प्रकार बोलती जाली कीं, 'तुम्ही प्रौढ जालांत, तुम्हांस वधूचीं बोलणीं येतात, त्यास लग्न करणें, लौकिकानुरूप केलें पाहिजे. त्याचा खर्च वेंच धणी शिरावरी, मायबाप समर्थ आहे. तुम्ही धण्याची मर्जी संपादून, वडिलास बोलावें असें पडूं न

देतां वागावें; तें राहून मुजरा करण्याविसीं तुमची आड, यजमानाजवळ ये विसीं वाडिलांनीं सांगितलें असतां, अमान्य केलें; हें तुम्हांस चांगलें कीं काय ? आतां दिवसेंदिवस थोरपणा आंगीं धरून, कामकाजें करीत जावीं. तें राहून सर्वां ठिकाणीं वडिलांनीं पाहावें, मग तुम्ही काय करून असावें? मुला, नीट मार्गानीं चालत जावें. वडिलांची अवज्ञा करीत जाऊं नये, सर्वांत भलाई जोडावी, प्रपंचीं दक्षता धरावी, कोण्हाची निंदा न करावी, चालते अर्थीं उपकारच करीत जावा, द्वेष कोण्हाचा न करावा, स्वहितबुद्धिनें वर्तावें, धर्मार्थी शरीर झिजवावें, देवब्राह्मण वंदावे, गैरचालीनें चालूं नये, परंपरा वागल्यामार्गें वर्तत असावें, त्यास अंतर पडल्यास, कुलास बट्टा लागतो, समजोन परधन व परस्त्रीचा कंटाळा मनापासून करावा, सन्मार्गानीं चालावें.' असें कितिएक प्रकारें बोध केला. त्याचें उत्तर महाराजांनीं केलें कीं, 'आई, तूं सांगितलेंस, त्याहून अधिक करावें, असें माझ्या मनांत वाटतें; परंतु तुरुक मुसलमान पाहिले, ह्मणजे सर्व विसरून, केव्हां शिरच्छेद करीन, अशी बुद्धि मजला उत्पन्न होती, ती दूर होत नाहीं. त्यांत तुम्ही अगर हरएक प्रौढ, नीतीचें सांगतात, हें ऐकावें, असें मनांतच येत नाहीं, याजला माझा उपायच नाहीं. इश्वरी सत्ता काय असेल, ती असो. याउपरी मजला जवळ ठेविलें आणि यवनाधीशाची गांठ पडली, तरी अनर्थ उत्पन्न होईल. तुमचा आप्रमाद मजवरी येईल, असें करूं नका, दोन पावलें दूर ठेवावें; तेथें माझें दैव व मी, इच्छेस येईल तसें करीन. तुम्ही त्या करण्यांत तिळभर मन घालूं नये. आपली मर्यादा आपले हातून रक्षण करून घ्यावी. हें मी अवज्ञा करून बोलूं नये, परंतु सुचले अर्थीं मनीं ठेऊं नये. ही विनंती तुजला व वडील साहेबांस तुझे जवळच केली, समजोन करावें'. असें

बोलून, आपण शाळेंत घोडीं हत्ती पहावयास गेले. महाराजांचें पहाणें, लक्षावधी जनावरें, त्याजवरील माणूस कोण कोणत्या जनावरांवरील, कोणत्याचें नांव काय, त्यास चंदी रतीब काय, कोण्हास किती, हें करतलामल स्मरण, कोठें ही बसलें असतां, त्या जनावराकडे दृष्टी जातांच सांगावें, आज अमूक दाणा रतीब खादला, अमूक न खादला, फलाण्याची चाकरी जाली, फलाण्याची चाकरी जाली नाहीं; असें सांगून पत्ता मुद्दा पुरवून द्यावा. याजमुळें सर्वांस दहशत. शाळेंत आले असतां चौकशी करतील, माझी आबरु जाईल, भिऊन आपलाले चाकरीवरी हाजर राहून, केली चाकरी दाखवून, शाबासकी घेऊन, इनाम घ्यावयाजोगें काम असेल, तसें विनंती करून मागावें. वडिलांस सांगून देवावें. याप्रमाणें चाललें. त्यांत बंदगीची विनंती वडिलांस बाईनीं श्रुत करून, हात जोडून, बोलिली कीं, 'मुलगा सर्व कामकाजीं दक्ष, आणि मजलाही एवढाच, त्यास शिक्षा करणें मनांत धरिल्यास विहित नाहीं. आपलें मूल आपल्या मांडिवरी श्रद्धा केली, ह्मणोन कोण्ही मूल मारिलें नाहीं, व मांडी ही टाकली असें ही जालें नाहीं. त्या पेक्षां याचा व यवनांचा जन्मांतरीय द्वेष काय आहे, काय असेल तो असो. हा जवळ ठेविला असतां, हजरत आपला ह्मणोन, सेवा चाकरी सांगतील, तेथें याचा त्याचा अनर्थ गुजरेल, तेणेंकरून आपले प्रतिष्टेस हानि होईल. त्या अर्थीं तोही समजोन विनंती करतो, हें मनांत वागवून विचार काढावा, हें चांगलें.' अशीं अक्षरें ऐकून, राजांनीं श्वासोच्छ्वास सोडून, दैवावरी हात ठेऊन, उगेच राहिले. हजरतीकडील बोलाऊं आलें, तरी आपण जावें, मुलास आणिला नाहीं ह्मणोन हजरतीनें विचारिलें, तरी कांहीं कामांत गुंतले ह्मणून सांगावें. अगर हरएक बाहना करावा. याप्रमाणें

चार सहा महिने काढिले. नंतर सुमुहूर्त पाहून, **जिजाबाई** साहेब व **शिवाजी** महाराज व **अनाजी दत्तो** कारभारी यांची रवानगी जुन्नर तालुके पुणें वगैरे महालीं केली. तेथें जाऊन, नेमणुकीप्रमाणें उभयतांचा खर्च पार पाडून, बाकी ऐवज राहील, तो विजापुरास **शहाजी** राजे यांजकडे पाठवीत असावा. याप्रमाणें वर्ष दोन वर्ष वहिवाटलीं. नंतर पुण्यास **जिजाबाई** साहेब व **शिवाजी** महाराज येऊन राहिले. तेथें **दादाजी कोंडदेव** कारभारी होते. **महाराजांनीं** देव देवस्थानें चिंचवडकर **देव** व आळंदी व देहू वगैरे ठिकाणीं जाऊन पाहावें. घोडीं फेरावीं, नवे उमेदवार येतील, त्यांस दिलसा देऊन ठेवावें; त्यास पोटास द्यावें, गोड बोलावें, त्या बोलण्या वरी हा राजा परम दयावंत, याची आज्ञा मान्य करून राहिलें असतां, हा आपले लेंकरालेंकरीं चालवील; याची आज्ञा मोडून काहीं करूं नये, असे अनेक प्रकारचे मनांत तरंग उत्पन्न होऊन, मनुष्यमात्र वेधास लागले. ज्याचे त्याचे अन्तःकरणीं, या **राजाच्या** करितां आपला प्राण गेला तरी बेहत्तर; परंतु याचे चरण सोडून जाऊं नये. या प्रमाणें संपूर्ण एकदील मनुष्यें जालीं. सायंकाळीं कचेरी व्हावी, तेथें चार घटका बसावें, सर्वांची खबर विचारावी, कोण्हास काय लागेल तें देवावें. त्याजवरून **दादो कोंडदेव** रागास येऊन, **महाराजांस** विनंती करूं लागले कीं, ‘ **महाराज**, तुह्मी धणी, देवितां, आम्ही आज्ञे प्रमाणें देतों. उद्यां हुजूरचे खर्चास दोन रुपये न गेले, तरी आमची आबरू जाईल, तेथें आपण सुखावयास येणार नाहीं. आपल्यास दोन रुपये जाजती लागतात, त्याची परवानगी आणोन द्यावी, मग दोन रुपये खर्च नेमणूके-शिवाय लागेल तो घ्यावा, मर्या आम्हांस हुकूम करूं नये. आपण

आज्ञा केली आणि मी अमान्य केली, तरी आज्ञाभंगदोष आपण मजकडे ठेवितील, तरी वडिलांची आज्ञा मान्य करून वर्तूं, किंवा तुमची आज्ञा ऐकूं, ते मला एक सर्वांचे समक्ष आज्ञा सांगा'. त्यावरून **महाराज** विचारवंत, त्यांणीं उत्तर केलें कीं, 'तुह्मांस आज्ञा काय खर्च करीत जावा अशी दिल्ही, ती आह्मांस दाखवावी. ती पाहून ज्याजती आमचा खर्च तुम्हांकडे परवानगी घेती, ती नास आणोन, आज्ञा करणें ती करूं. तों पर्यंत ज्याजती खर्च जाला, तो निघेल तो तुह्मांस मजुरा वडिलांकडून देववूं. अगर खजिन्यापैकीं रोख पोत्यांतून रोखच भरणा करूं'. तेव्हां कुंठित होऊन, आज्ञेप्रमाणें लोकांस देऊन; कागदपत्र दुसरे दिवशीं समजावीत बसले. सर्व मनन करून, पांच चार हजार रुपये ज्याजती हुकमी खर्च जाला पाहून, जामदारखान्यापैकीं परवानगी सांगून ऐवज देविला. नंतर **महाराजांनीं** चाकणचें ठाणें बसवून, रुद्रमाळ किल्ल्याचे बेरड फितावून राजगड पुरंदर किल्ले घेऊन, पुण्यांतच नवी शिबंदी ठेवून, सिंहगड घेतला. हें वर्तमान विजापुरास जाहीर जालें. त्याजवरून हजरतीनें **शहाजी** राजे यांस आज्ञा केली कीं, 'तुह्मी दौलतींत केवळ धुरंधर, इतबारी, कर्ते, सर्व दौलत तुमचे भिस्तीची, असें असोन तुह्मांशीं सरकारची जुदाई नसतां, तुमचे पुत्रानीं तमाम ठाणीं उठवून, अंमल आपण बसवून करितो, हें वर्तमान तुह्मांस कळत असेल; तुह्मी त्यास ताकीद करून, रीतीनें वर्तवावें, तें राहून शिक्षा करीत नाहीं, हें चांगलें कीं काय'? त्याजवरून **शहाजी** राजांनीं हात जोडून, विनंती केली कीं, 'हजरत, मी निमकहराम नाहीं; वास्तवीक आहे तें विदित करितों जे, माझा पुत्र खरा, परंतु मजला त्याणीं उत्तर कसें दिल्हें, त्यास तें चौघांनीं

नं.......
नं. .......

एकिलें आहे, त्यांस परभारा विचारावें. माझे हातून गेला, त्याचें पारपत्य हजरतीनें पाहिजे तसें करावें. मी शिक्षा केल्याविशीं बरें वाईट ह्मणेन, तरी हरामखोर. माझ्या कह्यांतून गेला, ह्मणोन येथून काढून दिल्हा. जवळ ठेवून, त्याचा आपला हर्षामर्ष नित्य उठोन व्हावा, हें चांगलें नाहीं, जाणून दूर घालविला. आतां हें वर्तमान समजलें. आज्ञा, त्या पेक्षां ताकीद करितों लिहितों, परभारा आपण ही शोध ठेवावा'. या प्रमाणें सांगून, कारकुनापासून पत्र लेहविलें जे, 'तुम्ही सरकारी चाकर, तुमचें सर्व प्रकारें सरकार चालवीत असतां, तुह्मी तुफान करून, ठाणीं उठवून आपला अंमल बसविला, ही दुर्बुद्धि तुह्मांस कोण्ही दिल्ही ? जन्माचे अन्नदाते व पुढें त्यांचे छायेखालीं वागणें असोन, तुह्मी बदफैली केली, ही गोष्ट सर्वथैव चांगली नाहीं. तुह्मांस जातीनें रोजगार उमेदवारी असल्यास हजरत तुह्मांस तुमचे मनोदयाप्रमाणें देण्यास कमी नाहींत. पत्रदर्शनीं अंमल घेतला असेल, तो सोडून देऊन, तुम्ही विजापुरचे मुक्कामीं येणें. तुह्मास मोहीम दुसरी सांगतील, तेथें जाऊन, चाकरी करून, देतील ती घेऊन राहावें'. याप्रमाणें पत्र आलें. तें पाहून, शिरसा वंदन करून, मातुश्रीस वाचून दाखविलें. मातुश्रीनीं ही **महाराजांस** सांगितलें कीं, 'बाळा, आपला अन्नदाता धणी, त्याशीं बेइमानी करूं नये. वडिलांचे चरणास अंतरावें, लोकांनीं हरामखोर ह्मणावें, पादशहाशीं स्पर्धा करावी, यांत कल्याण नाहीं. वडिलांचे आज्ञेप्रमाणें चाललें असतां, सर्व लौकिक व दौलत आहे'. याप्रमाणें सांगितलें, हें विजापुरचे मनुष्यांनीं ऐकिलें. त्याचें उत्तर **महाराजांनीं** दिल्हें कीं, 'आई, तूं सांगितलें तें प्रमाण; परंतु यवनाधिशाचें अन्न खाऊन, आपणास रहावयाचें नाहीं, स्वतां परा-

क्रमानीं मेळवावयाचें, यांत कल्याण हो, अगर अकल्याण घडो'. असें बोलून, उत्तर या अन्वयें दिल्हें. विजापुरचीं माणसें आलीं, त्यांस शेला पागोटीं व पोटास देऊन, रवाना केलीं. तीं पत्रें विजापुरीं पोंहचून पादशहानीं पाहून, पुन्हा **राजांस** बोलावून आणोन दाखविलीं, आणि बहुत प्रकारें समजोन सांगितलें. 'तुम्ही दौलतीचे स्तंभ, तुमचा विश्वास, सर्वांपेक्षां तुमचा दरजा मातबर, आणि अंमल कामकाजही तुमचेच घरीं असोन, मुलाशीं बिगाड करून, सरकार मुरळीत अंमलांत तंटा उत्पन्न करणें, हें तुह्मीच करितां'. त्याजवरून **राजांनीं** शफतपूर्वक सांगितलें. त्यावरून **रणदुलाखान** व **रणमस्तखान** व **सर्ज्याखान** वगैरे, मातबर अमीर उमराव यांणीं ही अत्यंत सुरळितीची खात्री केली. नंतर पादशाही पत्रें व वडिलांचीं पत्रें अंमल सोडून देणें, या बाबें पुन्हा **महाराजांकडे** आलीं. तों **महाराजांनीं** प्रतापगडचा किल्ला बांधला, आणि तमाम कोंकण बांधारीं व मावळचे किल्ले घेतले, नवे बांधले, तमाम कामें लाविलीं. जेथे पहावें, तेथें द्रव्य सांपडावें. पूर्णावतारी **महाराज**, मनुष्यमात्र हुकमतींत राहिले. परराज्यांतील लोकांनीं **राजांचे** गुण व कर्तेपणा व उमेदपणा ऐकून, राजासन्निध राहून, सेवा घडावी, अशी इच्छा करून राहिले. त्यांचे मनोरथ सफल अन्तःकरणाप्रमाणें करिते जाले. या प्रमाणें पुंडावे आरंभिले. वीसपंचवीस हजार कोंकणे, व मावळे लोक, शिवाय हजार पंधराशें स्वार, शिवाय किल्लेकिल्ल्यास लोक व मजूर व कारखानदार, व कारिगार, हरजातीचे उमेदवार, त्यांची नेमणूक जेथील तेथें लावून देऊन, बंदिस्त पैका जेथें सांगतील, तेथें खाणोन काढून घ्यावा. या प्रमाणें **महाराजांनीं** कीर्तिध्वज उभारिला. अनिवार **महाराजांचीं** सिबंदी, संपूर्ण प्रांतांत दहशत पडली, जाणून विजापुराहून **अबदुलाखान** व **रणदुलाखान** बारा हजार फौज

घेऊन येऊन, प्रतापगडास राजे होते, तेथें बोलण्यास वकील पाठविले. त्यांणीं राजदर्शन घेऊन, पादशाही फरमानाप्रमाणें वांका जाहीर केला. त्यांस उत्तमप्रकारें भोजनास संरजाम देऊन, तिसरा प्रहरां यावें ह्मणोन सांगून, विऱ्हाडास पाठविलें. महाराजांनीं जालें वर्तमान मातुश्रीस सांगितलें. ती चिंताक्रांत बसली. मुला, सांगितलें असतां, अनिवारपणा करून ऐकिलें नाहींस; आतां हें अरिष्ट दूर कसें होईल? यांत आबरू जतन होणें दिसत नाहीं, ईश्वर वांचवील तरच, नाहींतर जें घडणें तें घडेल, असें मनांत आणोन, सचिंत बसली असतां, महाराजांचे आंगीं रोमांच उभे राहून, नेत्र आरक्त जाले, हें आईनीं पाहून, सर्वत्र मनुष्य दूर करून, खोलींत धूप घालून, चरणावरी मस्तक ठेवून, हात जोडून, विनंती करिती जाली 'कीं, हें संकट आलें, तें दूर कोणत्या प्रकारें होईल, ती आज्ञा करावी '. त्यावरून श्री प्रसन्नोत्तर बोलती जाली कीं,' हें संकट तुह्मी कशास मोजितां, त्याजला येथें भेटीस ह्मणोन बोलावून आणोन, त्याचें शासन करावें; मी सर्वस्वीं अनुकूळ आहें; ये विशीं मी पूर्वीं पुणें मुक्कामीं प्रारंभाचे समई अभय दिल्हा-प्रमाणें, तुमचे मनोरथ सिद्धीस नेले, तसेच पुढेंही मनोरथ सिद्धीस नेईन, तूं ये विशींची काळजी तिळप्राय करूं नको'. अशी गंभीर उत्तरें श्रीचीं श्रवणीं येऊन, चरणीं मस्तक ठेवितांच अदृश्यता जाली, मग मातुश्रीनीं जालें वृत्त चिरंजीवास सांगितलें. नंतर अती हर्षायमान होऊन, वकिलास बोलावून आणोन, एकांतीं नेऊन, त्यास विचारिते जाले कीं, 'तुह्मी ब्राह्मण सत्यवचनी, तुह्मांस हिंदूधर्माची इच्छा, किंवा यवनी धर्माची इच्छा, हें एक सत्यपणें सांगा'. बोलल्यावरून वचनीं गुंतवोन, हारद्र त्याचें पोटांतील काढून घेतलें. त्यांत मुख्य अभिप्राय कीं, तुह्मास भेटीस लोभ दाखवून नेऊन, कैद करावें,

पुढें हजरतीचे इच्छेस येईल, तसें पारपत्य करोत. तुमची आबरू न ठेवितां, येथून घेऊन जावें, हा त्याचा मनोदय आहे. हें ऐकून, **महाराजांस** स्फुरण येऊन, बरें, काय चिंता आहे, असें बोलून त्याजला केवळ आगत्यांत ठेऊन, उस्तवारी राखून, त्याजपासोन व आपण पत्राचीं प्रत्योत्तरें लेहून रवाना केलीं कीं, '**महाराजांची** चाल बहुतच चांगली आहे, थोरपणाची आहे. त्यांचा हेतु इतके जवळ आलां, त्या पेक्षां हें स्थळ पावन करावें, वडिलार्जित स्नेह घरोबा आपण मानितां, त्या पेक्षां त्यांचे ठाईंच आपण समजून, खिलाफ दूर करून, प्रतापगडचे मुक्कामीं भेटीस यावें, भेटी अंतीं ठरण्यांत येईल, तशी त्या प्रमाणें वर्तणूक होईल. या प्रमाणें लेहून, पाठविलें. वकिलाचेंही लिहिलें गेलें. तीं पत्रें त्यांणीं पाहून, येण्याविसींचीं निश्चयोत्तरें आलीं, समागमें सरंजाम व तोफखाना आण्यास कोलाणा मार्ग रस्ता कुशाद असावा. तुह्मी लिहिल्याप्रमाणें भेटीस तुमचे येण्यास, इकडून जुदाई नाहीं. पहिलाच घरोबा आहे, या प्रमाणें उत्तरें आलीं. ती पाहून संतोष **राजांस** वाटून, हजारोंच मनुष्यें लावून एक रस्ता मातबर करून, वरकड रस्ते बंद केले. तमाम जागजागीं लोक ठेवून नाकेबंदी केली. आणि **अवदुलाखानास** मेवामिठाई भाजीपाला, वगैरे नजराणा सिबडी पाट्या भरून डाल्याच्या डाल्या पाठविल्या व घांसलकडी मडकी चंदी ठाई ठाई वाणी बसवून देऊन, खानाची मर्जी बहुत संतोष केली; खुष करित जाले. परस्परें मनांत मात्र दगाबाजी, परंतु बाह्यात्कारें मोठा उत्साह बैठकीच्या जागजागा भुया चोपून आर्शाप्रमाणें कूड मंडप उभे केले. राहुट्या डेरे याचें प्रयोजनच न पडावें, अशी तरतूद केली. **खानानीं** वकिलाचे लिहिण्याची उर्तता ठेऊन वांई मुक्कामीं येऊन राहिले.

प्रतापगडास महाराजांनीं तरतूद केली आणि वकिलास सांगितलें कीं ' आतां खानसाहेबांस येण्याविसीं पत्रें पाठवावीं, येथील तरतूद करणें, ती जाली दाखविली. तों वकिलांनीं व महाराजांनीं येण्याविसीं पत्रें पाठविलीं. तीं पत्रें पावतांच कूच करून, तयार होऊन निघाले. ते मधीं एक मुक्काम वेणातीरीं करून, दुसरे दिवशीं प्रतापगडाखालीं मैदानांत डेरे देऊन, बैठका व मांडव घातले, ती जागा पोटीं ठेऊन, तमाम लष्कर नदी वोढा किनारे, एक कोश पर्यंत तळ पडला. चंदी, वरण, लकडी, भाजी, मेवा, मिठाई वगैरे महाराजांकडून कारकून घेऊन जाऊन, खानास सलाम देऊन, वरदी पोंहचाविली. कारकुनास विडे देऊन, खानानीं बिदा केलें. महाराजांस वर्तमान श्रुत केलें, किल्ल्यावरून पाहाण्यांतही आलें. या नंतर बकरीं, कोंबडीं, आंडीं, वगैरे नजराणा जिन्नस पाठविला. पाहून खान बहूत संतोष जाले, महाराजांची स्तुति केली, त्याजला इनामें देऊन निरोप दिल्हा. खानाकडील वकील जाऊन, खानास महाराजांचे अगत्याची व तरतुदीची तारीफ करून समजाविली, व बैठका वगैरे जाग्याची सिद्धता, चंदी, लांकडें, भाजी, मेवामिठाई, बंदोबस्त केला, त्या प्रमाणें खानास येऊन पावला. खातरजमा खानाची जाली. मग वकिलास विचारूं लागले ' कीं, ' शिवाजी हरकामी हुशार उमदा माणूस आहे, हा आपले हातीं कोणत्या युक्तीनें लागेल ते सांगा. मुलूख घेतला, सबब असा माणूस हजरतीचे कामाकाजांत वागावया जोगा; परंतु बदफैली करून, हुजूर येण्याविसीं हुकूम केला असतां न आले, ह्मणून आमची रवानगी केली; नाहीं तरी याचे वडिलाचे ठाई लोभ व याचे ठाई लोभ किती! याची मर्जी मोडून, हजरत यांणीं हरामखोरी केली, सबब सामदाम-
बागलेच नाहींत; परंतु

प्रकारें करून, विजापुरास घेऊन जावें, मग याची रदबदल करून, याचा जामीन घेऊन, यास कामगारीवरी रवाना करावें'. असें अनेक प्रकारें युक्ति मसलत करीत बसले. त्यांत बसण्याची व भेटीची जागा कशी केली, तेथील चौकशी तुह्मी केली, किंवा नाहीं, ह्मणोन विचारिलें. वकिलांनीं उत्तर केलें कीं, '**महाराजांनीं** जागा दाखवून मजला विचारूनच, मजलसी वगैरे भेटीची जागा ठेऊन, तरतूद केली आहे. **महाराजांचा** लोभ आपले चरणारविंदीं बहुत बहुत आहे; भेट केव्हां होईल, ही इच्छा धरून, रात्रंदिवस दर्शनाचा निजध्यास लागला. आपली आज्ञा होईल, तेव्हां भेटीचा योग ठरावं'. त्यावरून **खानानीं** रमलशास्त्री गणक जोतिषी व ब्राह्मण जोतिषी बोलावून, मुहूर्तयोजना करण्याची आरंभिली. त्यास दुसरे दिवशीं **खानास** सामान्य पक्ष मुहूर्त भेटीचा व **महाराजांस** मध्यमप्रत होता. तिसरा दिवस **खानास** मध्यमप्रत मुहूर्त होता. व **महाराजांस** एकादशस्थानीं तीन ग्रह, व वरकड मध्यम होते. त्या मुहूर्तीं भेट जाल्यास योग चांगला नाहीं. तरी आटदहा दिवस मुहूर्त मिळावयाचा नाहीं चांगला. असें जोतीषी व रमलशास्त्री यांनीं सांगितल्यावरून, **खानास** राजाचे भेटीची उत्कंठा फार; पोटीं हेतु पारपत्य करावयाचें, तसें **राजांचें** मनांतही वागलें. **खानानीं** सांगितलें, दुसरे दिवशीं रविवारीं मुहूर्त भेटीचा बरा, आज कूच दुरजे होऊन आलों. उद्यां दम खाऊन; **राजांची** मेजवानगी घेऊन, परवांचे दिवशीं भेटून, मुक्काम करून, चवथे दिवशीं कूच करून जाऊं, असा निश्चय ठरावून, वकिलांनीं **खानास** विचारलें. याप्रमाणें बेत **राजांस** कळवावा, नाहीं तरी त्याची भेटीची उत्कंठा फार आहे, ते भेटीस येतील, मग आपला मुहूर्त नाहीं, तेव्हां परत जातील, तेव्हां त्यांचे चित्तांत विकल्प येईल; मग आपणांस गांठणार नाहींत. आपले

बोलण्यास बाध येऊन घाट विघडेल; तेव्हां त्याचा निरोप येण्यापूर्वी आपणच सांगोन, तेथें जाण्याचा निश्चय सांगोन, बेत ठरविला असतां, बहुत गोडीस येईल. त्या गोडींत हर्ष उभयपक्षीं राहून मतलब साधेल; नाहीं तरी विकल्प येऊन मसलत बिघडेल. असें वकिलांनीं सांगितल्यावरून खानाचे मर्जीस येऊन, वकिलाबराबरच राजांस सांगून पाठविलें कीं, उद्यां भेटीस यावयाचें; परंतु आमची प्रकृत नीट नाहीं, यामुळें उद्यांचा योग करूं नये. परवांचे दिवशीं आह्मीच तुमचे भेटीस स्थल नेमिलें तेथें येऊं'. त्यावरून महाराज आनंदातें पावून, दुसरे दिवशीं स्नानसंध्यादि करून, एकांतीं जिजाऊसाहेबांस बसवून, अग्नीवरी ऊद घालून, श्रीची प्रार्थना केली. तों संकटास श्री प्रसन्न होऊन, आंगीं येऊन सांगितलें कीं, 'ही शिकार तुह्मांस साधून देतों, तुह्मी काळजी करूं नका, आणि मुसलमानाचें पारपत्य करितों, तुह्मांस मी सर्व प्रकारें साह्य आहें'. असें जिजाऊ साहेब यांणीं ऐकून, प्रार्थना श्रीची केली कीं, 'आई पारपत्य करा, मी साह्य सांगितलें; त्यास हे मुसलमान लोक दौलतीनीं बाके क्रष्ट (?) आहेत, शरीरसंपत्तिवान, आपले हिंदु लोक दुर्बळ, यांचे हातून शिक्षा कशी लागेल'? तेव्हां श्रीनीं सांगितलें कीं; 'तुह्मी या गोष्टीची चिंता कशास करितां ? वामन अवतार लहान स्वरूप धरून, बळीचे यज्ञीं गेले; तेथें उदक दानाचें घेऊन, त्रिपादें धरणी आटविली, तेथें या यवनाचा भार कितीं? आह्मी अनकूल असतां, तुह्मांस चिंता करावयाचें कारण काय? या दुष्टांचे नाशाकरितां शिवानीं प्रत्यक्ष अवतार धरिला; त्याजला पारपत्य करावयाचें अशक्य काय? तुह्मी कोण्हो काळजी करूं नये. याचा मृत्यूच याचे हातून आहे'? असें उत्तर केल्यावरी जिजाऊ साहेबीं ऐकून,

चरणावरी मस्तक ठेवून, तथास्तु ह्मणोन सर्वांविशीं भरंवसा तुझा आहे, बोलून मस्तक उचललें. तों श्रींनीं आंग टाकलें. वारें श्रींचें गेलें. सावध झाले, मातुश्रींनीं साद्यंत जाला तसा मजकूर सांगितला. तेथून उठोन, भोजन करून, आज्ञेप्रमाणें तरतूद ठेविली. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं उठोन, स्नानसंध्या करून, श्रींचे अर्चन करून भोजन संपादिलें. प्रातःकाळापासून खानाचे भेटी करितां कारकून, माणसें, शिपाई, ठाईं ठाईं आपलाल्या कारखान्यावरी लागून, तयारी केली. कोणेविशीं न्यून पदार्थ ठेविला नाहीं. महाराजांची आज्ञा, त्याहून तरतूद ज्याजती, याप्रमाणें कामदारांनीं बेत ठेवून, खान येण्याची उर्तता राहिली. सर्वांठाईं हुशार, तोफ होतांच आपलाले जागीं हुशार होऊन, सांगितल्याप्रमाणें वर्तावें. असा संकेत करून ठेविला. कर्णा होतांच आडवाटा ल्हान कोठें जाण्यायेण्या करितां राखिल्या, त्या बुजवून रस्त्याचा वंदोवस्त राखावा. हुकमाशिवाय पांखरूं जाऊं न शके, अशी मजबुती मार्गाची ठेविली. ज्याचे त्याचे लक्षांत खानाची भेट महाराजांची केव्हां होईल, आणि लोकांचे पारपत्य केव्हां करूं, असे चकोराप्रमाणें दृष्टी करितां तीन प्रहर दिवस जाला. खानानीं राजेश्रीस सांगून पाठविलें कीं, ‘ आमची तयारी जाली; आपण समय पाहून, मुहूर्तानीं यावें’. या प्रमाणें होऊन, महाराजांनीं प्रतापगडाम तुळजापूर वासिनी देवी कुलस्वामिनी परंपराची महाराजांचे आंगीं संचार, आईची सर्वदा सुप्रसन्नता, नित्य तुळजापुरीं जाणें येणें घडत नाहीं; सबब श्रीगंडकीहून शिला आणून तुळजापुरास शिलावट कारेगार पाठवून, श्रीदेवीची मुर्ति सारखी मूर्तिसदृश केली. ती आणून, देऊळ चांगलें बांधून, त्यांत स्थापन करून, बसविली होती. आधीं मातुश्रींची आज्ञा, चरण वंदून, नंतर श्री कुलस्वामीनीस नमस्कार करून, दधिप्राशन करून, नंतर श्री जगदंबिकेचे

दर्शनात आले. जिजाबाई साहेबीं श्रीची प्रार्थना व नवस मानासिक नाना प्रकार चिंतून, हातीं माळ घेऊन, तुळसी जवळ भगवत् चरणारविंदीं ध्यान लावून. शिवाजी महाराजांनीं अमानुषी यत्न आरंभिला, तो सिद्धीस जाऊं दे, ह्मणोन एकासनीं बसली. महाराजांनीं श्री देवी जवळ येऊन, नासाग्रीं दृष्टी ठेवून, ध्यान [illegible]. इच्छित पुष्पप्रार्थना करून मागितलें. तों [illegible]. मोठे समारंभें शाहाजाहानें वाजवीत, अनेक प्रकारचीं वाद्यें पुढें वाजतात, भाडी गाताहेत, रागउपराग सुस्वर गीत होताहे, घोड्यावरी बसोन, खान मोठे समारंभानीं येतात; ठाईं ठाईं महाराजानीं बैठका करून, छतें लावून, कारंजियांत पाणी चालवून, जागा लिपोन लाखोन, सुंदर रमणिय पुष्पें सुगंधी वास येण्यास लाविलीं. वाळयाचे पडदे पाणी शिंपून, वास चालला. मार्गावरी भुई चोपून साराविली. त्यावरून घोडीं चाललीं असतां, तिळभर माती न उखडे, अशी मजबूत केली. त्या आसपास जाग्यांतील वृक्षांस आळींकरून, पाणी भरून, वारें आलें तरी रजी उडोन अंगावरी येऊं न पावे, असा बेत ठेविला. नाना प्रकारचे वृक्ष, त्यांचे परिमळेंकरून खानाचा आरवा समाधान जाहला. खान पहाडाचे पायऱ्यावरी लोकांनीं पाहून विदित केलें, तों श्रींनीं प्रसादिक पुष्प मागितलें तें दिल्हे. तें पुष्प घेऊन, मस्तकीं तुऱ्या जवळ ठेऊन, महाराजांनीं पायजमा व झगा मंदील बांधून, कमरबस्ता करून, पाठीशीं ढाल लावून, दांबस तरवार घालून, पुढें पेषस्कबज खोंवून, हातांत जहरी वाघनखांस भरून, तीं शस्त्रें ईषन्मात्र आंगास लागतां, ती जखम नाना तऱ्हेचीं मलमें लाविलीं असतां बरी होऊं नये, जखम वाहून, मासपक्षांत मृत्यूच व्हावा अशीं होतीं, तीं हातीं चढवून, डावा हात खुला ठेऊन, श्रींस नमस्कार घालून, आज्ञा घेऊन, किल्ल्याचे दरवाजियाचे बाहीर पडतात,

तों करणा जाला. तो करणा होतांच तमाम चौक्यांचीं शिंगें हलग्या वाद्यं वाजलीं. **खान** घोड्यावरी बसोन, भेटीचे जाग्यापर्यंत आला. **महाराज** किल्ल्यावरून खालीं उतरले. मधीं पटांगण होतें, तेथें इकडील तिकडील लोक फरा धरून, उभे राहून, मानकरी लहान थोर परस्परें भेटीस गेले, ते **खाना**कडे हणमंते सांगावयास उभे राहून भेटऊं लागले. **खाना**कडून वकील **महाराजां**कडे होते, तेच भेटवीत होते. तमाम लोकांच्या भेटी जाल्या. पुढें **खान** दहा पांच पावलें चालून आले, तसें **महाराज**ही दहा पांच पावलें चालून गेले. मधीं **महाराजां**कडील व **खाना**कडील माणसें खिदमतीचीं होतीं, जवळ जातांच दुभाग मनुष्यें जालीं. हणमंते यांस **खाना**नीं विचारिलें 'राजे हेच'? **महाराजां**नीं वकिलास विचारिलें कीं, '**खान** हेच'? उभयतांनीं दूर सरून, होय ह्मणाले. ऐन समालिंगनीं उभयतांनीं कवी घातल्या, **खान** जुनाट थोर पुरुष, आंगानेंही शरीर मातबर; **महाराज** **खाना**चे खांद्याखालीं उंचीस होते. **खाना**नीं **महाराजांस** पाहून, लहान बांधा, बिशाद काय मनांत आणोन, हातांत पेशकबज होता, तो चालविला. **महाराजांस** आंवळून धरिलें, मिठी पूर्वी **वृकोदर बकासुर** दैत्याची पडली तशी या उभयतांची मिठी पडली. **महाराज** मोठे धैर्यवान्, एवढा थोरला बळकट जबरदस्त; परंतु उजव्या हातांत वाघनखें घातलीं होतीं, तो पंजा पाठीकडून कुशींत चालवून, पोटला बाहेर काढतात, तों लोकांचे ध्यानांत भेटी होती. **महाराजां**कडील **येसजी कंक** व **माल्सर** वगैरे मावळे लोक मातबर तीन चारशें चांगले होते. त्यांणीं **खाना**चे लोक दूर करून, **खान** व **महाराज** बैठकीचे जाग्यानजीक तसेंच चालले, ते थोपून राखून, मंडपाचे द्वारें बंद केलें

त्यांत खानाचे भाचे वे दूबभाऊ उभयतां बरोबर आले. त्याजला महाराजांकडील विश्वासरावानें धरून मारिलें. महाराजांस यश आलें, पोटला बाहेर पडतांच मोठ्यानीं आरडले. तेव्हां लोकांस दगा जाला असें वाटून, आपलें प्राण आशेनीं जीव काढून, पळावयास मार्ग पाहतात, त्या संधींत महाराजांकडील लोकांनीं जाऊन, वस्त्रें, पात्रें, हत्यारें घेऊन, कड्याखालीं ढकलून द्यावें. या प्रमाणें माचीवरी होऊन, एकच गर्दी उसळली. तों सायंकाळ जाला. महाराज यश संपादून, दरवाजासंनिध जातांच, महाराजांस किल्लेकरी हावालदार याणीं ओळखून, दरवाजा उघडून, आंत जातात तों रेडे व बकरीं व कोंबडीं यांचे सतके जाले, पूर्ण कलश भरून, दासी व सुवासिनी येऊन, घागरी भरल्या उतरून रिचविल्या. नाना प्रकारचीं अन्नें, पाट्या भरून, वोवाळून, महाराजांवरून टाकिल्या. दरवाजियाचे उमऱ्यांत पाय महाराजांनीं देतांच, दरवाजियावरील तोफ जाली. ती तोफ मावळे व कोंकणें लोक याणीं ऐकतांच चहूंकडून उड्या लोकांच्या यवनाचे लष्करावरी पडल्या. त्या कशा? जसा गूळ एके ठाईं असला, ह्मणजे मुंग्यांस व माशांस निमंत्रण न करितां धाऊन, उड्या घालितात, या प्रमाणें लोकांनीं जाऊन, तमाम चीजवस्तु लुटून, सरकारांत दाखल केली. त्यांत खानाचा भाचा दुसरा एक बेआरामीमुळें वोढ्या पलिकडे उतरला होता. तो पांच पन्नास स्वारांनिशीं माचीस गलबल होतांच, पळून निघाला. तेवढा मात्र पार गेला. नाहीं तरी वरकड सरंजाम सर्व महाराजांचे दोस्तानीं लागला. कांहीं एक जिन्नस बाहेर गेला नाहीं. या प्रमाणें शिकार महाराजांस श्रीनीं साधून दिल्ही. महाराज यशस्वी होऊन, जिजाऊ साहेबांचे चरणावरी डोई ठेवून, श्रीस व देवीस नमस्कार

करून, मोठा आनंदोत्सव केला. नाच, कलावंतांचीं गाणीं ठाईं ठाईं करविलीं. तमाम यवनी लोक, वाटेनीं, आड वाटेनीं जात, तेथून धरून आणावे. सर्व लुटून घ्यावें, त्यास कड्याखालीं लोटून द्यावें. असे कितेक मारिले, कितेक डांगा, बरच्या घोड्यांनींच जखमी केले, लोक मारिले; बारींतून कोणी बाहेर जाऊं पावले नाहींत. या प्रकारें बारा हजार घोडे. शिवाय हत्ती व तोफा व उंट, बैल, गाई, म्हशी व बकरीं हात्यारें कापड जिन्नस सुध्दां जरा बाजरा सरकारांत दोस्तांनीं लाविला. कोणी यवन लढून मेला, त्याचा आसबाब जिन्नस त्या मावळ्या लोकांस देऊन, घोडा सरकारांत ठेविला; लूट मोठी सांपडली. असो. खानाचा पराभव जाला. जिजाबाई साहेबांनीं मानसिक नवस नवशिले, ते सर्व पुरविले. ब्राह्मण संतर्पणें जालीं. बहुत उत्साह केला. जिजाबाई साहेब सुप्रसन्न जाली, महाराज अवतारी, जें इच्छितात, तें ईश्वर पार पाडितो, त्या अर्थी ईश्वरच खरा, असा मनाचा निश्चय केला. खानाचे फौजेंत राजजी घाटगे झुंझारराव होते, त्यानीं बहिरजुणगे सांभाळून, नेण्याविशीं प्रयत्न फार केला; परंतु महाराजांचे कारभारी आनाजी दत्तो व दादाजी कोंडदेव (?) मोरोपंत पिंगळे कुलकुला होते. त्यांचे बंदोबस्तांत झुंझारराव आपली मर्दुमी चालवून, सलतनत नेण्याविशीं उपाय केला, तितका असाध्य, होऊन लढाईंत जखमी जाले, पाडाव करून महाराजांचें लोकांनीं आणिलें; बारा हजार घोडे पागेस लाविले, शिवाय हत्ती उंटें व तोफा व बैल सुध्दां दास्तान केले, आणि फौज सरंजाम वाईवरी महाराजांकडील जाऊन उतरला, अबदुलाखानाचें पारपत्य करून, महाराजांनीं फार दंगा प्रांतांत केला, तमाम ठाणीं बसवीत घालिले. शके १५८१ हेमलंबीनाम संवत्सरीं विजापुरकरास

वर्तमान जाऊन, पादशाहा फार खिन्न होऊन बसले. लहान थोर अमीर उमराव यांस सला विचारिली. यास पुढें विचार काय करावा? तेव्हां नेकदार, मातबर, कुलीन, सरदार होते, त्यांणीं ( सांगितलें कीं, 'हजरत, शिवाजी आपले जवळ शहाजीपाशीं असतां भेटीस येत होता; त्याजला त्याचे बापानीं मुजरा करण्याविशीं किती सांगितलें, आह्मी ऐकिलें; परंतु मूळपणापासून हेकड, बापाचें न ऐकितां मुजरा केला नाहीं. आम्हीं सर्वत्र पाहत होतों. ते समईं बोलावें, तरी त्याजवरी सरकाराचा लोभ मनस्वी, आपण बोलावें, मूर्ख ह्मणोन ध्यावें, नीट नाहीं, ह्मणोन गम खाऊन राहिलों; आतां सर्वांचेच अनुभवास आलें, याजमुळें बोललों, पडल्या प्रसंगीं विचार एक आहे कीं, जबरीनें जरब ठेऊन, शिवाजी हातीं लागेल, असें दिसत नाहीं. कारण बापाशीं बेजबा होऊन वागतो, त्या अर्थी वरकडाचीं परवा त्याजला काय आहे? कोण्ही सरदार फौज रवाना करून, युक्तिनें धरून शासन करावें, तरी अबदुलखान, मोठा मनुष्य जाऊन, जातीनें कष्ट करून, मसलत केली, त्याची पार पडली नाहीं, त्या पक्षीं बुद्धिवान असेल, सरकार सांगेल त्यांणीं उमेद धरून, चाकरी करून दाखवावी. आपलाले मनांत बहुतांचे चित्तीं विचार बहुत सुचतात; परंतु खावंदांचे नजरेस येऊन, हुकूम होईल, त्या प्रमाणें चालावें'. कोण्ही विचार दुसरा काढिला कीं, शहाजीस बोलवावें, आणि त्याजला सांगावें कीं, तुमचा मुलगा बदफैली करितो, त्यास तुम्हीं शिक्षा करीत नाहीं, हें काय? सरकार इतबारी चाकर तुम्हीं, तुमचा लेक तुमचे स्वाधीन नाहीं ह्मणतां, हें चांगलें नाहीं. तुह्मी कोणी चांगला मनुष्य पाठवून, त्याजला आणून जवळ ठेवावा; अगर कर्नाटकप्रांतीं तुमचा अंमल आहे, तेथें जहागिरींत नेऊन ठेवावें.

त्याची उमेदवारी आहे, तरी मवासी ठाणीं व दिल्लीवाले यांचे अंमलांत ठाणीं बसवून, सर अंमल केल्यास चिंता नाहीं, आमची परवानगी आहे, त्यांत आह्मी करावयास सांगितलें, असा हुकूम वाजवून, लौकिक जाल्या पोटीं त्याची आमची स्पर्धा वाढावयाची; याजकरितां असें न करितां, आपले हिंमतीनें बंदोबस्त केला, तरी आम्ही वाईट ह्मणणार नाहीं. आपलें वांसरूं दुसरें गाईस जाऊन पिवून, ताजें जालें तरी त्याचे आईस तें वांसरू, माझें नव्हे ह्मणवेल कीं काय ? आपल्यास खुपीच आहे. असे हे दोन तीन पर्याय दिसतात; यांतून खावंदांचे नजरेस येऊन, करणें असेल तें करावें. हें बोलले, तें वृत्त समजोन घेतलें. नंतर **रणदुलाखान** व **शास्ताखान**, मोठे इतबारी अमीर पादशाही वजीर मनचदार, होते. त्यांसच पाठवावें, असें ठरून, उभयतांस वस्त्रें देऊन, साठ हजार फौजेनिशीं रवानगी केली. ते कूच दरकूच निघोन, पुणें मुक्कामीं आले. पुण्यांत **महाराजां**कडील बंदोबस्तास कारकून लोक होते. पादशाही वजीर पारपत्याकरितां आल्याचें लेहून पाठविलें. त्याचें उत्तर, 'तुम्ही पुरंदर, राजगड, लोहगड, सिंहागड वगैरे किल्ल्यांचे आश्रयानीं राहून, लूट सोघेल तितकी करावी, गांव उजाड करावा, तमाम खेड्यांनीं जुजबी वस्ती राखावी, सरंजाम जिन्नस फौजेस मिळों न पावे, असा यत्न करावा; तों आम्ही येऊन पावतों'. असें उत्तर जाय, तों **रणदुलाखान, शास्ताखान** दाखल जाले. जुन्या कोटांत सरकारच्या रंगमहालांत जाऊन उतरले. तमाम फौज आपापले सोईनीं विल्हेनीं नजीक राहिली. घाटमेट रस्ते चहूंकडील पाहून, चौकशी करून, चौक्या बसविल्या. वाईवरी फौज सरंजाम रवाना केली. ती मार्गानीं जातां, सिंहगड येथें **यशवंतराव**, त्यांचे बंधू **बाबाजी प्रभू** हिरडस मावळे प्रमुखलोक पांचपांच हजार मावळे

लोकांचे सुभे होते. त्यांजला बातमी समजतांच, आडवे जाऊन, लढाई केली. **शास्ताखाना**कडील लोक स्वार परदेशी कट्टे जवान, मोठी जवामर्दी करून, नामुशी आली, सबब आपण नामुराद लोक ठरले असतां, पुढें आपले लोकांस कोण्ही ठेवणार नाहीं, पोरांचीं पोटें भरणार नाहींत; हिंदु लोक तमाम वतनें हिरावून घेतील, याजकरितां जीव जाऊन, शूरत्वाची साख राहून, अशी ईर्षा मनीं ठेवून, आब-रुच्या जुरतीनें कस्त केली. त्यास उभयतां बंधू रणीं कामास सर-कारचाकरीवरी रुजू जाले. परलोक स्वाधीन करून, स्त्रिया, पुत्र, मित्र, आई, आदीकरून, घरच्या मनुष्यांचा त्याग केला. अमरावती स्वर्गलोक, देव राहतात, त्यांणींच वास करावा आणि मनुष्यांनीं वास करूं नये, असा प्रकार तरी नाहींच. स्वर्गलोकीं वास करण्यास एक आधार, मिळोन, पुण्य पाहिजे. त्यास प्रभुलोक नैष्टिक, चांगले, इमानदार, त्यांणीं पूर्व सुकृतेंकरून सेवा जोडून, रणीं उभयतां बंधूनीं हातांत पटा धरून, सिंहासारखी गर्जना करीत करीत, यवन दैत्यांश, त्यांचे निकृंत करीत करीत, केवळ **सहस्रार्जुना**चाच अवतार दुसरा, अशा प्रकारें मनस्वी मनुष्यें, शिर धडावरी रुसोन, सूर्यमंडळ भेदून आकाशपंथें हास्य राहिल्या लोकांस करावें. आम्ही इंद्रपदीं जाऊन, अमर जालों, तुम्ही मृत्युलोकीं राहून काय करणार ? असा पुरुष, एकाच वारानीं दोन भाग करणार, दुसरा मिळणार नाहीं. आम्ही पापपुण्य जाणत नाहीं, तुम्ही याल, तरी या सुखास पात्र व्हाल, नाहीं तरी प्रपंच-दुःखांत पडाल, असा भाव दाखवून, कित्येक लोक निधन पावले. **मुरार बाजी, प्रभु देशपांडे** महाडकर, हे हश्मी लोकांचे सरदार, मोठे मनुष्य, याणीं **बाबाजी बाजी** प्रभू, यांचा युद्धाचा उत्कर्ष पाहून, आपण नामुरादी घेऊन, राहावें नीट नाहीं; जाणोन **बाबाजी**

प्रभूपेक्षां जवामर्दी विशेष केली, शतावधी मनुष्यांचा जीव नाश केला. उभयतां फारच लोकांस यमस्वरूपी अंतक दिसों लागले. तेव्हां खंदारी रुमी यवन मोठा धारकरी चढून आला. त्याचें याचें दोन घटिकापर्यंत शस्त्रयुद्ध जालें, त्यांत या उभयतांचे पाठीवरी दुसरे लोकांनीं यावें, तरी जिकडे तिकडे यवन लोक, एक एक मावळ्यास दहा असामी, सिद्ध लढाईस होऊन गुंतविले. मावळे लोक, आश्रय आपणांस नाहीं, मोकळ सपाटी, माळाची जमीन, निराश्रित, याजमुळें कित्येक आश्रयानीं जाऊन बसले. नामधारक सरदार व नामजादे लोक, मोठे हिंमतीचे सरदारांजवळ वागणार, व कित्येक लोक, सरदार यांचे नांव करून प्रसिद्ध; त्या दोन तीनशें लोकांत जागा सोडून, निघतां नये, असा प्रसंग प्राप्त होऊन, यवन लोक दोन तीन हजारपर्यंत खालीं जाला. हें त्यांणीं पाहून, त्याणींही दीन बोलून, 'मरणें मारणें नशीब जाणोन, दांत किरकिटीस येऊन, लढाईत मजबूत जाले. त्यास दोन तीनशें लोक, मोठा कर्ता. त्या लढाईत कामीं आला. त्यांत एका मुसलमानानीं समोर भांडत असतां, दुसरा मागून येऊन, तरवार चालवून दुखड केले. तें कबंध पांच पंचवीस हात जाऊन, समोर आला, त्याचा वध केला, हें पाहून लोक आश्चर्य करूं लागले. हें पाहून मुरार बाजी प्रभू याणीं असले मनांत विचार केला कीं, आपला पाठिराखा गेला, आतां आपण राहून, मागें काय करावयाचें? महाराजांचे चाकरीवरी प्राण गेला तरी जावो, बेहत्तर आहे; परंतु अमुक मधीं बंदोबस्ताकरितां, दुस्मान कसा येऊ दिला, तुमचे वस्तु शासन जालें नाहीं, असें म्हणवून घ्यावयाचें नाहीं. महाराजांकडील लोक सर्व पायसिपाई, स्वार घोड्यावरील पाठिशीं नाहींत; यवनांचा तिहेरी सरंजाम, पायदळ एक, दुसरे

स्वार, तिसरा जंगी सरंजाम, उंटा वरील सुतरनाला व घोड्या वरील जंबुरे व बाणांच्या कैच्या, असे तिहेरी मारांनीं एकटा मावळे लोक यवनी फौजेंत शिरोन, घोंटाळा करावयास वाट पडूं देईनात. चहूंकडुन लांडगेतोड मुसलमानांनीं करून, लोकांचा नाश केला. महाराजांकडील कुमक येण्याचा संकेत होता. त्या पूर्वीच लढाईचा प्रकार जाला. मावळे लोकांवरी प्रसंग गुजरला. त्या संधीस सरंजाम दाखल न होण्यामुळें, हीं मनुष्यें मेलीं गेलीं. मागाहून सरंजाम आला. तों यवन लोक चढून, त्याजवरी शेर होऊन, लढाईचे इराद्यानीं गेले. ते लोक राजांकडील उमेदवारच होते. त्यांणीं आंगावरी घेऊन, डोंगराचे आश्रयास जाऊन, पांच सा-तशें बंदुकीची सरबत्ती देतांच, पांच पंचवीस मनुष्य खराब यवना-कडील जाले. डोंगराचे खडप्यास घोडे चढून, जायां होणार जाणून, इंदालीचे नजीक फौज जाऊन, मुक्काम केला. शास्ताखान व त्याचा पुत्र कबिल्यासुद्धां कोटांत पुणें येथें रंग महालांत उतरले. फौज आसपास राहिली होती. मागाहून औरंगजेब पादशाहा शाहाजादे-पणांत असतां, दिल्लीहून रवाना जाले. कारण विजापुरकरांचे आश्र-यानीं शहाजी राहून, लेकानीं बिघडून, तमाम मूलूक घेतला. त्यापे-क्षां जाधवराव याजकडून दौलताबादचे राजकारण होतें, याजकरितां शाहाजाहां पादशहा यानीं औरंगजेब पादशाहा याची रवानगी केली, फौज सह केली. ते दरमजल निघून, दौलताबादेस लागून, पाद-शाहाचे चिरंजीव कबिल्यासुद्धां उभयतां आपले फौजेचा फितुरी रंग पाहून, पादशाहाजादे औरंगजेब पादशाहा यास भेटून, रुमशामेस बाके सरंजामसुद्धां रजा घेऊन, सुरत खंभाईत येथें सामान आणोन, गलबतांत बसोन, जलमार्गानीं निघोन गेले. मागें प्रांताचा बंदोबस्त औरंगजेब पादशाहा यानीं करून, शास्ताखानास लेहून पाठविलें

कीं, 'तुम्ही सरकारचाकर आहां, दौलतींत बखेडा जाला, त्याचे बंदोबस्तास तुम्हांस पाठविलें आहे. तरी तुम्ही मोठे हुशारीनीं कळेल तसा बंदोबस्त करावा. तुम्हास जोखीव येत असल्यास, इकडून फौज मदतीस पाठवितों, अगर तुमची मर्जी असली, तरी आम्ही खासा जातीनीं येतों; परंतु हिंदूंचा बंदोबस्त केल्यावांचून आपले राज्यांत सुरळीत वहिवाट चालणार नाहीं. याजकरितां आम्हांस येणें जरूर; आणि हजरतींनें याच कामाकरितां रवानगी केली आहे. परंतु तुम्ही विजापुराहून आलां, ती दौलत व ही दौलत दोन मोजीत नाहीं. आमचीच दौलत जाणोन, तुम्हावरी यख्तियार ठेवून लिहितों; तरी तुम्ही शासन करण्यास आळस तिळभर करूं नये'. या प्रमाणें पत्र आलें. तें पाहून, त्याचें उत्तर पुण्याहून शास्ताखानानीं लेहून पाठविलें कीं, 'आपण पत्र पाठविलें, तें पावलें, लिहिला मजकूर कळला. तुमचा आमचा परकीपणा नाहीं, लिहिलें तें प्रमाण आहे. आमची मदत करण्याचा भाव सुचविला. त्यास दौलताबादकरांनीं मदत आणिली, त्यांची मदत केली, तशीच आमची करावयाची इच्छा नसावी. शिवाजी फितुरी जाला, तरी चाकर आमचा आहे. त्याचें पारपत्य करणें, तरी आमचें आम्हीच करूं; त्याजविशीं मदत करावी, असें आपल्यास लेहून पाठवूं, ते समई आपला-च आधार मानून राहूं. आज शिवाजीचा बाप आह्मांजवळ नोकरींत हजर आहे. मूल बदफैली निघालें, त्यास हजरत व शहाशीं दोन जात जीव मानून, उभयतांची वागणूक नाहीं. आमचे दौलतींत शहाजी राजा लायक माणूस आहे, ह्मणून त्याचे लेकाची वरदळ सोसून, सरकारांतून बंदोबस्त ठेवितात. वरकड जागीं असा बखेडा जाला असतां, तरी त्याचे बापाचें शासन आधीं करितें,

मग त्याचे पारपत्याची योजना योजिते. तसें आमचे खावंद दौलत- मंद, एक बाल कायम. अल्ला: खुदा: ताकनेकी करो की तशी बद- निश्चत त्यास पैदा नहो. जो पाठीशीं जीव जतन करावयास येईल, त्यासच मारून, त्याची आसबाब हरण करून घेण्याची वासना न देवो. हें आपणासच योग्य आहे. आपण सर्व दौलतमंदाची नजर कायम राहे, असे चालल्यास सर्व लोक आपलें कल्याण इच्छितील'.

याप्रमाणें पत्र पाहून, मोठा रोष येऊन, जुलपुकारखान यास आज्ञा केली कीं, 'तुम्ही हैदराबादेस सरंजाम घेऊन जाणें; तेथें दौलतींत आपसांत विरुद्ध वाढून, बखेडा माजला आहे, त्यास तेथील पादशाहा ऐशआरामींत मगन असतो, त्याजला दौलतीचा दरकार नाहीं. विषयांत परम दक्ष, यास्तव तुह्मी जाऊन, दौलत हरप्रकारें खालीं होय, तो अर्थ करावा, तुह्मांस फौज सरंजाम लागेल, तसा इकडून पोंहचती करूं, आम्ही येऊं'. असें सांगून वस्त्रें देऊन, रवाना केलें आणि विजापुरचे वजिरांनीं अमर्याद पत्र पाठविलें, त्या पेक्षां त्याचे पारपत्याची योजना करावी, तरी आज चाकराचे मुलाचे निमित्त त्याजला आहे. त्यांत त्याजकडे आंतून एक कस ठरावून, आपणा वरच तेंच बंड उठविलें, तरी दौलतदाराचे समागमें लढाईचा पेशा वेगळा आहे, तो सोडून, या पुंडाशीं गांठ पडल्यास, आपला बोज उडोन, मनुष्यमात्र हैराण होऊन, आपल्यास संकट पडेल, संकट पडलें असतां, दिल्लीस वडील आपल्यास दोष ठेवितील, आणि मनुष्यमात्राचा ध्यास सुटोन, बदनक्षी वांट्यास येईल. याजकरितां चातुर्मास्य जा- ल्यानंतर हैदराबादेकडील बंदोबस्त करितात, तो विचार पाहून, मग बंदोबस्त करणें, तसा करावयास येईल. अशी योजना करून, उष्ण काळाचे दिवस, पुढें पर्जन्यकाल प्राप्त होणार, जाणोन छावणीच्या

लोकांस हुकूम देऊन, मुक्कामींच कायम राहिले. इकडे पुण्यांत रंगमहालांत आपले, येऊन, यवन उतरला, हें वर्तमान कळून, महाराजांस क्रोध संताप उत्पन्न जाला. ते समईचें स्वरूप ज्यांणीं पाहिलें, त्यास असा भास पडला कीं, वीरभद्रच दुसरा उत्पन्न जाला कीं काय ? सर्व लोक भयचकित होऊन, आतां महाराज त्या यवनाचें काय करतील, न कळे, असें जनांचे हृदयांतर्यामीं येऊन, विचारीं पडले. ते समई महाराजांनीं लोकांस आज्ञा केली कीं, 'भोजनें करून, लौकर तयार होऊन यावें'.त्याजवरून ज्यांचीं भोजनें जालीं होतीं, त्यांणीं आपला सरंजाम आणविणें तो आणविला. नाहीं जालीं, ते लोक घरास जाऊन अथवा बिऱ्हाडीं जाऊन, भोजनें करून, तयार होऊन, निघोन आले. महाराज घोड्यावरी स्वार होऊन, निघाले. ते पुरंदरचे माचीस येऊन, रात्रीस कांहीं लोक रुद्रमाळ व राजमाचीस पाठविले, कांहीं लोक राजगड तोरण्यास रवाना केले. कांहीं लोक सिंहगडास पाठविले आणि पांच सात हजार माणूस चांगले, मातबर, आपणासारिखेंच काम करणार हुशार ठेवून, लोहगडाकडील बंदोबस्त कसा केला, तो पाहून येतों, ह्मणोन सांगोन, जाऊन पहाटेचे प्रहररात्रीस दरवाज्यासंनिध जाऊन, आह्मास किल्ल्यावरी घ्यावें बोलतां, हवालदार यांणीं उत्तर केलें कीं, 'तुह्मी धणी असा, अगर नसा, परंतु किल्ल्याचे शिरस्ते प्रमाणें दरवाजा उघडेल, ते समई येऊन, पायावरी डोई ठेऊन अन्याय माफ करून घेऊं. न केला तरी पारपत्य आमचें करतील, त्यास हजर राहूं; परंतु गैर शिरस्त्यानीं दरवाजा उघडावयाचा नाहीं.' बहुत प्रयत्न महाराजांनीं केला; परंतु हावालदार यांणीं ऐकिलें नाहीं. पहाटेचे तोफेचा समय जाला. तोफ पुण्याची होणें, ती पुण्यास शास्ताखान यांणीं केली. ते समई दरवाजा उघडून, हवालदार येऊन,

हात बांधून, पुढें उभा राहून, अर्ज केला ' कीं, मी अपराधी आहे. सारी रात्र आपण हैराण जालां, हिंवानीं बेजार केलें; परंतु मी दुर्जन, पण केलें त्या अर्थी ही तरवार आपली मजजवळ आहे, हो हाजर आहे. शिरच्छेद करावा, ह्मणोन पायांवर डोई ठेविली. महाराज संतोषी होऊन, वस्त्रें भूषणें योग्यतेप्रमाणें देऊन, त्यास इनाम जमीन करून दिल्ही. तेथें भोजन सायंकाळीं करून, तेथून निघोन रातोरात सिंहगडचे माचीस आले. तेथील बंदोबस्त पाहून, कात्रजेच्या घाटानीं चौक्या ठेऊन, दहा हजार बैल आणोन, बैलांचे शिंगांस पलिते बांधून ठेविले. आणि पुण्यांतून परत जाल्यावरी करणें, बाके तुतारिया, रणहालग्या, हालग्या, नगारे वगैरे वाद्यें, इशारतेचीं संकेतपूर्वक ठेऊन, हजार पंधराशें माणूस निवडक ठेऊन, नाना प्रकारची लूट करून, शहरांत पोंचविली. आपण जातीनें शेपन्नास माणूस घेऊन, दुसरियास शिवाजी महाराज आले, असा भास न दिसों देतां, गांवांत शिरले. वरकड लोकें ठाईं ठाईं पांच, पंचवीस, पन्नास, शें, दोनशें, जागजागीं बसविले. इशारा होतांच नेमिल्याप्रमाणें येऊन मिळावें, असा विचार करून, मध्यरात्रीचे समईं कोटांत जाऊन, शास्ताखानाच्या चौक्या होत्या, त्यास छेपून, त्याचे लोकांच्या मोकाबल्यास लोक आपले राखून, रंगमहालानजीक चौकीजवळ पंचवीस माणूस ठेविलें. आपण पांच माणसें घेऊन, आंतील जनानखान्यानजीक चौकीजवळ चार असामी ठेऊन, आपण जातीनें जनानखान्यांत हातीं लक्ष्मीतरवार घेऊन, खान निजला असेल, ह्मणान तेथें गेले. तों त्याचा पुत्र निजला होता. त्याची पत्नी जवळ निजली, ती जागी होती. महाराजांस, तरवार, जवळ उभे, कृतांतरूपी पाहून, भयाभीत होऊन, भ्रताराम जागी करता, तो जागा जाला, आणि चोरदृष्टीनें राजास पाहिलें, तों केवळ यमस्वरूपी पाहिला, उठावयाचा आवांका राहिला नाहीं.

तत्रापि धैर्य धरून, तरवारीस हात घालून बसतो, तों महाराजांनीं वार केला, तो पुराच केला. हें त्याचे पत्नीनें पाहून, आक्रोश करणार, तों तिजला दाबून, बोलले कीं, 'तूं आरडली असतां जिवेंच मारीन आणि याचें नांव काय तें सांग'. त्याजवरून भय पावून, माझा नवरा शास्ताखानाचा पुत्र, सांगितलें आणि पायांवरी डोई ठेविली. मग तिजला अभय देऊन, शास्ताखान दाखीव, ह्मणजे तुजला जीवदान दिल्हें, असें सांगोन, तिजला पुढें घालून, शास्ताखान जेथें निजला, त्या दारापर्यंत नेऊन, दार उघडून आंत निजलेला पाहून, मग तिजला निरोप दिल्हा. बोलूं नको, अशी आज्ञा केली. मग महाराज शास्ताखानाचे पलंगाचे पायत्राजवळ गेले, तों त्याची पत्नी जागी जाली. तिणें उठोन, पायावरी डोई ठेवून, चुडेदान मागूं लागली. शास्ताखानाचे हातापायांस कांपरी शिरली, थरथरां कांपू लागला. बारीक दृष्टीनें पाहून, उठावयाचा आवांका होईना. तेव्हां त्याचे पत्नीनें पाय धरिले, ते सोडीना. मग महाराजांनीं उत्तर केलें कीं, 'तूं लेंक ह्मणतीस; परंतु तुझा नवरा दुस्मानीवरी आला. त्या पेक्षां त्यास कांहीं शिक्षा करून, जीवदान देतों'; बोलून शास्ताखानाचा हात धरून, करांगळी कांपून, त्याजला पुढें घालून, शहराबाहेर दिंडीपर्यंत नेऊन येऊन, संकेताप्रमाणें इशारा करितांच, पांचसातशें मनुष्य जमा जाले. शास्ताखानास अंदेशा पडला कीं, काळोखी रात्र, याजसमागमें माणूस किती आहे, न कळे, भय पावून, बोलला नाहीं. महाराजानीं शास्ताखानास सांगितलें कीं; 'उद्यां माझ्या वाड्यांतून निघोन जा, राहूं नको. पुनः राहून बखेडा माजविलास, तरी तुझा शिरच्छेद करीन, ठेवणार नाहीं. मग हात जोडून, होय, ह्मणून दिंडीबाहेर महाराज नि-

घोले. खानास सोडून दिल्हा. महाराजांचे लोक इशारियाप्रमाणें जमा जाले. खान वाड्यांत जाऊन, चौकीदार बोलावून, लष्करास इशारा पोंहचवून, लोक तयार करवून, महाराजांवरी रवाना केले, जे न करावें, तरी सरकारचाकरी, हरामखोर, आपले प्राणाकरितां दौलत खराब केली, असा बदनक्ष होईल, जाणून पाठविले, महाराज सिंहगडच्या मार्गानीं पर्वतीकडील रस्त्यानीं डोंगरांत शिरले. कात्रजेच्या मार्गानीं, तमाम रस्तोरस्त्यानीं पलिते हजारोंच लागले. आणि बैलाचे शिंगास पलिते बांधले, ते पेटविले. बैल नवे, पेटविलेलें तेल पलित्याचे गलेतवर पेटलें. उजेड पडला. वरील तेल उष्ण, गळतें. बैलाचे मनांत डाग देतात, असें तेलामुळें भासलें, त्या योगें सारे रानांत भडकत फिरों लागले. शास्ताखानाचे लोकांस त्या उजेडाचे योगेंकरून त्या मार्गानीं महाराज गेले, असें भासून, जो स्वार तयार होऊन निघे, तो त्याच मार्गे पळत जाई, याप्रमाणें शास्ताखानाकडील लोक पळून, उजेडाचे मार्गे महाराजांवरी इरादा धरून जात. रात्र अंधेरी, दिसेना, ठाईं ठाईं लोक अडखळून पडत, तसेच धांवून जात. बैल तमाम रानोरान, झाडांत वोढ्यांत शिरत. त्याचें पाठीमागें पाठलाग करीत, हत्तीवरी चंद्रजोती लावून, धावूं लागले. प्रातःकाळ होतां, अरुणोदय वासरमणीपूर्वी जाला, तो नववधू मुखप्रक्षालण करून, भालीं कुंकुम रेषा लाविते, तद्वत प्रभा तेजःपुंज होऊन, सर्व जीवांची तिमिरांधता दूर जाली. सूर्यप्रभा पडली, लोकदृष्टी उघडली. शास्ताखान हत्तीवरी चढून जातां, तमाम किल्लोकिल्ल्यास यवनाकडील फौज गेली. त्याजवरी किल्ल्याचे तोफेचे गोळे सुरू जाले. त्यांत शास्ताखान सिंहगडाखालीं कांहीं फौज घेऊन गेले, तों किल्ल्यावरून गोळा आला, तो हत्तीस लागून, जीव नाश जाला. शास्ताखानास प्राणभय उत्पन्न होऊन, दुसरी स्वारी करा-

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.



फयास हिंमत पहिंचेना. भाद्रपदमासीं यवनास शिक्षा लाविली, ह्मणोन शास्ताखान लज्जायमान, पारपत्य करावें ही ईर्षा, परंतु शिवाजी महाराज काबल, मसलतीनें व शूरत्वानीं व द्रव्यानीं, सर्व गाष्टीनीं हुशार. चार महिने बाजतबरसात यत्न करावा, या बेतांत असतां, दिल्लीस जाली वर्दी पोंहचली. तेव्हां त्याणीं विचार केला कीं, शिवाजी मर्द मनुष्य, विचारानीं दक्ष, जातीनीं येऊन, शास्ताखानाचा लेक मारून, शास्ताखानास शिक्षा करून, कराांगळी कापून घेतली; त्या अर्थीं त्याजला मारण्याविशीं परवा काय ? पापभीरू, दयाभूत, शास्ताखानाचे स्त्रिनीं भ्रताराचा जीव वांचविण्याविशीं अर्ज केला, तेव्हां तिची दया येऊन, जीवदान दिल्हें. आतां सरकारचाकरी करितां, अब्रूकरितां, फौज घेऊन बसले; परंतु याचेवस्तु अर्थ व्हावयाचा नाहीं, जाणून त्यांनीं शास्ताखानास पत्र लिहिलें कीं, तुम्ही फौज घेऊन, खर्चाखालीं येऊं नये. तुमचे वस्तु शिवाजी राजे यांचें पारपत्याचा अर्थव्हावयाचा नाहीं. येविशीं विजापुरास लिहिलेंआहे, व तुम्हांसही लिहितों, तरी तुम्हीकूच करून जाणें. यासमयां संधींत बाबाजीराम वाळिंब महाराजांशीं बिघडून, खानास जाऊन मिळले,त्याणीं हरवक्त बातमी महाराजांची सांगून, खानाची कृपा संपादन करून घेऊन होते. पुढें विजापुरीं हें वृत्त कळोन, शास्ताखानाचा सुभा दूर केला. फौज उठोन गेली. शास्ताखानास जातीचा सरंजाम घेऊन, राहण्यास धैर्य न होय, तेव्हां जातीनीं ही निघोन गेले. महाराज यशस्वी होऊन, प्रतापगडास येऊन, जिजाऊ साहेबांचें व श्रीचें दर्शन घेऊन, ब्राह्मणसंतर्पणें केलीं; आणि रायगडास निघोन गेले. तेथें दोन लग्नें, शहाजी महाराजांनीं प्रथम सईबाई साहेबांशीं लाविलें, तदुत्तर केलीं. त्यांचें नांव, दुसरी पुतळाबाई साहेब, शिर्के यांचे घरचें नांव महाराजांनीं सोयराबाई ठेवून

वरिली. तिसरी **सईबाई** साहेब, अशा तीन स्त्रिया होत्या. **महाराज** केवळ धर्मअवतार, स्वपत्नीच्या ठाई रती, इतर स्त्रिया मातृवत्; आणि नाटकशाळा व रक्षा ठवणें, व भागपत्न्या बाळगणें, इत्यादि नाहीं. **शास्ताखाना**चे शिक्षपूर्वी **श्री रामदास स्वामी समर्थांचें** दर्शन जालें. महानुभावी, समर्थ, योगनिष्ट, वैराग्यशील, विचारवंत, सर्व विद्याविशारद, दृशादृश्यगमन, अद्वीतीय, अवतारी जाणून, **महाराजांनीं** मोठा उत्साह करून, उपदश घेतला. आशिर्वाद कल्याणप्रद दिल्हा. आणि त्याणीं सांगावें तसें घडावें, असे कितेक अनुभव आले. त्या वरून **शास्ताखाना**वरी जाण्याची करण्याची मसलत स्वामींची; त्या विचारें चालल्यामुळें व पूर्वार्जित अवतार **शिव विष्णु** एकच, तदन्वयें मृत्युलोकीं अवतार घेऊन, दुष्टांचा निःपात करून, मूढांस सन्मार्गी लावून, 'पापी जनांतें उद्धरोन, तारकमंत्रसांप्रदाय प्रसिद्ध करून, ब्रह्मचर्यव्रतें करून सुखेच्छा वर्तते जाले. त्यानीं **महाराजांस** आत्मज्ञानोपदेश केला, तो यथामतीनें वर्णितों. हटयोगाचीं साधनें ॥ अनेक मुद्रा संपादणें ॥ आत्मदृष्टी पाहणें॥ तदाकार ॥ ॥ तदाकार होतां ज्ञान॥ अखंडित स्थिरावें मन ॥मन स्थिर होतां जाण॥ ब्रह्मरूप॥ ॥ब्रह्मरूप होणें परम कठीण ॥ वक्ता करितां पावे मरण॥ तरी न पावे खुण ॥ आत्मज्ञानाची ॥ आत्मज्ञान जया करणें॥ पाहिजे तरी व्हावें शरण ॥ लीनपणें अनन्य भजनें॥ लीनपणें गुरुजवळी॥ गुरु सांगे मार्ग॥चाचरी खेचरी अगोचरी॥ चौथी पाहें मौन मुद्रां॥ अंतरी निरंतर ॥ ॥ उफराट दृष्टीनें पाहावें ॥ गोल्हाट उलंघोन जावें॥ ब्रह्मरंध्रातें भेदावें॥ तेथें मन स्थीर करावें॥ ॐकारस्वरूपातें जपावें ॥ रक्तांबर गगन जैसें ॥ सूर्य मंडळ भासे तैसे ॥ पांचवी मुद्रा आलेखिनीं ॥ तेथें वाचा मौन होती ॥ वेद श्रुती नेणती ॥ स्वरूपकळा कीं ॥ हरपलें वाचेचें बोलणें ॥ राहिलें नेत्राचें

पाहणें ॥ ऐसें ब्रह्मज्ञान लाधणें ॥ पूर्व भाग्य ॥ चारी योग चारी साधनें ॥ अष्टांग योग धारणें ॥ मार्ग सांगितला पवनें ॥ उफराटीये दृष्टी ॥ ॥ येथें फार असे आटाआट ॥ ह्मणोनियां राजयोग श्रेष्ठ ॥ सांगितला असे परमेष्टी ॥ आदिनारायणें ॥ आदिनारायण-सांप्रदाय ॥ वसिष्ठा पासूनी प्राप्त होय ॥ ब्रह्मदेवासी लागली सोय॥ ह्मणोनीं अर्पिलाजी ॥ अर्पिला ता सगुण ॥ रामचंद्र असतां निर्गुण॥ उपदेश घेतला सगुण ॥ त्रयोदश अक्षरी ॥ ॥ त्रयोदश अक्षरी महामंत्र ॥ रामदास योगें शिवमंत्र ॥ तारकोपदेशी निरंतर ॥ जपिता जाला ॥ ॥ तोचि मंत्र तुजकारणें ॥ राया दिधला सगुण ॥ याचिया पुरश्चरणें ॥ होसी अजरामर ॥ ॥ पुरश्चरणाचे उदक ॥ जगा होतां संरक्षक ॥ मी न मानितां संकल्प ॥ तुजला दिधला असे ॥ ॥ तुजमज नसे वियोग ॥ आहो रात्र संयोग ॥ जाणोनियां राजयोग॥ वर्ते सदा ॥ ॥ अर्जुनादि भक्त थोर थोर॥ सिद्ध जाले अपार ॥ नाहीं गणितासीं थार ॥ किती सांगू ॥ राया-सीं बाणली विद्या ॥ ठेऊनी जाला सुविद्या ॥ रामभक्त ॥ ॥ ऐसी रामउपासना मंत्रसिद्धि पावोन, स्वयंब्रह्म आपणच मानून, नित्य तीर्थप्रसादावांचून भोजन करूं नय. असा नेम धरून जाणें, वनीं धुंडीत असतां, राजांस तीन चार उपोषणें व्हावीं. पांचवे सातवे दिवशीं दृष्टीगोचर होऊन, अमृतकरें मुख कुरवाळून, सर्व दुःखापासून मुक्त करावें, भोजन मिळावें, येणेंकरून राजाचें शरीर कृश जालें. जवळचे लोकांस त्रास वाटला. ढोंगी बैरागी कुडें कपटें करतील, ह्मणोन कितेक, लोक यांणीं हात जोडून, शरण येऊन, विनंती केली कीं, 'महाराज, आपण सर्वज्ञ असतां, या गोसावीयाचे मार्गे लागून, राज्यक्रम मोडून, अविनाश मार्ग गोसावी सांगतो काय? आपण एकितां काय? आह्मी काय करावें? आपण धणी आहेत; शत्रू सबळ दिल्लीपती

सारिखा शिरावरी असतां, तुह्मी एकटे गोसावियाकरितां रानोरान फिरतां. कोण्ही धरून नेलें, ह्मणजे आमची रांडापोरें सध्यांच दांणकास देतील, आमचा जीव घेतील, असा योग आला. त्यास आह्मांस आतांच काय सांगणें तें सांगा'. अशी कितेकांची ह्मणणीं पडलीं. तीं ऐकून राजांस उत्तर सांगणें. परम संकट वाटून, जाब दिल्हा कीं, 'मला राज्य नको, प्रपंच नको, मी सर्व सोडून, आपले देहाचे सार्थकार्थ स्वामींचे चरण धरिले. पहा, सद्गुरु असा समर्थ कीं, अघटित करणी करून दाखविली. हा भीमाप्पा पूर्वीचा, शुद्धबुद्ध कसा होता, याजला व्यासाची उपमा दिल्ही असतां ही न्यून्य. असा बृहस्पति. पंडित लोक आत्मानात्म विवेक करून, मरणभय सोडून, स्वामींचे आश्रयें राहतात. त्यास मला स्वामी कृपावंत होऊन, अमर केलें. आतां कोणाचें भय मानीत नाहीं.' असें सांगून उगेच राहिले. मग वसिष्ठें रामचंद्रजीस उपदेश केला. समाधी लागली. नंतर वसिष्ठें सावध करून, तत्वोपदेश प्रपंचपरमार्थपरत्वें वर्तविलें. त्याप्रमाणें शिवाजी महाराजांस स्वामींनीं ही उपदेश केला कीं, 'राजा रे, तुजला सृष्टिसंरक्षणार्थ उत्पन्न भगवंतजीनीं केलें आहे, तरी तुम्हीं असावध राहूं नये; निरंतर ध्यानधारणा ठेवून, प्रपंचदक्षता वागवून, दुष्टदंडणीं वैवस्वत होऊन, प्रजापालण करून, गोब्राह्मणांचे आशिर्वाद घेऊन, शत्रुपराभवीं केवळ भीष्मच प्रतिज्ञेनीं चालावें. परस्त्रीचा लोभ न धरावा, निंदा करूं नये, महानुभावी यास अव्हेरूं नये, अन्यायावांचोन दंडों नये, उगेच कोणास गांजूं नये, भलते वेळेस आपली स्त्री म्हणून रती करूं नये, द्रव्य आहे म्हणोन उन्मत्त होऊं नये, थोरपणा आला म्हणून ताठा धरूं नये, देव भेटला म्हणोन सांगत फिरों नये, विचार केला सांगूं नये,

पुण्य केलें सांगूं नये, बाधा जाला म्हणून भांडूं नये, घेतल्या शिवाय सोडूं नये, फार वाचाळपण करूं नये, उगेच मुग्ध बसों नये, अविचारें वर्तूं नये, कार्यावांचून राहूं नये, अशा सर्व प्रकारच्या नीति राजा, तुजला निवेदिल्या आहेत. अंतरदृष्टी, भक्ति, मुख, ईश्वर परायण राहून, सर्वकाळ मननीं ध्यान ठेऊन, प्रपंचीं दक्षता असावी. आमचे दर्शनाचा हेतु, त्यास तुम्हास दर्शन होत जाईल. न जालियास सातारियाचे किल्ल्यावरून परळीचे किल्ल्यावरील श्रीरामचंद्रजीचे देवालयाचा कळस पाहून, तीर्थ घेऊन भोजन प्रमाद घेत जावा. माझी शफत आहे'. असे सांगोन अन्तर्धान पावले. महाराजांस वियोगाचा क्षण युगासमान जाऊं लागला; चिंताक्रान्त बसले, तेथून उठवेना तेव्हां पुन्हां प्रगट जाले आणि राजास सावध करून सांगितलें कीं, 'राजारे तूं भ्रांतिमिरीं पडों नको, तुजला सांगितल्याप्रमाणें वर्तणूक करणें, आम्ही तुझे जवळच आहों. तुजला संशय वाटेल, या करितां पुन्हां येऊन हें सांगतों, ऐक, बोलून निरोप घेऊन गेलें. सर्व लोकांनीं आश्चर्य मानून साक्षात् ईश्वर, अशी लोकांची खात्री होऊन द्वैतभाव जाऊन, स्वामीचे भजनीं लागले. याप्रमाणें प्रथम चरणीं द्वितीयोल्हास सांगितला. पुढें रायगडास जाऊन पुत्रोत्पादनादिकथा वर्ततील त्या श्रवण अत्यादरें सुमतीनें कराव्या. हस्तदोष क्षमीजे, बहुत काय लिहिणें हे विनंति.

श्री.

# खण्ड दुसरें.

श्रीमत् छंपाभंपातसंपादितकंपाकुपारप्रतापनर्ततवीचिदानपानपाणिः श्रीमदुर्विमुगखर्वगर्वितवसुधेषु चातुर्यऔदार्यधैर्यगांभीर्य गुणासाचितार्य कमनीयकामीकपोलांचिदांबरकस्तूरीतिलकेष विराजमान राजमान्य **श्री राजा शिव** सार्वभौम यांची पूर्वकथानुसंधान, द्वितीय चरण, द्वितीय उल्हासपर्यंत, **श्रीरामदास** सद्गुरूची सेवा करून, राम उपासना संपादून, विजापुरकरांचे व दिल्लीपतीचे फौजेचें शासन करून, यशध्वज उभारून, हिंदुधर्म स्थापून, अठरा वर्णास स्वधर्माचरणीं लावून, राजनीतीनीं उर्वीवमन चालून, शत्रू पादक्रान्त केले, हें वर्णन जालें. पुढें द्वितीयपद्माभ्यंतरीं तृतीय'ल्हास निवेदन करावा, ह्मणोन राजकीय व्यवहारिक सांप्रदायिक गृहस्थांनीं प्रश्न केल्यावरून, पुढें रसाळ कथानुसंधान चालवावें, ही इच्छा ऐकून, वक्ता संतोषें सांगावयास आरंभ करिता जाला. महाराजांनीं अमानुषी पराक्रम करण्यामुळें, विजापुरकर पादशहाचा महाराजाचे तीर्थरूपाचे ठायीं लोभ, याजमुळें सुभे पाठवून, यत्न करितां निर्फळ जाला. याजमुळ शहाजी राजांस उपद्रव करून, चिणून तोरमार करून, जीव घ्यावा हा इरादा धरिला; तत्रापि अकृत्रिम शहाजी राजा, हजरतीचे चरणारविंदीं निष्ठ, याजमुळें जुल्फुकारखान व रणदुलाखान यांणीं रदबदली

करून सोडविलें. नंतर **राजांचे** व **शिवाजी** महाराजांचे भेटीस फार दिवस जाले, बारा वर्षें होऊं नयेत, याजमुळें हजरतीस विचारून, भेटीचा योग **शिवाजीस** घेऊन यावें, असें ठरावून आले. भेटी होऊन परत गेले. हैदराबाद व आमदाबादचे पादशाह मोडून, **औरंगजेब** पादशहा यांणीं एकछत्री राज्य करून, विजापुरकरावरी आले. आणि **शिवाजी** महाराजांवरी फौजा पाठविल्या. त्या फौजेचीं व **महाराजांचे** फौजेचीं युद्धें जालीं, पराभवून गेले. नंतर राजापूर कोंकणबंदर **दर्यासागर** आरमार सजवून जलमार्गावर सत्त चालवून हबशाशीं जंजिरे याजकरितां प्रयत्न केला, तो निष्फळ जाला. समुद्रें प्रसन्न होऊन, किल्ला बांधावयास जागा दिल्ही. तेथें मालवणाचा किल्ला बांधिला. दोन वर्षांनंतर पांचचार लक्षांचा विषय प्राप्त अकल्पित व्हावा, श्रम पडूं नयेत, असा अश्वासनयुक्त वर जाला. **बाळाजी आवजी** याची भेटी होऊन, चिटनिशी, कारखाननिशी, सबनिशी, तीन धंदे वतनी, परंपरेस करून दिल्हे. पुढें **राजांनीं** राज्याभिषेक करून घेतला. **श्री** अविमुक्त क्षेत्रींहून महाधुरीण **गागाभट** ग्रंथप्रतिपादक, परंपरा समर्थ, त्यांचे विचारें सत्तेचाळिसावे वर्षीं व्रतबंध करूत, सिंहासनस्थ जाले. अशी कथा द्वितीयचरणीं द्वितीय उल्हासीं सांगितली. ऐकून पुन्हां श्रोते विचक्षण यांणीं पूर्वील कथा ऐकिली. सविस्तर सांगावी, ह्मणोन प्रार्थना केली, त्यावरून लिहिली ऐसीजे. **शास्ताखानाचा** पुत्र मारून, **शास्ताखानास** शिक्षा लावून, मार्गस्थ केलें. विजापुरीं पादशहा वारले. मुलें लहान, कारभारी याजवरी यवन लोकांनीं वाईस समजावून, अनेक प्रकारें दौलत लुटली, अशीं तुफानें रचून, आदावतीनें **मुरार जगदेराव** यांची हुर्मत घेण्याची होजना जाल्याउळें वाड्यांत बसविलें. तेथें समोर हौद बारवेसारिखा चहूंकडून पाय-

रिया उतरावयाच्या होत्या. त्यांत जिताभु पाणी कृष्णेचे उदकासारिखें मिष्ट, साक्षात् विष्णुतनु हजरतीचे पूर्वार्जितें प्रसन्न होऊन आली. तिजला दुर्भाषण करण्यांमुळें अदृश्य जाली. नंतर हजरतीनें उपोषित राहून, प्रार्थना येण्याविशीं करून, नहर बांधून आणीत असतां दृष्टांतीं आज्ञापिलें कीं, 'प्रत्यक्ष बोक्र येणार नाहीं, व श्रम ही करूं नको; केला असतां तुजला मृत्यु आणि राज्यभ्रष्टता पावशील'. याजमुळें नहर आणणें सोडून, कूपोदकीं कृष्णाउदकंभास प्राप्त जाला. तेथें शिखासूत्र त्याग करून, प्रेषोच्चार करिते जाले. मग शाहा जवळ कारभारी हिंदू, मानवर कोण्ही राहिला नाहीं आणि संपूर्ण यवन लोक अमीर, एक शहाजी राजे मातबर सरदार उमराव, वरकड लहान थोर सरदार होते, तरी शहाजी राजांपेक्षां भीड व लाग्रकी दुसरियाची नहुती. याजमुळें व एक दोन वजीर राजांस केथळ आप्तांत मानीत होते. त्यांचे व हजरतीचे लोभामुळें पांच चार वर्षे सुभे मामले पाठवून, शिवाजी महाराजांस आणवणेंविशीं प्रयत्न मात्र तितका केला; परंतु असाध्य जाला. शेवट हजरतीनीं समीपस्थ यवन अमीर यांचे विचारास अनुकूळ होऊन, शहाजी राजांस बोलावून, पृच्छा केली कीं, 'शिवाजी तुमचा पुत्र, सरकारराज्यांत बखेडा करून, सुभे, मामले, किल्ले, कोट, घेऊन, पुंड होऊन बसला. त्यास बरे वजेनें सांगोन, तुम्ही सरकार मनसबदार इतबारी असोन, तुमचे लेकांनीं बंड माजविलें, फौजा बुडविल्या, तुम्ही बंदोबस्त करीत नाहीं; त्यास हा गुन्हा तुमचे बद्दल मुरवत माफ करितों. हुजूर येऊन, नौकरीत हजर राहावें, ह्मणजे बंदोबस्त त्याचे जातीचा करून देतों, नाहीं तरी त्याचें पारिपत्य करितों, व तुह्मांसही शिक्षा करणें प्राप्त आहे'. असें बोलतां शहाजी राजे यांनीं तसलीम

करून, हात जोडून, बंदगीस उभे राहून, विनंती केली कीं, 'हजरतीचे हुकमाप्रमाणें आजपर्यंत सेवक वागून, पुढें ही आज्ञेस उजूर ठेवीत नाहीं, शरीरप्राणानिशीं हजर आहे; जसी आज्ञा तसी वर्तणूक करीन, अंतर जाल्यास पारपत्य करावें. लेंकानीं बंड केलें, त्याविसीं एक वेळ आज्ञा जाल्यावरून, आजपावेतों प्रयत्न तितका केला. परंतु आफीर होऊन, हुकूम मानीनासा जाला.. ये विसींची विनंती एकदोन वेळ केली, ती लक्षांत असेलच. अद्यापि ही कितीक तऱ्हेनीं सांगणें, तें नवाब साहेबांचे समक्ष त्याचेच विचारें सांगोन व लेहून पाठविलें असतां, बेजबाई जाहाला. माझा इलाज चालून, हजरतीचे कदमाशीं अंतर करीत असलों, तरी आपलें इमान जाणत असतील, उपाय करण्यांत कसर ठेविली नाहीं'. असें ह्मणतां, सर्ज्याखान हजरतीचे जवळ नवीनच वाढले होते, ते बोलों लागले कीं, 'त्याणीं दौलत कमाविली. ही तुह्मांस देणार नाहीं कीं काय ? वडिलांची सत्ता नाहींशी होईल कीं काय ? अथवा तुमचे दौलतीस तो वारिसदारी करील किंवा नाहीं ? हत्तीचे दांत दाखवायाचे वेगळे व खावयाचे वेगळे आहेत, तसे तुमचे लेंकाचा किसा दिसतो. तुह्मीच मनःपूर्वक त्याजला आणण्याचा यत्न केला असतां काय दुर्घट आहे ? परंतु ही दौलत त्याणीं घ्यावी, राज्य करावें, आपण पहावें, हे इच्छा कोण्हास नाहीं? असें सांगतां आमचे बुद्धीस तरी तुमचाच खेळ आहे असा दिसतो. त्याजला अनुमोदन पूर्वी खान कर्नाटकप्रांतीचा सरसुभा सांगत असतां, दौलताबादकर पादशाहापासोन सुटोन येण्याचें राजकारण सजलें, तेव्हां तें काम राजांचे नांवें करार केलें; सनदा होऊन, पुढें शहाजी राजे कर्नाटकप्रांतीं गेले. ते समयीं शिवाजी महाराजांपेक्षां जेष्ट पुत्र संभाजी राजे, यांस

मार्गी कनकगिरी किल्ल्यावरून गोळा सोडून, त्या द्वेषे करून मारिलें. आपल्या सुभा याणीं केला, असा पोटीं कल्प ठेऊन, व्यंगोक्तीचे ठाई शहाजी राजाचें न्यून्य, तेंच हजरतीजवळ सुचवीत असावें. परंतु महाराज पुण्यवान्, त्या योगें हजरतीचा लाभ, दिवसें दिवस अधिक होत गेला. सर्वांस ही हितावह वाटलें. एक दोन यवन चुरस करीत, त्याचा जमाखर्च चालत्या काळांत कोण्ही केला नाहीं. प्रस्तुत हजरत राजांशीं बोलतां, दुष्टांनीं उचल केली. पादशहास कोप येऊन, मनस्वी बोलले; त्यांत दुष्ट सामील जाले. तेव्हां राजानें पारपत्य कोणत्या प्रकारें करावें, हे बंडावे याजपासोन जाले, किंवा निरोगी मानविले, याची परीक्षा करावी, असे अर्थे तजवीज कोणत्या प्रकारानीं करावी, ह्मणोन विचार करितां, खाकतोदा करून, त्यांत माती भरावी, त्या मातींत राजांस उभा करून, चिणून तिरंदाजी करावी, ह्मणजे वास्तवीक असेल, तो उच्चार होईल. राजे प्राणास मुकतील, शिवाजीस दहशत बसेल, बंड मोडेल, सुभ्यास यश येईल; असे अनुमोदन देण्यानीं हजरत चढास लागून, संकेताप्रमाणें तोदा रचवून, राजांस उभे करून, माती चालविली, ती आकंठमर्यादाभर घातली. वरचेवरी दुष्टांनीं राजांस विचारीत असावें, आतां तरी प्रामाणिकपणानीं सांगा, हा फंद कोण्हाकडून जाला. नाहीं तरी तुम्ही प्राणास मुकाल, केला बेत विसकटेल, मग अर्थ काय ? वांचलां तरी हजरत कृपा करतील, तुमचें चालवितील; अपराध केला ह्मणून तुमची आबरू प्रतिष्ठा घालविणार नाहींत, तुमचे योग्यतेनुरूप ठेवतील, असे कितेक प्रकारचे तर्क घेऊन बोलावें. राजांनीं प्रथम विनंती केली, त्या प्रमाणेंच शेवटपर्यंत उत्तर करिते जाले. नंतर तिरंदाजीस वस्ताद उभे करून, तीर घेऊन चालवावे व आकंठमर्यादा मृत्तिका रचण्यामुळें प्राण कासावीस होत. त्या समई संपूर्ण

सृष्टि फिरली, असा प्रकार जाल्यामुळें राजांनीं हजरतीचे चरणार-विंदीं दृष्टि ठेविली. कशी, जसा आदिनारायण ज्या काळीं ब्रह्म देवास निर्माण केलें, ते समई भगवत् स्वरूप अगोचर, तें दृश्यमान व्हावें, ह्मणोन ब्रह्मदेव विव्हळ जाले. ते समई " तप तप " अशी वाणी जाली. तेव्हां त्या कमलगर्भी ब्रह्मदेवें अनुष्ठान केलें. त्या योगें वेदवाणी उत्पन्न जाली. आणि चहूं दिशाकडे पहातां, चारी वेद प्रगट जाले, त्या उपदेशें सृष्टि क्रमास अनुसरले; तसाच प्रकार राजांस जाला. आकंठपर्यंत मृत्तिका भरली, श्वासोच्छ्वास बंद जाले, नेत्रांस पिंगटता आली; त्यांत तीर चालविला, तो शरिरापासून दोन बोटें दूर तोंड्यांत होतां, मागील पिच्छ राजा समोर, परंतु पुढील अग्रभाग वक्र गेल्यामुळें, आंगास इजा जाली नाहीं. राजांनीं, विचारिलें असतां, लेंक माझ्या स्वाधीन नाहीं; स्वाधीन असोन मी, हजरतीशीं मिथ्या भाषण करीत नाहीं. या उपरी खावंदाची मर्जी असेल तसें करावें. परंतु शिवाजीस मी बंड, कर, असें सांगितलें नाहीं, व तो माझे हुकमांत नाहीं, हें सत्य बोलतों. असें वृद्ध पण वक्र एकनाथपणा ऐकून, रणदुल्लाखान राजांचे परम स्नेही, व झुलपुकारखान यांणीं, हजरतीचे वजीर, विश्वासू, त्यांणीं प्रामाणिक भाषण ऐकून, आपण जातीनें उठोन, हजरतीस कुरनुपा करोन, हजरतीस अर्ज केला कीं, 'खुदावंद साहेब शहाजीकडे दोष नाहीं. शिवाजीच बदफैली; याणीं शिक्षापत्र बहुत वेळां लिहिलें; परंतु त्यांणीं मानिलें नाहीं. याचा उपाय असोन, प्राणापर्यंत हजरतीनें दिवस गुजरविला असतां, लबाडी करून, खावंदाजवळ बोलत नाहीं. साहेबांचे कदमापाशीं हजर राहून, ही हरामखोरी केली नाहीं, व करावयाचें शीलही

नाहीं, हो माझी खातरजमा आहे. गुन्हा माफ होऊन सोडावें, ह्मणून बहुत बहुत अर्ज केला. तेव्हां जामीन रणदुल्लाखान जाले, आणि शहाजी राजांस सोडिलें; हजरतीचे कदमावरी डोई ठेवून, अर्ज केला, 'आज पर्यंत आबरू मेळविली, ती लेकामुळें घालविली. परंतु मी या कर्मांत नाहीं. ये विशीं विनंती ती काय करूं? सर्व हजरतीचे चरणांचे लक्षांत आहे. अस्तु'. बोलून उठले. हजरतीसही बहुत वाईट वाटलें. या दुष्टांचे योगें या मोठे मनुष्यांची आबरू घेतली, नीट केलें नाहीं माघारी बोलावून पुन्हां जड जवाहीर हत्ती, घोडे, शिक्केकट्यार, पोषाखसुद्धां पूर्ववत् चालीप्रमाणें मागील सुभा कायम ठेवून, जाजती अंमल, किल्ले, व दौलत दिल्ही. त्याच्या सनदा त्या समईं तयार करून, राजांस देऊन, बहुत बहुत खातर करून, राजांचे घरीं जाऊन, राजांस गादीवरी बसवून. नजराणे व शिरपाव व आहेर तमाम सलतनतेपासून करवून गौरव केला, नंतर घरीं आले. या प्रमाणें वृत्त जालें, तें शिवाजी राजे यांस कळोन, बहुत वाईट वाटलें, आपले हातून वडिलाची सेवा घडावी, तो प्रकार राहून, त्यांचे शरीरास विपत्ति जाली, चांगलें जालें नाहीं. कारण त्या पादशहाचें पारपत्य केलें असतें; तरी राजांस इजा कशास होती? त्यास दैवहीन आह्मी, दुःख देण्याकरितां जन्मास आलों, असा गाहिवर करून, श्रमी होऊन, आपले पदरचे लहान थोर सेवकजन होते, त्यांस आज्ञा केली कीं, ' यवनांचीं गांवें, खेडीं, परगणे, किल्लेकोट सुभे मामले वगैरे जें सांपडेल, तें सरकारांत आणोन दाखल करावें, त्यास बक्षीस देऊं, व जसें जो काम करील, त्यास त्याप्रमाणें इनाम मिळेल'. या प्रमाणें सांगोन, प्रांतांत दगा फारच आरंभिला. राजास चिणल्याचें वृत्त महाराजांस कळोन, द्वेषाधिक्य वाढून, विजापुरावरी चालून

गेले. लुटालुटही बहुत केली. त्याचे परिमार्जनार्थ फौज हजरतीकडून आली तिचें व महाराजांचें युद्ध जालें. त्यांत महाराजांनीं तीस चाळीस कोस दौड करून, जेथें फौजेची गांठ पडेल, तेथें मारामार करून, त्यांस शिकस्ती देऊन, आपण यश संपादून, हरएक जागीं निसांवा खाऊन, दाण वैरण घोडियांस करून, पुन्हां नेमिले ठाईं सर्वांनीं गोळा होऊन, यवनांस जेर केलें. रणदुलाखान व जुलपुकारखान व सर्जाखान व नेकनामखान व अमदुलाखान व जिवाखान व प्यारेमोहदीन वगैरे यवन मातबर होते, त्यांनीं हजरतीस जाऊन, विनंती केली कीं, 'शिवाजी देहभानावर असता तरी कांहीं विचार मनांत आणिता; परंतु त्याजला बापाची तमा नाहीं, तेथें सरकारचे कदमाची तमा कोठें ठेवितो! मनस्वी प्रांत उजाड करून दिल्हा, फौजेचा ठिकाण लागूं पावत नाहीं. आवशीं, पहाटे, दोन प्रहर दिवस, रात्र कोणता वेळ विसांवा खावयाचा त्याचा नेमच नाहीं. आष्टौ प्रहर फौज उभी; चहूंकडून लांडगेतोड करून, माणमांस उसंत पडूं देत नाहीं, यांस उपाय काय करावा! आमचे हुशारी पेक्षां त्याची हुशारी शतगुणें अधिक; ऐशीयास हजरतीजवळ न बोलावें; परंतु शहाजी मर्द माणूस सरकारच्या कदमाजवळ आज्ञेप्रमाणें चाकरी करून, आबरू मेळविली. त्याजपेक्षां त्याचा लेक, मर्द, विचारवंत, त्याचें मनोधारण ठेऊन, आपले जवळ ठेऊन, त्याजला चाकरी सांगून, मोठी दौलत कमावून द्यावी; नाहीं तरी फंदी जाणोन, त्या कामीं मारावा. परंतु आपणांत विरूद्ध पाडून, आपला बखेडा करून, आतां त्याजला मिळवून घेण्याचा यत्न केला, तरी त्याजला विश्वास वाटणार नाहीं. दूषाम कारणें अधिकाधिक जालीं. विचार सुचत नाहीं.' येविसीं पूर्वीं विनंती केली कीं, 'हुजूर बोलावून दिल्लीपतीवरी अगर हरएक जागीं मसलतशीर करून नाक काढावी. तें हजरतीनें

न ऐकून, हलकीं मनुष्य हातीं धरून, इत्यादियाचे प्रकार केले. आली-कडे **राजांचा** द्वेष वाढविल्यामुळें उपद्रव मांडिला. त्याचें व याचें चित्त एक असतें, तरी हरएकविशीं सदोदित कागदीं पत्रीं त्याचा व याचा सिलसिला राहता, अगर इकडील तिकडील मनुष्य जातीं येतीं, तो प्रकार अगदीं नजरेस येत नाहीं. **शहाजी**सारिखा मनुष्य खराब केला, चांगलें केलें नाहीं. पुढें आज्ञा काय, ती करावी. तसा विचार योजून, प्रयत्न पाहूं', ह्मणोन बोलतां पादशहा निवांत चौरसहा घटका बसले, विचार सुचेना. तेव्हां **रणदुलाखान** व **मिरअमदुलाखान** व **जुलपुकारखान** व **सर्व्याखान** यांणीं विनंती केली कीं, 'हजरत, एक विचार आह्मांस सुचतो जे, **शहाजीस** बोलावून आणोन, त्याचा आणखी गौरव करावा आणि याचा बंदोबस्त तुह्मी राखावा, ह्मणजे चोराचे घरीं बिराड घेतलें गेलें असतां, मागावयास तो धणी कायम; यांत फंद दिसला, तरी मसलत योजितां येईल. या शिवाय दुसरा विचार आह्मांस सूचत नाहीं, मग सरकारचे लक्षांत येऊन, आज्ञा होईल तसें करूं'; ह्मणोन ह्मणतां, पादशहाचे विचारास येऊन, **राजांस** बोलावून आणोन, मोठे गौरवानीं आज्ञा केली कीं, 'तुह्मी दौलतमंद, सरकार दौलतीचे स्तंभ, सरकार राज्यांत तुमचे लेकाचा फंद, त्याचीं शासनें योजिलीं असतां, निर्फल जालीं. सरकार गैरसमजुतीनें तुमची हुरमत घेतली. परंतु तुह्मी नेकदार, इमानी, तुमची परीक्षा होऊन, सरकार तुह्मांवरी कृपाळू होऊन, तुमची आवरू वधारून देऊन, इजतही दिल्ही. आतां या प्रसंगीं तुमच्या लेकानीं सरकाराशीं मिळोन, सरकार दुस्मन लोकांचें पारपत्य करून, आपली आवरू वधारून घ्यावी; तें सोडून पोरपणानीं हलके मनुष्यांचे नादीं लागून, सरकारासीच बिघाड, मातृस्थानीं

लघुशंका करावी, तसा प्रकार आरंभिला. त्यास तुह्मी सरंजामसुद्धां जाऊन, प्रांताचा बंदोबस्त करून, सरकार कदमासीं नेकी धरून, राज्य संरक्षण करावें. दौलतींत मनुष्य नाहीं, बंडावे माजवून, सरकारचे वस्तु बंदोबस्त होत नाहीं. ही अपकीर्ति दूर करून, पोक्त विचार तुह्मांस सुचेल, तसा करावा. सरकार तुमच्या करण्यांत सरीक आहे'. अशीं वचनें कितेक प्रकारें गौरवें सांगून, वस्त्रें भूषणें द्यावयाकरितां आग्रह करूं लागले. परंतु **राजांनीं** उत्तर केलें कीं, 'मी सरकारचें अन्न सेवन केलें, इमानानीं वागलों, ये विशींचि खातरी काय करूं? ईश्वर खुदावंद जाणत असेल. परंतु माझे जाण्यांत बंदोबस्त राहणें, अगर पारपत्य होणें, ईश्वराधीन. सरकारचे चरण आबरू ठेवितील ते प्रमाण. त्याचे पारपत्य न जालें असतां, दोपी होऊन बापलेक मिळोन हजरतीचे कदमासीं बंदी केली, असें लोकमुखीं येईल. याजकरितां या पेक्षां उत्कृष्ट काम असेल, ज्यांत माझा मृत्यु, अगर सरकार काम, ती चाकरी सांगितली असतां, करण्यास विहीत आहे. जाण्याचे पोटीं माझी आबरू नाहीं'. असें बहुत तऱ्हेनीं समजाविलें; परंतु पादशहाची मर्जी, उपाय नाहीं. तेव्हां वस्त्रें घेऊन, **शिवाजीचे** बंदोबस्तार्थ जाणें प्राप्त जालें. कारण चाकरी खावंदाची, आज्ञा होईल, तें करणें जरूर, आशा भावें निघाले. वस्त्रें घेतलीं, डेरे देऊन, विजापुराबाहेर निघाले. **शिवाजी महाराजांची** बातमी होतीच. त्यांणीं वडिलांस लेहून पाठविलें कीं, 'तुह्मी हें काम काय ह्मणोन पथकरिलें. मला हें राज्य घेणें, त्यापेक्षां तुमची पर्वा ठेऊन, कार्य करीत नाहीं. यांत तुमची हुरमत राहणार नाहीं. इतक्याउपरी वडिलांची मर्जी'. तें पत्रच सरकारांत पाठवून दिल्हें. हजरतीनें तें पाहून आश्चर्य मानून, **राजांस** सांगोन पाठविलें कीं, 'तुह्मास

काम सांगितलेंच आहे. तुह्मास फौज सरंजाम द्रव्य पाहिजे तें घेऊन जाऊन, दौलतीचा बचाव होईल तें करावें. तुमचे वचनाशिवाय बालाग्र दुसरा अर्थ होणार नाहीं. या अन्वयें मंडळीचीं हीं पत्रें राजांस गेलीं. तीं पाहून परम संकटीं पडोन, विचारीं बसले. तेव्हां हणमंते यांणीं विनंती केली कीं, 'महाराज, हजरतीची मर्जी मोडून, आपल्यास वागणें नाहीं. त्यांजला राज्य घेणें; तेव्हां विरुद्ध वाढण्यांत कसर राहिली नाहीं. दिल्लीपतीची मोहीम, सांगितली असती, तरी कबूल करण्यास मार्ग होता; परंतु या चाकरीस लाचारी प्राप्त जाली, अस्तु. संभाजी राजे प्रथम पुत्र कनकगिरीवरी गोळा लागून मेले, तसा प्रकार त्यांचे शासनांत जाला असतां नीट आहे; परंतु उलटा जाला असतां 'अपकीर्तिउभय-पक्षीं. यास तोड नाहीं'. राजांनीं उत्तर केलें कीं, 'हजरत ईश्वर अवतार, त्यांणीं समजोन सांगितलें, आतां मरणें हक्क, दुसरा विचार त्याचें पारपत्य आपले वस्तु व्हावें, ही पुण्याई आमची नाहीं, कारण मोठेमोठे यवन, बलाढ्य दुर्धर, शूर, त्यांजला भेटींत ज्याणीं मारिलें, तेथें इतराचा पदार्थ काय? पुण्यांत एकटा जाऊन, शास्ताखानाची करांगळी कांपून घेऊन, त्याजला काढून लाविला, फौज लुटली, असा प्रतापी पुरूष, त्याचें शासन आपले वस्तु होत नाहीं. आणि पूर्वीं आमचे वडिलांस श्रीदेवीचा वर जाला. त्यांत साक्षात् शिव, तुझे वंशीं उत्पन्न होऊन, म्लेच्छांचा नाश करील, ह्मणोन सांगितलें. तो प्रसंग आज प्राप्त जालासा दिसतो, अस्तु. हजरतीची आज्ञा, प्रारब्धीं जी दशा नेमिली असेल ती होईल, ह्मणोन भाळीं हात लावून, खिन्न होऊन बसले. ही बातमी हजरतीस कळली. मनांतील इषन्मात्र संशय होता न होता, तो दूर होऊन, राजांचे ठायीं लोभ वाढून, वरचेवरी लिहिणें व बरदास्त ठेवणें, बहुतच गौरव करूं लागले. शहाजी राजे

निघोन, कूच दरकूच मांदेशाच्या घांटानीं कराडास उतरून, च-हूंकडे अमंलदारांस पत्रें हुकमी पाठविलीं. **शिवाजी**चे तलाशींत लाग-ले. **महाराजांनीं** वडील ह्मणून कांहीं दिवस फौजेस उपद्रव दिल्हा नाहीं. रस्त बंद केली. एकटा दुकटा जाणारास लुटावें, इतकाच पर्याय ठेविला. तेव्हां हजरतीनें व मंडळीनें विजापुरीं विचार केला कीं, विजापुराबाहेर फौज सुभ्याची निघाली असतां लुटीत होते. परंतु या समई फार कृपा केली, पुढें कसें होईल, तें पहावें. इकडे **जिजाबाई** साहेब नित्य श्रमी होत कीं, स्वामींचें दर्शनास अंतरलें, पुत्र ईश्वरस्वरूपी अवतारी आहे. ईश्वरा, याचा विचार सिद्धीस जावो, आणि एकदां स्वामीचें दर्शन घडो. या प्रकारें निदिध्यास असतां, राजे मोहिमेवरी आल्याचें वृत्त कळोन, **महाराजांस** बाईनीं बोलावून सांगितलें कीं, 'वडील तुमचे बंदोबस्ताकारतां आले. त्यांसीं अमर्यादा न करितां, तुह्मी आरंभिला विचार सिद्धीस पावो, अशा अर्थें चालावें, ह्मणजे तुमच्या पुत्रधर्मास इहपर दोन्ही मार्गीं चांगली; यांत अंतर केल्यास, तुह्मांस चांगलें कोणही ह्मणणार नाहीं'. त्यावरून **महाराजांनीं** उत्तर केलें कीं, 'आई साहेब, तुह्मी जन्म देऊन, संपूर्ण जग दाखविलें. मार्गामार्गाचे विचार अंतःकरणीं वागले उमगले. आतां आपण सांगितला धर्म मोडून, करण्यास दोषी होऊं, या करितां उभयपक्षीं विचार नीट वागल्याचे पोटीं धर्मलक्षण चाललें नाहीं. पक्षीं समरांगणीं बाप अनला आणि त्याचा नाश अगर आपला नाश जाला, त्याचा दोष धर्मयुद्धांत बाधक नाहीं. या विषईं भारत, भीष्म, द्रोण, कर्ण, शल्य, गदा इत्यादी पर्वांचे ठाईं निर्णय **व्यासोक्त** आहे. त्या पेक्षां मर्यादा रक्षण करून घेणें, हें ज्याचे त्याज-पाशींच मार्ग असतात, वरकड पुत्रानीं पितृआज्ञा रक्षावी, आज्ञे

प्रमाणें चालावें, हें विहितच आहे. परंतु पात्रापात्र विचार दोहींकडे असावे. एकानीं राखिला, एकानीं मोडिला, त्यांत सौरभ्य राहत नाहीं. यास्तव कर्तव्यता दोषादोष मजकडे नाहीं. जशी आपली व श्रीची आज्ञा, तशी वर्तणूक करीन; अन्यप्रकारें चालणार नाहीं'. या प्रमाणें उत्तर जालें. नंतर शहाजी राजे यांचें पत्र आलें कीं, 'तुमचे बंडाव्यामुळें आमचा स्वरूपनाश जाला; परंतु वडिलांचे पुण्यप्रतापें करून, सर्व संकटें परिहर जालीं, प्रस्तुत तुमचा बंदोवस्त करावा, येविशीं सरकारआज्ञा आह्मांस आहे. त्यास तुह्मी कोणत्या प्रकारें अनुकूळ व्हावें, याचा विचार तो समजावा, त्या प्रमाणें करावयास येईल, हजरत केवळ मायबाप, त्याणीं तुह्मी इतके आफीर होऊन, नाश केला, तत्रापि तुमचें कल्याण करावें, हाच मनोदय असतां, सुभे आले त्यांचीं परिमार्जनें केलीं. आतां आह्मांस मोहीम सांगितली. त्यास आमचा ह्मातारपणाचा दिवस, तुह्मी उमेदवार, सरकारचाकरी जाली पाहिजे. तुमची आबरू ईश्वर राखणार; परंतु प्रसंगास समरीं परस्परें वधाचा दोष नाहीं; ये विशीं धर्मशास्त्रीं प्रमाण आहेच. त्या अर्थी विरुद्ध पक्षानीं तुह्मांस वागणें, किंवा अनीति स्वधर्म व्यवस्थापूर्वक चालणें, तो प्रकार कसा कळावा. भेटीसही फार दिवस जाले, बारा वर्षें न व्हावीं, तीं गुदरलीं; त्या पेक्षां कोणत्याही योगानीं एक वेळ भेटून जावें, हा हेतु धरून आलों. 'पुत्रादपि परजय :' हें नीतिशास्त्रीं वचन आहे; त्या प्रमाणें तुह्मी आमचा पराभव केला, ह्मणोन आह्मांस हीनत्व नाहीं. आह्मी रोजगार धंदे करावे, मिळोन तुमचा प्रपंच चालावा. तो प्रपंच तुमचा तुह्मांस समजूं लागला. आह्मास त्या प्रपंच्याचे पाहण्याची गरज नाहीं. तुमचे जन्मांतर तुह्मांस आहेच. आमच्या दिल्याघेतल्यानीं पुरी पडते, असा अर्थ

नाहीं. या करितां उत्तर लिहिणें, तें पुर्तेपणीं विचार करून त्याहावें'. असें पत्र आलें. तें मातुश्रीस दाखविलें, आणि मुजरा करून, विनंती केली कीं, 'मी सेवेसी पूर्वी विज्ञापना केली, त्याप्रमाणेंच वाडेलांची आज्ञा आली. आतां जशी आपली मर्जी असेल, तसें करावें. एवढें विरुद्ध वाढवून, यवनाजवळ शरण जावें, अशी गोष्ट या देहाचे वांटणी ईश्वर न आणो, हेंच मागणें. आणि ही गोष्ट आरंभावयास मी अदूरपणें उद्योग केला, अशीही गोष्ट जाली नाहीं. ईश्वरानीं काय समजून, प्रेरणा केली असेल, ती न कळे. वरकड माझे पोटास व कर्जे आपण मेळवून ठेविलींच होतीं; परंतु देवाजीचें मनास येऊन, केला यत्न सिद्धीस आजपर्यंत नेला, व पुढें ही लज्जा त्याची त्यासच आहे. मी निमित्यमात्र ईश्वरानीं योजून, उद्योग करविला. मज कडे यांतील अर्थ पाहतां, कांहीं एक नाहीं. या उपरी काय कर्तव्यता असेल, तें आज्ञा करून सांगावें, त्या प्रमाणें करितों'. ह्मणोन विनंती केली, ती ऐकून, रेणुकेचा अवतार साक्षात् आदिमाता **बाईसाहेब** होती. ती मौन राहून, ऐकुन घेऊन, उत्तर केलें कीं, 'बाबा, तुह्मी जें केलें तें ईश्वरआज्ञेनींच केलें. पुढें ही त्याचेच आज्ञेनीं करावें. तें शेवटाच जाईल'. असें सांगोन उगीच राहिली. **महाराजांनीं** नमस्कार करून, आपले स्वस्थळास येऊन, लहान थोर कारभारी सरदार व मुत्सद्दी यांस बोलावून, सभा केली, आणि वडिलांचें पत्र पुढें ठेऊन पृच्छा केली कीं, 'या पत्राचें उत्तर कसें द्यावें, तें लहान थोर तुह्मी सर्वत्र बसलां, हें पत्र पाहून सांगावें, तसा विचार करूं. उद्यां तुह्मी दोष ठेवाल कीं, **महाराज**, बाप आला असतां विरुद्ध वागले, अथवा वडील ह्मणोन, किंवा भिऊन शरण गेले, असें ह्मणाल याजकरितां "पिंड पिंड मतिर्मिन्ना" असें शास्त्र आहे, त्याजप्रमाणें ज्यास जसें सुचेल, तसें त्याणीं आज लेहून, पुढें मसुदा द्यावा.

उद्यां निंदा केली असतां, मुलाहिजा ठेवणार नाहीं, पारपत्य करीन. मग तुह्मास विकल्प वाटेल, याजकरितां स्पष्ट निर्भिडपणें मला सांगणें, तें लेहून सांगावें. मग मला जें सुचेल, तें गोड करीन'. असें बोलणें जालें. त्याचें उत्तर सर्वांनीं केलें कीं, 'महाराज केवळ ईश्वर, त्यांस बुद्धि सांगणें, आम्ही पामरें यांणीं काय सांगावी ? सर्वज्ञ आहेतच. परंतु यथामतीनें ज्यास कल्पना सुचेल, तसी तो विचार करून, उद्यां सायंकाळीं हजरी देईल. या समई कोण्हास सुचेल, कोण्हास न सुचेल. यास्तव आपले मनाची दृढता ठेऊन, जशी ज्याची प्रौढी, तसा तो मतलब हजर करील. त्यांत खावंदानीं मनास आणून, कर्तव्य असेल तें करावें. त्या मार्गानीं सर्वांनीं चालावें, हा धर्म आहे. आपण भूषण देऊन, सर्वांस विचारतां, ही गोष्ट कोणतेही ठिकाणीं प्रभूजवळ वागत नाहीं. यामुळें ते गोते खातात. आणि खावंद यशस्वि सर्वकाल होतात. कारण सर्वांचें चित्तांत येतें कीं, आमचे स्वामी आह्मांस विचारल्याशिवाय कोणतेंही करणें करीत नाहींत. याजमुळें सर्व एकदील राहून करणीं करतात, फत्ते होती. त्यास आजचा समय उद्यां आज्ञा होऊन विचारावें, ह्मणजे नीट आहे. त्यावरून महाराजांनीं 'फार उत्तम, उद्यां संध्याकाळीं समजावा' सांगितलें. सर्वत्र आपलाले ठिकाणीं गेले. ज्यांजकडे काम, ते सन्निध होते. मग कारभारी घेऊन, विचार केला कीं, वडिलांचे व आपले भेटीस बारा वर्षे गुजरलीं. त्या पेक्षां विरुद्ध वाढवून किंतु आणूं नये. भेटी जाल्यानंतर आज्ञा होईल तसें करूं, असें उत्तर द्यावें, मग भेटींतच अबदुलखानासारिखा पर्याय महाराज करीत नाहींत. त्यांच्या आपल्या बैठका होतील, बोलणीं होतील त्यांत सलेस विचार न आल्यास, तसाच विचार करितां येईल. या करण्यास आपले अमलास तसदी पावणार नाहीं; बखेडा होणार नाहीं. मातुश्री नित्य

श्रमी होतात, ते श्रम दूर होतील. बहुतां दिवसांची भेटी, हाही मोठा लाभच आहे. वांकडेपणाच आरंभावयाचा विचार दिसल्यास, आपल्यास मसलत करण्यास आगाध काय आहे? असी सला ठरली. त्या प्रमाणें दुसरे दिवशीं मंडळीनीं ही सला दिल्ही कीं, वडिलांस भेटून कर्तव्य तें करावें, तों पर्यंत किशाफ वाडवून, आजच युद्धप्रसंगासीं गांठ घालूं नये. या प्रमाणें सर्वानुमतें जाल्यावरी वाडिलांस पत्र लिहिलें कीं, 'बहुतां दिवशीं पत्र पाठवून, दर्शनातुल्य आनंद जाला. मजकूर समजला. तितकीं उत्तरें ल्याहावीं, तरी आह्मी म्लेंच्छांचे दुस्मन, आपण त्यांचेकडून शिक्षेस आलांत, ये विशींचीं उत्तरें ल्याहावीं, तरी अमर्यादा घडती; यास्तव हे विचार मनांत आणूं नयेत. आपले आमचे भेटीस द्वादशाद्वांतर गुजरलीं. त्या पेक्षां आपले स्वामीस लेहून, भेटीचा योग होऊन, प्रत्यक्ष बोलण्यांत ठरेल तसें करूं. असे पर्याय भेटीचा सला घेऊन दर्शन द्यावें, मातुश्रींचे श्रम दूर करावे, मजला सनाथ करावें. मग परस्पर विचार समजोन घेऊन, करणें तसें करावयाचें'. अशा प्रकारें पत्र लेहून पाठविलें. तें पत्र ........ **पानसंबळे, जिजाऊ** साहेबांचे विश्वासुक, त्या मनुष्याबराबर सरंजाम स्वार लोक तैनातीस देऊन पाठविले. त्यांणीं जाऊन, मुजरा करून, सर्वांचें क्षेमकुशळ सांगोन पत्र दिल्हें. एकांतीं बसोन, पत्र वाचलें. नंतर चार दिवस ठेऊन घेऊन, हजरतीस उत्तर लिहिलें कीं, 'जरब देऊन, **शिवाजी** हातास येण्याचा प्रकार दिसत नाहीं. त्या पेक्षां जशा प्रकारें विचार सुचेल, तशा प्रकारें करून **उपद्रव** शमन करण्याचा प्रयत्न करितों. त्याचें प्रत्योत्तर, हजरतीचें, आलें कीं, तुमचें पत्र पावलें. तुम्हास कळेल तसें करून, उपद्रव लागूं न देतां **शिवाजी** घेऊन यावा. एवढें जालें असतां, तुमची तारीफ बोलावी, लयहावी किती? या मनसब्यानीं उत्तर आलें. तें पाहून **राजांनीं** महाराजांस

पत्र पाठविलें, कीं, 'तुमचें पत्र पावलें. तुमचा हेतु, तसेच मनोदय शेवटास जातील, चिंता न करावी. आम्हीं कोणत्या मार्गानीं तुमची भेट कोणते जागीं घ्यावी, ते कळवावी. त्या प्रमाणें येऊं'. या प्रमाणें पत्र गेलें. तें पत्र पाठवण्यापूर्वीं कराडच्यानजीक मुक्काम जाला; तेथें **महाराज** जाऊन, राजेश्रीस सांगोन पाठविलें कीं, 'मी भेटीस आलों'. त्यावरून **राजांनीं** सांगितलें कीं, 'फलटणानजीक तुमची आमची भेटी व्हावी; मधीं तुम्ही येऊं नये'. त्यावरून तेथें आगाडी पिछाडींत कांहीं लुटालूट केली. आणि **महाराज** निघून श्री जेजुरीस गेले. मागें **राजांनीं** तयारी करून, वरघांटानीं बारामतीचे मैदानांत फलटणानजीक निरेवरी मुक्काम केला. तेथें उभयपक्षीं साडणी स्वार व जासूद, हलकारे, कासीद जाऊन येऊन, वर्तमान पोंहचवून, भेटीचा नेम आरडगांवाचे पलिकडे माळाखालीं ठराविला. तेथें भेटी मोठ्या समारंभानीं जाल्या. तार्थवडीयाच्या किल्ल्यावरील तोफा होतांच, पुरंदर वगैरे किल्लोकिल्यास सरबत्ती एकावच्छेदें जाली. ती दोन प्रहरपर्यंत एक सारखी; कोण्हाचें बालणें कोण्हास एकूं न येई, असा प्रकार जाला. विधियुक्त शिवालयीं पूजा होऊन, **राजश्री** व **महाराज** भेटले. त्या पूर्वीं उभयपक्षीं सरदार लोक परस्पर भेटले. नंतर मातुश्रीची भेटी जेजुरींत जाली. या प्रमाणें भेटी होऊन, भोजनें जालीं. पुण्यास येऊन, नंतर राजगड, तोरणा, सिंहगड, रायगड, लोहगड, वासोटा, रोहुडा, केळणा वगैरे किल्ले दाखवीत, सातारियांत आले. नंतर पनाळा व पावनगड व विशाळगड, बावडा दाखविला. बंदोबस्त पाहून, **शहाजी** राजे यांणीं मनांत आणिलें कीं, 'हा अवतारी पुरूष, याचे विरुद्ध केलें असतां, यवनांची मसलत सिद्धीस जाणार नाहीं. हा धीर, वीर, पराक्रमी, विचारवंत, सर्व गोष्टींनीं निपुण आहे'. **बादिसाहवांनीं** ही **श्रीचे** आज्ञेचा प्रकार, **महाराज** वर्ततात, ही

गोष्ट सांगितली. त्यावरून खातरी होऊन, निरोप घेऊन, परत जाण्याविसीं **महाराजांस** विचारिलें. त्यावरून हात जोडून, वडिलांस विनंती केली कीं, ' महाराज, आपले पोटीं जन्म घेतला. आपल्यास यावज्जीव सुख देऊन सेवा करावी, त्यास मी महापातकी, या फंदांत पडून, आपल्यास दुःख दिल्हें. सर्व प्रकारें माझ्यामुळें आपली हुर्मत गेली, शरीरानीं हैराण जालांत, आतां विशेष बोलून फळ काय? हो तरवार घेऊन, माझा वध करावा आणि आपण जावें; नाहीं तरी बरी वाईट माझे वस्तु सेवा होईल ती घेऊन, स्वस्थ येथें असावें. यवन, दुष्टत्वें करून नाशास पात्र होतील. त्यास त्यांचा माझा पूर्व जन्मांतरीचाच वैरप्रकार आहे. आपण वडील, आज्ञा करितील तशी वर्तणूक, यवनांस मुजरा करण्याशिवाय, सांगतील तें मान्य आहे. प्राणापर्यंत उदार', म्हणून सांगितलें. तें ऐकून **राजे** अंतःकरणांत समाधान होऊन, कृतकृत्य मानून, आज्ञा केली कीं, 'तुह्मी ईश्वरी आज्ञा, तसे चालतां. ती आज्ञा भंग करून चाला, ह्मणून आह्मी सांगावें, हें नीट नाहीं. परंतु संपूर्ण पृथ्वी यवनाक्रांत, यांत आपला शेंवट चांगला लागून, लोकोपकीर्तिप्रद सर्वतोमुखीं उच्चार होय, असें चाललें असतां, इहपर परिणामदायक होईल; नाहीं तरी लोकांत हांसें होऊन, आह्मांस दुःखकारक, वृद्धापकाळीं संकटांत, येवढें दैवास आणूं नका'; ह्मणोन सांगोन, **महाराजांस** पोटाशीं धरून, श्रमी जाले. **महाराज** ही विश्रम पावून, चरणारविंदीं मस्तक ठेवून, 'तथास्तु, जशी वडीलांची आज्ञा, त्या प्रमाणेंच ईश्वर शेवटास नेईल. येविशीं चिंता करून फळ काय आहे ? ' ही विनंती श्रवणीं येऊन, जाण्याविशीं निश्चयाचा नेम ठराविला. **महाराज** ही वडिलांसमागमें, लहान थोर आले, त्यांस जोंपर्यंत **राजे** यांची तयारी होय, तों पावेतों सिधा,

चंदी, घास, लकडी, वगैरे सरंजाम मानकरी यांस व दरकदार व शागिर्द-पेशा यांस दिल्हा. जाण्याचे नेमाचे पूर्व दिवशीं सर्वत्रांस भोजन, पाक करून, जेवण दिल्हें व ब्राह्मणांस पक्वान्नें करून, मेजवानगी केली, व लहान थोरांस, जसा ज्याचा हेतु, तसें त्यास सामान दिल्हें. चंदी घांस जनावरांस रातब दिल्हे आणि सर्वांस वस्त्रें व मानकरी यांस अलंकार भूषणें देऊन, हत्ती, तोफा, नजर करून, हात बांधून सन्मुख उभे राहिले. मग **शहाजी** राजे यांणीं जवळ बसवून, आपलेकडील जवाहीर, हत्ती, तोफा, **महाराजांस** देऊन, दरकदार व मानकरी यांस वस्त्रें भूषणें, योग्यतेनुरूप दिल्हीं. निरोप घेऊन, कूच करून, वारणेवरी येऊन मुक्काम केला. नंतर **जिजाऊ**साहेब पोंहचवीत तीन मजली **राजा**बरोबर गेली.**महाराज** दोन मुक्काम पुढें जाऊन, पायावरी डोई ठेवून, परत सातारियास आले. **महाराजां**नीं **राजे** गेल्यावरी कांहीं दिवस कोंकणप्रांतीं जाऊन, **सांवता**चा व **महाराजां**चा भेटीचा योग जाला. त्यांत **सांवत** याणीं मोर्चेल राजचिन्हें मंडित भेटीस आले. उभयतांच्या भेटी शिरस्ते चालीप्रमाणें जाल्या. त्यांत डोईवरी मोर्चेलें दोन उडतां पाहून, विषाद उत्पन्न उभयपक्षीं मनांत आले, कलहास पात्र जाले. त्यामुळें ठाईं ठाईं डोंगर जाण्यायेण्याचे रस्ते नाकीं धरलीं. **सांवत** आले असतां बाधक, याजमुळें चौक्या ठेवून, **महाराजां**नीं बंदोबस्त केला आणि राजापुरास जाऊन पेंठ लुटली. नंतर ठाण्यांत गेले, तों तेथील मोंगल सुभेदार फतेमारींत बसोन, जंजिरें येथील **खैरतखान** याचा व नबावाचा घरोबा होता. याजमुळें त्याचे आश्रयास गेले.... **पंत** सुभेदार कामदार नबाबाचे हाता खालीं होते. ते **महाराजांस** येऊन भेटले. तमाम महानाड रयत उदमी वगैरे गोरगरिब सर्व **महाराजांस** शरण

आली. त्याची खातरी करून, ठाणें बसवून, रामचंद्रपंत यांस बंदोबस्त करण्याविशीं आज्ञा केली. आणि महाराज निघोन जंजिरा राजपुरी येथें स्वारी गेली, तेथें जंजिरा घेण्याविशीं प्रयत्न तितका केला; परंतु निर्फळ जाला. याजमुळें उदास जाले. समुद्राजवळ उपोषणें करीत बसले. ते समयीं समुद्र ब्राह्मणवेशें स्वप्नांतरीं येऊन, तिसरे दिवशीं सांगितलें कीं, "तूं या जंजिऱ्याविषयीं संकट मजला घालूं नये. ही जागा त्या यवनास ब्राह्मणानीं आचंद्रार्क याजवळ राहावी, असा मुहूर्त दिल्हा असतां, दैवहीन, दुर्बुद्धि, त्याजमुळें लोखंडाची मेख रोंविली, ती उपटविली. त्यांतून रुधिर वाहूं लागलें. ते समईं त्या ब्राह्मणास बोलावून विचारिलें. त्याणीं उत्तर केलें, कीं, 'तुह्मीं दैवहीन, मी असा मुहूर्त दिल्हा कीं, इंद्रचंद्र जे समयीं फिरतील, तेव्हां तुझी जागा जाईल तरी जावो. मधीं तुझे परंपरेव्यतिरिक्त दुसरियास प्राप्त होऊं नये. असा सुमुहूर्त दिल्हा. त्याचें प्रमाण, ही मेख उपटविली. त्यांतून रुधिर वाहतें. हें शेषाचे मस्तकांतून रुधिर वाहतें. हें बंद करावयाची मर्जी आहे. त्यास मेण त्या समईं आणवून मेख करून, त्या छिद्रांत मेख घालून, अग्नीचा ताव देतांच, रुधिर बंद जालें. हें पाहून त्या यवनास परम दुःख होऊन, पुन्हा त्या ब्राह्मणास शरण जाऊन, मुहूर्त मागितला. त्यावरून त्याणीं सांगितलेला मुहूर्तकाळीं, त्या मुहूर्तप्रमाणें मुहूर्त मिळणार नाहीं. तुमची मर्जी आहे, तरी मासपक्षांत मुहूर्त एक पाहून सांगेन. त्यायोगें सातशें वर्षपर्यंत तुह्मांस या स्थळांतून काढावयाचें सामर्थ्य दुसरियास आलें असतां ही बुद्धि होणार नाहीं. तुमचेकडे अविच्छिन्न जागा वर्तेल. त्याजला तो यवन मान्य होऊन, त्या मुहूर्तावरी कारखाना चालू करून, हा जंजिरा किल्ला बांधला आहे. या करितां हे राजा रे, तूं मजला संकटांत घालूं नकोस. तुझी इच्छा अशी जा-

ग्रंथ संग्रहालय



गा असावी, तरी तुझे सन्मुख उदक, प्रहर दिवस आल्यानंतर, तीन कोश किनारियापासून दूर उदकांत आम्ही दृष्टीदेखतं नूतन उत्पन्न या खडकावरी होऊन, बेट दिसेल. त्याजवरी किल्ला बांधणें. तेथें गोडें पाणीही लागेल आणि तीनवर्षांआड चार लक्ष रुपायांचें उत्पन्न, अकल्पित मिळत जाईल'. याप्रमाणें सांगून अदृश्य जाला. महाराज सावध होऊन पाहतात, तों कांहीं नाहीं. प्रातःकाल जाला पाहून, मलमूत्र विसर्जन करून, स्नानसंध्या करीत बसले. इतकि-यांत वाळूचा ढिगला सन्मुख चढता दिसों लागला. सर्व लोक पाहतां, प्रहर दिवसां पाहतात, तों मोठें विस्तीर्ण बेट दिसों लागलें. तेथें जहाजें, गलबतें, आरमारें, फत्तेमारया वगैरे, पाले गुराबा तराडी शतावधी आणविली. त्यांत सरंजामसुध्धां बसोन, बेटावरी जाऊन, जागा पाहिली. ती जागा स्वप्नांत जशी दृष्टी पडली, त्याप्रमाणें पाहून संतोष होऊन, तेथें मालवण या नामें करून, किल्ला बांधविला. त्याजला नामजाद ठेऊन, त्याचे निर्वाहार्थ खुष्कीपैकीं तीस पसतीस हजार रुपयांची जागा नेमून दिल्ही. बाळाजी आवजी राजापुरीहून आपले बंधू म्हणोन आणिले. त्याजला चिटनिशीचीं वस्त्रें शके १५७० चे सालीं माघमासीं दिल्हीं. कोणतें ही करणें, तें बाळाजी बाबास विचारल्याशिवाय करणें नाहीं आणि श्रीचा संचार आंगांत जाला असतां, सर्वत्र दूर राहावें; परंतु बाळाजी बावाजी एकांतीं बसोन, मनोदयानुरूप विनंती करून, श्रीस प्रार्थना करावी. आज्ञा घेऊन जीं अक्षरें श्रीचे मुखांतून निघतील, तीं लेहून ठेऊन, महाराजांस दाखवावीं. उत्तरप्रत्योत्तर जालें असेल, तसें समजावून निराकर्ण करावें. त्या सल्लप्रमाणें वर्तले असतां, केली मसलत सिद्ध व्हावी; न केलें असतां, मसलत विसकटावी, संकटांत पडावें, असे कितेक दाखले

पाहून, महाराजांनीं बाळाजीबावाचे ठाईं विश्वास ठेऊन वागले. व हे ही एकनिष्ठ, जसा ईश्वर तसा राजा कल्पून, कोणविसीं प्रतारणा न करतां राजांचें कल्याण त्यांत आपलें .कल्याण इच्छून, राहिले.चिमणाजीआवजीकडे दफतरदारी सांगितली. शामजी आवजीकडे किल्लोकिल्यावरील बंदोबस्ताचें काम कारनिसीचा दरख सांगितला. या प्रमाणें त्रिवर्ग बंधु यांस कामें सांगोन, परम विश्वासूक सेवक, काम काज सांगणें,यांनीं करणें;रहस्यानीं उभय पक्षीं वागणें,तेव्हां एके समईं बाळाजी बावाजवळ महाराजांनीं सांगितलें कीं, 'जंजिरा किल्ला आपलेकडे असावाअशी आपली इच्छा राहिली. मालवण मोबदला किल्ला श्रीनें दिल्हा, परंतु त्या ठिकाणीं आस्ता राहिली. ऐसियास तुमची ज्ञात जंजिरियांत फार आणि कामदार व विश्वासूक वागतात. त्यांचा सांगाल तसा बंदोबस्त करून देऊं; परंतु एवढी गोष्ट आह्मांस साध्य करून द्यावी'. त्याजवरून बाळाजी आवजीनीं मुजरा करून, विनंती केली कीं, 'महाराज, एवढी गोष्ट मजला होणार नाहीं. एकदोन सोइरे आमचे तेथें आहेत. त्यांला पाहिजे तरी भेटवीन. परंतु ज्याचें अन्न खावें, त्याचे बरावरी उठावें, अशी गोष्ट घडणार नाहीं. मी साहेबांजवळ आहे; जासूद पाठवावा, मी पत्र आपले समक्ष लिहितों. ते येतील, त्यांस विचारावें, उत्तर करतील तें मनन करावें. ती गोष्ट कबूल होऊन, जासुदास पत्र लेहून देऊन पाठविला. ते गृहस्थ चिठी पावतांच, निघून नवाबास, विचारून, महाराजाचे भेटीस आले. महाराजांनीं आज्ञा केली कीं, 'तुह्मी जंजिरा आह्मांस साध्य करून द्यावा; तुमची इच्छा जी असेल, ती पूर्ण करूं; परंतु एवढी गोष्ट आमची एकावी'. त्यांणीं ऐकून महाराजांस विनंती केली कीं, 'महाराज, आमचे प्रभूचे बीजाच

जो असेल, तो ज्या धण्याजवळ वाढला, त्या धण्याची व्यंगोक्तीची गोष्ट ऐकून, उगाच राहणार नाहीं; व त्याचें घर घालण्याची बुद्धिही त्यास उत्पन्न होणार नाहीं. जो कोणी असा आमचे जातींत उत्पन्न होईल, तो पितृरेता पासून त्याचा जन्म नाहीं. ही खातरी ठेऊन, आज्ञा करणें, ती करावी'. त्याजवरून **महाराजांस** अधिक खात्री वाटून, प्रभू लोकांचा संग्रह व काम काज सांगणें, विश्वासांत वागवणें, विशेष वागऊं लागले. नंतर आरमार सजवून मोठी तरांडी, पालें करविलीं. ज्या पालांत सरंनाम दोन दोन हजार तोफा राहून, चहूंकडून मारगिरी चालली असतां, त्यांतील लोकांनीं कोणत्याही कर्मास आयास न येतां, शत्रूचा पराभव करावा, असीं केलीं. आरमारी जलमार्गाचा बंदोबस्त केला व खुष्की वरील राज्य दिल्लीचें घ्यावें; हा इरादा धरिला. दैववान्, जी गोष्ट मनांत आणावी, ती सिद्धिस जावी. या प्रमाणें होत असतां, जंजिरे येथून हबसी शिद्दी **बिलाल** दिल्लीस जाऊन, सर्व वृतांत सांगितला. ते समई पादशाहास मोठा आवेश येऊन, पृथ्वीपती सार्वभौम असतां माझें देणें घ्यावें, आज्ञा भंग करावी, असा पुंड, नूतन कोण उत्पन्न जाला, त्याचें पारपत्य केलें पाहिजे. या करितांच राजे अमीर सरदार करावे. तरी दौलतदार मोठे संभावीत म्हणावे, असे नाहीं. तेव्हां लौकिकीं दुसरी मसलत दाखवून, पोटीं या **महाराजांचें** पारपत्य करावें, हा हेतु ठेवून, **औरंगजेब** पांचवे कनिष्ट पुत्र उमदे जाणून, त्यांस आज्ञा केली कीं, 'तुह्मी गुजराथ प्रांतीं **आमदशाहा पीर** हजरत जाले. त्यांचे दौलतीचे बंदोबस्तास्तव जावें. तेथून विजापुर व हैदराबादचे दौलतीचा बंदोबस्त ठेवावा'. या प्रमाणें हुकूम होऊन, समागमें फौज तोफखाना, अमिर उमराव सरदार सल-

तनत नेमणूक जाली. सुमुहूर्तें डेरे दाखल जाले आणि दक्षिण पंथें रोंख डेऱ्यांचा ठेविला. तमाम प्रांतीं वर्तमान जाहीर जालें कीं, दिल्लीहून फौज गुजराथ प्रांतीं व हैदराबाद प्रांतीं जाणार. जे उमेदवार रोजगारी, ते येऊन खांवदांस भेटून, आपलाले मनोदय विदित करून, शेर आट्यास कलमी ज्यार जाले. **औरंगजेब** पादशहा गुजराथींत येऊन, आमदाबादेचा बंदोबस्त केला. तेथून कूच दरकूच निघोन, गंगा उतरोन बिडाचे सुमारें गेले. हें वृत्त **शिवाजी महाराजांस** कळोन फौजेच्या टोळ्या केल्या. आगाडी पिछाडी मारावी, जामदारखान्याचे उंट वळून न्यावे. याप्रमाणें एक वर्ष उपद्रव दिल्हा. लष्करांतील माणूस एकटें दुकटें, पांच पन्नास फिरण्यास फार आयास पडूं लागला. हजार पांचशें लढाऊ माणूस जमावें. नंतर मार्गस्त जाणार त्यांणीं काफल्यांत यावें, मग रस्ता चालवा. त्यांत गांठ पडली असतां, वांचल्यास ईश्वरी इच्छा; नाहीं तर लुटलें ह्मणोन हांक **औरंगजेब** पादशहा जवळ जावी. त्यांणीं वर्तमान ऐकून खपा व्हावें. या सैतानाचा बंदोबस्त करण्याचा यत्न कोणत्या प्रकारें योजावा, करावा. कारण चाळीस कोश पळ काढून जावें; पुन्हा परत येऊन लुटावें, भांडावें, मारावें, शोधूं जातां, हातास न लागावें; नाहीं ह्मणतां सन्मुख उभें असावें, धरूं ह्मणतां न सांपडावें, यामुळें दिक सदोदित वर्तावें. लहान थोर सेवकजनांस विचारावें; तेव्हां कोणहास न सुचावें. तेव्हां एके दिवशीं काजीजवळ मूल अभ्यासाकरितां थोर थोर अमीर उमराव यांचीं राहत. त्यांत काजीनीं दुष्काळांत दोन मुलें खरीदी घेतलीं. तीं त्या शाळेंत विद्याभ्यास करीत होतीं. त्यांत एक मूल हुशार होता. त्यांणीं **औरंगजेब** पादशाहा दिक बसले पाहून, तसलीम बजावून हात जोडून अर्ज केला कीं, 'हजरत, दिन दुनियेचे खावंद, आपल्यास

संकट असें कोण ? असें दिक करावयाजोगें कोणतें आहे ? तें खाना-जाद्दास जाहीर केल्यास अर्ज करील'. त्यावरून औरंगजेब पादशहा यांणीं सांगितलें कीं, शिवाजी हिंदु बरगा उत्पन्न जाला. त्यांणीं दक्षणेंत बैदा करून, सरकार अंमल उठवून आपण अंमल दस्त करून, सरकारी फौज बंदोबस्तास पाठविली, ती लुटून सरकार स्वारींत अगाडी पिछाडी मारितो; पाठलाग केला, तरी साठ कोश पळून जातो, परत यावें, तरी पुढें येऊन, लुटावयास हजर आहेत, असा उपद्रव दिल्हा. या सैतानास उपाय काय करावा, ह्मणोन विचारतों, कोण्हास सुचत नाहीं; आणि जातीस ही मसलत विचार लक्षांत येत नाहीं. त्यास तुझ्या बुद्धिस प्रकार कसा येतो तो सांग'.म्हणून ह्मणतां त्यांणीं तसलीम बजावून, हात बांधून, पुढें उभें राहून, विनंती केली कीं, महाराज, हजरत, सलामत, अल्ला करो कीं, या सैतानाचा बंदोबस्त करण्याचा मजकूर अधिक काय आहे ? सहज गोष्ट माझ्या लक्षांत येते, तो विचार विदित करितों. मग मर्जी खुदावंदाची असेल, तसें करावें. तें समई 'सांग, ह्मणतां अर्ज केला कीं, 'घोडे मोठे थोर कसरतीचे आहेत, ह्मणून चाळीस कोश जातो; चाळीस कोश परत येतो. याची बिशाद काय ? या पेक्षां उंट शंभर दीडशें कोश चलाख आहेत, त्याजवरी दोन स्वार बसवून, दारू गोळी बंदूख तीर कमान सेती दोरीची ढाल तरवार आणि पिस्तोल सुद्धां चार दिवसांचा भोजनाचा सरंजाम त्यासुद्धां पाठीवरी राहून, त्या सैतानापेक्षां दौड, उंटें ज्यासती करतील. शत्रु आगास येऊन, पारपत्य करावयास नीट पडेल; मग खावंदाची मर्जी'. या प्रमाणें एकून कल्पना ज्यास्ती मुलाची खरी. हाच खावंद होईल. याजपेक्षां वरकड मुलांत बुद्धि नाहीं. असा विचार मनांत आणून, मखमू डोईंत घालून मारविला. नंतर दोन तीन हजार सांडणी स्वार दोन दोन हजार रुपयांचे किंमतीचीं उंटें

घेऊन, तयार करून पाउणशे शंभर कोश चालेत, पला निमे, असी तयारी करवून, शिवाजी महाराजांचे पारपत्य करण्याची योजना केली. त्या समई जेसिंग राजाचें वळण पादशहापाशीं चांगलें होतें; त्याणीं ही हें वर्तमान ऐकून माहीत होतें. पुढें हजरतीचे मनांत दक्षिणेत स्वारी करावी असें मनांत आलें. शौच्याहून येऊन पाय धुवीत बसले. ते समई भिस्ती नजीक उभा आहे. त्याणीं चेहरा पाहून घरीं येऊन, आपले स्त्रीस सांगितलें कीं, तूं चिंता कशा करतां करितीस ? उद्यां पादशहा दक्षणेंत जाणार, त्यास दोनचार बैल नवे खरेदी घेतों. पाणी जतन करा, ह्मणजे पैसा मुबलग मिळेल, पाहिजे तशा वस्ता करून देईन.' हें ऐकून संतोष जाली. शेजारणीस तिणें सांगितलें. पादशहाचे स्वारीची तयारी आहे. आमचे घरधणी तयारीस लागले. तुमचे घरीं थंडाई कां दिसती ? त्याजवरून तिणें तिजला विचारिलें. इणें वृत्त सांगितलें. मग घरोघर ती वार्ता प्रगट जाली. पादशहानीं लष्करची वर्दी जासुदानीं सांगितली. त्यांत हें ही वर्तमान श्रुत केलें. पादशहा विचारीं पडून, भिस्ती यास विचारलें, हें वृत्त कशानी प्रगट जालें? त्याणीं हकीकत जाहीर केली. अन्याय माफ करून घेतला. तुह्मां संतोष मानून, बक्षीस माग, ह्मणोन बोलले. याणीं बायकोस विचारून, विनंती करतों बोलला. घरीं जाऊन बायकोस विचारलें. तिणें सांगितलें कीं, तुह्मी द्रव्य दौलत मागितली, तरी किती दिवस आपले घरीं राहणार आहे, हें कळनच आहे. परंतु मागें पुढें कीर्ति राही, असी गोष्ट मागावी. ती कोणती, तरी आपण भिस्ती, चामड्यावरी रोजगार, त्यास एक दिवस, चामाचे दाम चालावे, एवढें बक्षीस मागणें मागावें; ह्मणजे पृथ्वींत कीर्ति राहील. त्याजवरून तो पखालजी हजरतीजवळ जाऊन, विनंती केली कीं, 'हजरत, सलामत बाषद, एक अर्ज माझा आहे. सरकार बक्षीस देतात, त्यास रुपये, वस्त्रं, गांव, इनाम घेतलें तरी किती दिवस टिकणार, समजतच

आहे. याज करितां चामाचा दाम चालवावें, कारण मी भिस्ती, माझा रोजगार चामड्यावरी, तो मी दाम चालविला, ह्मणजे माझी कृतकृत्यता व तुह्मी पृथ्वीपती, सार्वभौम; तुमचे हुकमानीं चालला असतां, तुह्म सारिखा धणीही सत्ताधारी मागें व पुढें निर्माण जाला नाहीं ह्मणतील. यास्तव एवढी गोष्ट बक्षीस द्यावी'. त्या वरून, पूर्वीं बक्षीसीचें वचन गुंतलेंच होतें, मग मान्य होऊन, लष्करांत ताकीद करून, चार प्रहर दाम चालविला. असा प्रतापी पादशहा, त्याणीं हैदराबादेवरी वजीर पाठविला. तो बारा वर्षे जाऊन बसला. लाखों सरंजाम कोट्या वधी रुपयाचे खरार्चात पादशहा आले; परंतु शह सोडून, जातां येत नाहीं, असा प्रकार होऊन, वजीर संकटीं पडला. वरचेवरी वृत्त लिहिलें येतच होतें. त्यांत शिवाजी महाराजांचे बंडावे मोडावे, या हेतु करितां लेहून पाठविलें असतां, तेथें मसलत तूर्तच हल्ला करावी, असी लागून राहिली. त्यामुळें त्याणीं वृत्त लिहिलें कीं, उद्यां हल्ला करून, स्वामीपुण्यप्रतापें हैदराबाद घेऊन, परवांचे दिवशीं निघोन कूच दरकूच येतों. असें लिहिलें असतां, अवरंगजेब यास क्रोध येऊन, अडीच हजार सांडणीस्वार तयार सरंजामासुद्धां लेश नवळ होते. त्याजवरी स्वार होऊन, उंटावरी मशालीही लावून, रातोरात निघोन, हैदराबादेस आले. वजीर हल्लेवरी जाण्यास तयार जाला; हल्ला जाऊन चढली. इतकियांत पादशहा पावल्याचें वृत्त कळोन, हजरतीस सामोरा जाऊन, पायावरी डोई ठेऊन, हात बांधून सर्व मजकूर सांगितला. ऐकून घेतला. आणि मखमू घालून मारिला. त्याचे मुलास आणोन वस्त्रें दिल्हीं. हल्ला चढविली ती फत्ते जाली. हजरतीस येऊन लहान थोरांनीं नजरा केल्या. संतोषांत मर्जी पाहून, काजीनीं अर्जी केली कीं, 'सरकार चाकरीवरी वजीर असतां, अपराध नसतां शिरच्छेद केला, याचें कारण काय' ? त्या जवरून हजरतीनीं सांगितलें

कीं, 'हुजूर येण्याविशीं आज्ञापत्रें सादर जालीं असतां, तपशील चाक-री चुकावून लिहिला नाहीं. परंतु संपूर्ण राज्यांत हकीकत जे. व-जिरास येण्याविशीं पत्रें गेलीं आहेत; त्यास त्याजला मोहिमेमुळें येण्यास चार दिवस अवधी लिहितात, येत नाहींत ह्मणोन जाहीर जालें. ऐसियास हुकूम येण्याचा जाला असोन, आले नाहींत. तेव्हां धणी-पण्याची मर्यादा काय राहिली ! येण्याविशीं लिहिलें आणि कामें होण्याचें लेहून पाठविलें, आणि पुन्हा जाब येण्या-विशीं गेला. तेव्हां नुकसान सरकारचें होतें, वजिराचें काय जातें ! यावें होतें, तें न करितां सरकार कामावरी दृष्टी ठेऊन, हुकूम मोडला, सबब शिरच्छेद केला. सरकार कामावरी दृष्टी वजिराची, सबब त्याचे लेंकास वजिरीचीं वस्त्रें दिल्हीं'. सांगोन नजराणा बाहली खुषी त्याचे चिरंजीवाची करून, हजरत निघोन दिल्लीस आले. या प्रमाणें पादशहाची अदल आहे, काजींनीं सर्वांस सांगितलें. अवरंगजेब पादशहाची आज्ञा घेऊन, अमदाबादेस आले. अंमल बसवून कांठवाड व कच्छ भूज वगैरे प्रांतीं जाऊन, प्रांताची हवा पाहून, खंबाईत सुरत प्रांतीं आले. तेथून सोनगडचा पाहाड होता, त्या वारीनें बाग-लाण प्रांतातून अंमळनेराचे मार्गें दौलताबादेस जाऊन, औरंगाबादेस छावणी केली. तेथें राहून शिवाजी महाराजांवरी सुभे पाठविले. परंतु महाराज पुण्यप्रतापी, त्या योगें त्या सुभ्यांस पराभवून, यवन लोक नर्जर केले. औरंगजेब पादशहानीं वकील महाराजांकडे बोलण्यास पाठविला. त्यांत हुकूम कीं, तुम्ही पादशाही चाकर असोन, मवासी करून, रयतेस इजा देतां, हें चांगलें नाहीं. तुमचा मनोत्सव काय असेल, तो हुजूर निवेदन करावा, आज्ञाप्रमाणें चालावें, यांत चांगलें. गैररीत वागल्यानीं यांत फायदा नाहीं. या अन्वयें ... ..

........पंत वकील येऊन, पत्र देऊन जाबसाल केला. तेव्हां महारा-

जांनीं विचार केला कीं, सामदानप्रकार तुरकांनीं लाविला. त्या पेक्षां आपलें करणें, तें करीतच आहों. परंतु आपला वकील पाठवून, कर्तव्यार्थ दृष्टोत्पत्तीस येत जातील, तसी योजना पाहून करूं. जाणून **रामचंद्र विनायक** गंगातीरस्थ, कारकून हुजर जबाबी चांगला होता, त्यास पाठविला. त्याणीं जाऊन, **जेसिंग** राजाचे वकिलासीं बोलणें बोलून, भेट घेतली. मजकूर ऐकून वतला. त्यांतील हंसील:– मोकासा हुजूर अंमल आमचा, त्यांस तुम्ही निल्हे अंमल बसवून, रयतेस इजा देता, आह्मांस तुह्मी चाकर ह्मणतां, याचें कारण काय? जों पर्यंत आमचें घर आम्ही तपासलें नाहीं, तों पर्यंत तुमचे सांगण्याप्रमाणें लाचारीनें वागलों. आतां आमचें घर उदेपूर तुम्ही जाणतां; त्या अर्थी गादीच आमची आहे. तुम्ही जबरदस्तीनें घेऊन, अंमल, आमचा ह्मणतां, त्यास ईश्वर देईल, त्याणीं अंमल करावा. मार्गानीं चालावें ह्मणणें, त्यास तुमचा मार्ग तो कोणता. समजावा? तदनुरूप आम्ही उत्तरें करूं. आमचा दस्त आहे, तो आम्ही घेतों. रयतेस जाजती उपद्रव आह्मांकडून नाहीं. तुम्ही व दुःख देतां: शब्द ठेविनां, उत्तम आहे'. या प्रमाणें सांगून पाठविलें. तें उत्तर ऐकून, पादशहास बहुत क्रोध उत्पन्न जाला. त्या संधींत महाराजाचे दौडीचें वृत्त कांहीं सांगितलें कीं, घोडा, सरंजाम, बाकेस्वार हातांत भाला घेऊन, दौड करीत चालला. आणि तोबरियांत हात घालून, चणे काढून फाकीत जातो. या प्रमाणें साठ कोशांची दौड होती, हातास लागत नाहीं, यास उपाय काय करावा, ह्मणून लिहिलें आलें, त्याजवरून उदास होऊन बसले. हें वृत्त दिल्लीस कळलियास आम्ही बंदोबस्तास घेऊन, यत्न चालत नाहीं; यांत आह्मांस नादानी येती. याजला उपाय काय करावा, ह्मणून चिंतेंत असतां,

दिल्लीहून अकबार आली, त्यांत हजरतीचा बाखा आहे, फितूरही जाला आहे. हें वृत्त कळतांच, औरंगजेब पादशाहास चित्तांतून जाण्याचा प्रकार; त्यांत महाराजांचा बंदोबस्त करून जावें. दौडीचा मजकूर लेहून आला. त्या प्रमाणें पादशहानीं लेहूनं आल्या अन्वयें तसबीर काढून, शेतखान्याचे कनाथीस लाविली. आणि वकिलास आणोन, रागें भरून ताकीद केली. त्यांत विनोदही केला कीं, तुमचा मालक, परंतु आम्ही शेतखान्यांत त्यास ठेविला, तसबीर दाखवून बोलले. ते शद्ध एकतांच, वकिलानीं मुजरा करून, उत्तर दिल्हें कीं, खुदावंद सलामत पादशहा, आपण बोललां, हें ठीकच आहे. कारण महाराजांस पाहाता, तेव्हां वीतभर फाटून, पोटांतील झाडा होतो !! त्यांजला पाहिल्याशिवाय शौच्यही होत नाहीं, असें ह्मणतांच औरंगजेब खिन्न जाले. निरुत्तर होऊन, आठाविसा दिवसांनीं निघून, दिल्लीस गेले. तेथें जाऊन, तीर्थरूपांस कैद केलें. कटोरीभर पाणी परवानगीं शिवाय मिळेना. याप्रमाणें औरंगजेब पादशहा याणीं वडिलांची अवस्था केली. आपण तख्तनीस जाले, दौलतीचा व राज्याचा बंदोबस्त करून, शिवाजी महाराज फौजबंद, दक्षीणप्रांनी बंड मोठें जमलें. एकादें समई आपले राज्यास अपकारक, याजकरितां कळेल तसें करून, शासन करावें; अगर चाकर ह्मणवून, आपले म्हणवून निदानीं सोडावें, नाहीं तरी बाटवून मुसलमानी करावी, हें रात्रंदिवस मनांत वागत हातें. परंतु दिल्लींतील व्यवस्था पाहण्यामुळें कोणताही प्रकार लक्षांत येईनासा जाला, पादशहाचे वजिराचे भाऊ, औरंगजेब पादशहाजादेपणांत सुभ्यावरी असतां, कारभारी होते. त्यांजकडेसच सुभा सांगोन आले. त्यांचे वस्तु महाराजांचा बंदोबस्त ने होय. बोभाट मनस्वी येऊं लागले. याजमुळें औरंगजेब

निघून, दक्षिणप्रांती पुन्हा मोहिमेवरी आले. इकडे **शिवाजी महाराज** यांणीं रायगडीं राजधानी स्थापून, सर्व कामदार बोलावून, संपूर्ण वर्णमात्र जातींतील एक एक कामावरी एक एक मनुष्य वाढविलें होतें, त्यांस आज्ञा केली कीं, 'तुम्ही हिंदु राज्याचे सरीक आहां. यवनमय उर्वी जाली, यांचें निकंतन करून, स्वधर्म स्थापून, वर्णाश्रमधर्म ज्याचे त्यांणीं आपलाले विहिताचारें वर्तावें. कोण्ही कोण्हाचा द्वेष करू नये, आजपर्यंत धर्म यवनाक्रांतीमुळें ज्ञातींत वर्तेल त्याविशीं शास्त्रार्थ पाहून, विचार करून, रीतीनें चालावें. त्यावरून लहान थोर कामदार मिळाले, त्यांचें सर्वांचे मतें ठरलें कीं, **गागाभट** काशी क्षेत्रीं महाविद्वान् साक्षात् **व्यासोनारायण** आहेत. त्यांजला आणोन, व्यवस्था वर्णाश्रमधर्माची लावावी. तें मान्य करून, काशी क्षेत्रीं ब्राह्मण पाठवून आणि पत्रें रवाना केलीं आणि सर्वांस तांकीद जाली कीं, 'या उपरी कोण्ही आपलाले धर्म सोडून वागल्यास, त्याचें शासन मी करीन. मजला येविशींची मुर्वत पडावयाची नाहीं. ज्याचा स्वधर्म असेल, तो करीत असतां, उच्छेद करील, त्यास शिक्षा करावयास अनमान होणार नाहीं. सुखरूप आपलाले ज्ञातीधर्मे वर्तावें'. त्यावरून शेणवी, काणव, चित्पावन, प्रभू, इत्यादी वर्णांचे चालीचे प्रकार प्रकारांतर हाते, त्या त्याणीं प्रमुखपणें ज्ञातींत लेहून पाठवून, बंदोबस्त करूं लागले. त्यांत **बाळाजी आवजी** चे वरीं, जेष्ट पुत्र **आवजी बल्लाळ**, याचा व्रतबंध करावयाचा. **महाराजांनीं** जातीनें येणें पाहणें, समारंभ करवणें करीत असतां, मुंजीची घटका घातली असतां, **रघुनाथ पंडित** अमात्य याणीं घटका विच्छिन्न केली. **महाराजांस**ही विषाद प्राप्त जाला. पुन्हा घटका घालून, मुंजीचा समारंभ करून घरास गेले. नंतर चांद्रसेनीय कायस्थ प्रभू, दाल्भ्य यांचें कुळाचार्य **टकले** उपनाम, याची रवानगी **बाळाजी**

आवजी चिटनिवीस यांगीं महाराजांस सांगोन करविली. तीन लक्ष रुपये खर्चास दिले.... ....... यांणीं जाऊन, एक वर्षभर राहून, गागा भटजींचा मनोदय रक्षून, प्रसन्न चित्तें तयारी करवून घेऊन, पुण्यास आले. कारभारी यांस सामोरे पाठवून समारंभानीं आणून, पुजा करून, महाराजांनीं संपूर्ण स्थळें दाखविलीं. त्यांत रायगड राजधानीयोग्य जगा पाहून, तेथें सिंहासन अष्टप्रधानांच्या जागा वगैरे व्यवस्था असई नेमिल्या करून, राज्याभिषेकप्रकरण करून. छत्रपती महाराज असें म्हणवावें. येणें करून राजापेक्षां पदवी विशेष आहे, जाणोन नीतीवाक्यार्थ समजावून देऊन, प्रतिपाद्य केलें. नंतर सप्तसमुद्राच्या मृत्तिका वाळू व सततुन्यांतील मृत्तिका व तीर्थ व भागीरथीचें उदक व यथाशास्त्र सर्व साहित्य करून, राज्याभिषेकास मुहूर्त जेष्ठ शुद्ध १३ गुरुवारीं शके १५९. आनंद नाम संवत्सरीं योजिला. परंतु व्रतबंधाशिवाय राज्याभिषेक होत नाहीं. व्रतबंध शूद्रास करूं नये, असा शास्त्रार्थ असतां, राजबीज, पूर्वानुसंधान क्षात्रधर्म स्थापून, एकोणपन्नासावे वर्षी मुंजी केली. ते समई पांच चार मुलें महाराजांस जालीं होतीं. परंतु धर्मस्थापनेस पश्चाताप जाला असतां, ते समई प्रायश्चित घेण्यास बाध नाहीं, अशी वाक्यता मेळवून, व्रतबंध नेमिला. दशमीचे दिवशीं व्रतबंध यज्ञपवीत धारण करून, दशमीस स्नान घातलें. मोठा समारंभ जाला. त्रयोदशीस राज्याभिषेक करण्याचा प्रकार आधीच साहित्य संपूर्ण मेळवून, उदेपूर, जोतपूर, जयपूर, प्राचीन संस्थानें हिंदू लोकांचीं, तेथील शूद्राधिकार आहेत, त्यांजला राज्याभिषेक कसा होतो, तो सांप्रदाय सर्व लेहून आणविलाच होता व गागाभटजींनीं यथाशास्त्र विधी अष्टप्रधानांस सांगणें तें सांगून, क्षेत्रोक्षेत्रीं पत्रें पाठवून, शिष्ट ब्राह्मण बोलावून,

आणिले. संमत महानुभावानीं घेऊन, दुर्ग सिंहासनासंनिध असावा. गुणवती भूमीचे ठाई राजनगर करून, सिंहासन स्थापून, समंत्र अभिषेक करावा. अष्टादश धान्यें भूमीपासोन उत्पन्न होत जावीं आणि राजनीतीनीं वर्तावें, व अशी वांछा आपलाले धर्माचे ठाई ज्याची त्यास प्रवर्त राहावी. कुबुद्धि निर्माण होऊं नये, शत्रुपराभवाविशीं दक्षता धरावी. अशी जागा रायगडाशिवाय दुसरी नाहीं. पुणें सातारा करवीरादी स्थानीं योजावीं; परंतु कराड, मिरज, वांई, चाकण, इंदापूर वगैरे जागजागीं यवनी अंमल होता. त्यांत हिंदुधर्म स्थापून, नूतन प्रतिसृष्टी उत्पन्न करणें जाणून ही जागा योजिली, वर्णावर्णाच्या सभा, बैठकी करून, ठाई ठाई नाच रागरंग भूषणाप्रमाणें शतावधी स्थानीं करून, आपण स्वतां विस्तीर्ण मंडापाचे ठाई मोठे मोठे ऋत्विज व सदस्य गाणपत्य ब्रह्मा निर्मून, थोरले मंडळीं रंग मंडप उभवून, नेमिल्या लोकीं आपलाले स्थानीं उभें राहून, कोण्हाचे हातीं कलश, कोण्हाचे हातीं चामरें, कोण्हाचे हातीं आयुधें, कोण्हाचे हातीं होमद्रव्य, कोण्ही प्रतिवचन द्यावें, कोण्ही उदक घेऊन सिद्ध असावें, कोण्हास सिद्धान्नें देऊन उभें केलें. संपूर्ण कुंभ हेमरौप्यात्मक, दासी व सुवासिनी वर्णाश्रमधर्मरत्वें विधिपूर्वक सुशोभित अलंकारयुक्त स्थापून, अष्टप्रधानसहित कार्यभागीं योजिले. ते समई कांहीं उत्तम पद **बाळाजी आवजी** चिटनिवीस याणीं राज्याभिषेक करावा, ह्मणोन उत्तेजनपूर्वक साहास करून उद्योग केला, याजकरितां **महाराजांची** पूर्ण कृपा कोणत्याही कर्माविषयीं प्रथम याची सल्ला घेतल्याशिवाय कोणतेंही प्रयोजन कार्य कर्तव्य करावयाचें नाहीं, अशी चाल होती. ह्मणून आज्ञापिलें कीं, 'तुह्मास कोणत्या पदाची इच्छा असेल, तें पद तुह्मांस स्वसंतोषें देतों', बोलले. त्याजवरून **बाळाजी आवजीनीं** हात जोडून, विनंती

केली कीं, 'महाराज, आमचे मायबाप सर्वोपरी आमचे त्राते आहांत. कृपा करून, लडिवाळपणें बरें वाईट बोललों असतां, कृपेनीं समजोन घेऊन, मनोदयास येईल, तें कार्य करितों. त्यांस मजला मोठें पद देऊन, मोठे पदवींत ठेऊन, सेवाचोर कर्तव्य असल्यास, आज्ञा करावी, मी चरणांचा दासानुदास सर्व काल संनिध समीपवर्ती सेवा नेमिली करून, परंपरेनीं काळ गुजरावा, ही इच्छा ठेवितों. अन्यत्र कायावाचामनें करून, कल्पनाच चित्तांत येत नाहीं. ऐशियास पद घेऊन, त्या पदाचे मानप्रतिष्ठेनीं वागून, चरणांस अंतरावें एवढें कर्म कर्तव्य नाहीं. दोन खरडीं पायांपासीं घांसोन राहीन. सांगतील ती चाकरी करीन; परंतु एवढी पदवी मजला नको, एवढी विनंती ऐकावी', ह्मणोन सख्त रदबदली विनंती पायावरी डोई ठेऊन केली. **महाराज** संतोषी होऊन वस्त्रें भूषणें पालकी देऊन, **महाराजांस** राज्याभिषेक जालियावरी संपूर्णांस वस्त्रें भूषणें अलंकार देऊन, परराज्यांतील वकील व थोर व संभावीत आले, त्यांस मेजवानगी करून बिदागी केली. कोण्हास ठेऊन घेतलें, कोण्हास निरोप दिल्हे. दोन महिने राज्याभिषेक जालियावरी समारंभ जाला. नित्य श्री, नित्य मंगल, राजसदनीं चालू ठेविलें. **गागाभटजीस** व्रतबंधाची महादक्षणा तीन लक्ष होन दिल्हे. नंतर राज्याभिषेक समई एक लक्ष होन दिल्हे. शिवाय ठाई ठाई वस्त्रालंकार वगैरे देऊन, सत्कार फारच फार केला. या प्रमाणें शके १५९६ चे सालीं राज्याभिषेक आनंदनाम संवत्सरीं जाला, यवनाधीशास कळोन, विषाद उत्पन्न होऊन, मोहीम जातीनें केली. गंगातीरीं आले. या प्रमाणें करून, द्वितीय चरणीं तृतीयांल्हासीं कथा जाली. पुढें **औरंगजेब** पादशाहासीं युद्ध जालें, पराभव केला. दिल्लेंद्र हैदराबादेस गेले. पश्चात् कर्वीरादी संस्थानीं **महाराज** निघून, पहात पहात

कराडीं आले. तदुत्तर वैकुंठाभिगमन केलें! **संभाजी** राजे यांणीं **राजाराम** साहेब कनिष्टबंधु यांस कैद करून, आपण राज्याभिषेक करून घेऊन, राज्य करूं लागले. दिल्लेंद्राकडून **कबजी** आले. तेच कारभारी जाले. मनुष्यें मारलीं, राज्य अफरातफरी जालें. **राजाराम** साहेब निघून चंदीस गेले, या प्रमाणें कथा संपूर्ण, हे विनंती.

समाप्त.

# प्रत्यक्ष देवदेवतांनींच हृदयासंनिध वास केल्यावर, अधर्म कितीसा टिकेल?

हिंदु आर्मी वाच दिसण्यांत उत्तम, वापरण्यास तर फारच मजबूत असून, धक्काबुक्कीस न जुमानतां, वेळ बरोबर दाखवितें, असें असून १।।। ते २ इंच व्यास असून, वजन तोळे फक्त १०–१२ आहे.

हिंदु आर्मी वाच.




Hindu Army Watch

हिंदु आर्मीवॉचवर पुज्य देवादिकांचीं सुंदर चित्रें आपआपले गा-हाणांवर आयुधासह असून, मध्यभागीं महाराष्ट्रवीर श्रीछत्रपति शिवाजी महाराज आहे.

आणि पुन्हां असें असून, तवकडीवर रोमन आंकड्याबरोबरच आपले मराठी आंकडे घातले आहेत आणि सेकंड कांट्यामध्यें चंद्राची उत्तम प्रकारें प्रतिमा दाखविली आहे.

हिंदु आर्मी नि. सि. सिलेंडर वॉच कि. रु. १० ग्यारंटी १ वर्ष.

हिंदु आर्मी नि. सि. लिव्हर वॉच कि. रु. १५ ग्यारंटी २ वर्षें.

हिंदु आर्मी चांदीचें वॉच कि. रु. २५ ते ३० ग्यारंटी ४ वर्षें.

हिंदु आर्मी सोन्याचें वॉच कि रु. १०० ते १२५ ग्यारंटी ४ वर्षें.

हिंदु सचित्र टाईमपीसेस यावर, देवादिकांचीं चित्रें फारच उत्तम प्रकारचीं असून, किं. रु. २॥, ४, ९, १० ते रु. ३० पर्यंत. वॉच बरोबर उत्तम छेडा, कांच, पेटी इ. ग्यारंटी सह फुकट मिळेल. सर्व प्रकारचीं लहान मोठीं वॉचेस् माफक दरानें ग्यारंटी सह उत्तम करून देऊं. विशेष माहिती—सचित्र क्याटलॉग मागवा.

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**
वॉचमेकर ॲन्ड मर्चन्टस् मायखळा
मुंबई, आणि पुणें.